◆ डिसेंबर २००५
◆ वर्ष पाचवे
◆ अंक बारावा

मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

संपादकीय - ४
साहित्यवार्ता ७
शंकर सारडा - अध्यक्षीय भाषण ३५
पुरस्कार ४०
श्रद्धांजली ४९
पुस्तक परिचय
लेडीज कूपे : अनु. अपर्णा वेलणकर ६३
समर्पिता : शरद दळवी ७३
दि मॅजिक ऑफ थिंकिंग बिग : अनु. प्रशांत तळणीकर ८३
साधंसुधं : प्रमोदिनी वडके-कवळे ९५
दीप योजना १०१
बालनगरी १०६

✠ मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

संपादकीय

मारुती चितमपल्ली यांचा सत्कार

सोलापूर येथे जानेवारीत होणाऱ्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी मारुती चितमपल्ली यांची झालेली निवड अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल. कादंबरी, काव्य, समीक्षा, कथा, चरित्रे-आत्मचरित्रे वगैरे ललित वाङ्मयप्रकार हाताळणाऱ्या व्यक्ती साहित्यकार म्हणून ओळखल्या जातात; अन्य प्रकारचे लेखन करणाऱ्यांना अभ्यासक वगैरे म्हणून, माहितीपर लेखन करणारे म्हणून काहीसे गौण लेखले जाते. इतिहास, पाकशास्त्र, व्यक्तिमत्त्वविकासविषयक पुस्तके, विज्ञान, पर्यावरण, रहस्यकथा, भयकथा, प्रवासवर्णने, कोशवाङ्मय व सूची, वार्तापत्रे, समाजकारण, अर्थकारण, राजकारण वगैरे विषयांचा मागोवा घेणारे, ललितेतर लेखने करणारे लोक सृजनशील साहित्यकारांच्या पंक्तीत सहसा समाविष्ट केले जात नाहीत. नोबेल पुरस्काराच्या मानकऱ्यांच्या यादीत तर कादंबरीकार आणि कवी यांचेच प्राबल्य दिसते. नाटककारही फार कमी दिसतात; आणि लघुकथाकार हे त्यापेक्षाही तुरळक आढळतात. कथा हा वाङ्मयप्रकार तेथेही गौणच मानला जातो.

त्यातही भरीला भर म्हणजे क्लासिक-अभिजात साहित्य आणि लोकप्रिय साहित्य यातही भेद केला जातो. लोकप्रिय लेखकांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची संधी सहसा मिळत नाही. अभिजात लेखन करणाऱ्या लेखकांनाच जास्त महत्त्व मिळते. जास्त भाव असतो. त्यांच्या पुस्तकांची मग भले एकेक आवृत्ती संपायला दहावीस वर्षे लागोत, फार थोड्या वाचकांपर्यंत ती पुस्तके पोहोचोत... पण त्यांना लेखकांचे लेखक म्हणून गौरविले जाते. काळाच्या कसोटीवर ती पुस्तके उतरतात असेही मानले जाते. प्रत्यक्षात अनेकदा ती पुस्तके केवळ कपाटांची शोभा वाढवत राहतात. ती क्वचितच वाचली जातात. काळाच्या कसोटीचा विचार केला तर मग रामायण-महाभारत, कालिदास-भवभूती यांची नाटके वगैरेपर्यंत मागे जावे लागेल. गेल्या पाचपन्नास वर्षांचा काळ त्या दृष्टीने नगण्यच ठरेल. आजच्या गतिमान काळात दिवसागणिक हीरो बदलतात. दैवते बदलतात. वर्तमानाचाच प्रभाव जाणवतो. जुन्या स्थिर, संथ कालखंडातली स्थितिशीलता आजच्या वास्तवाशी कुठेच मेळ खाणारी नाही; आज निर्माण

होणाऱ्या साहित्याचा ताजेपणा, त्याची तात्कालिकता हीच आजच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अभिजाततेचा विचार पुढे काळाच्या संदर्भात कधी होईल तेव्हा होवो. न होवो.

...त्यामुळे पर्यावरण, निसर्ग, पशुपक्षी, अभयारण्ये यांच्यावर लेखन करणारे, अरण्यवाचन करणारे मारुती चितमपल्ली हे वेगळ्या वाटेने जाणारे, लेखक ठरतात; आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड होणे ही घटना साहित्याच्या विस्तारित होत चाललेल्या कक्षांचा स्वीकार करायला आपले रसिक आता आपली मानसिकता बदलण्याच्या दृष्टीने तयार होत आहेत याची सूचक आहे. उद्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर पाकशास्त्रावर पुस्तक लिहिणारी एखादी व्यक्ती किंवा भयकथा, रहस्यकथा लिहिणारी व्यक्ती विराजमान झाली तरी आश्चर्य वाटू नये. 'मजेत जगावे कसे', 'स्मरणशक्ती वाढवण्याचा मंत्र', 'यश तुमच्या कडेवर' किंवा 'अब्जाधीश होण्याची पंचसूत्री' अशासारखी पुस्तके लिहिणाऱ्यालाही साहित्याच्या दरबारात मानाचे स्थान मिळायला हरकत नसावी. 'इडली ऑर्किड आणि मी'च्या विठ्ठल कामतांनाही माझ्या पुस्तकाच्या दहा आवृत्त्या एका वर्षात निघाल्या. आपण लोकप्रिय लेखक आहोत; म्हणून साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर स्थानापन्न होण्याची इच्छा झाली तर ती गैर कशी म्हणता येईल? नाहीतरी प्रादेशिक पातळीवरची किंवा ग्रामीण, विज्ञान, आदिवासी, अपंग, पक्षीनिरीक्षक वगैरेंची स्वतंत्र संमेलने होत असतातच. चितमपल्लीही विदर्भ व औदुंबर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले आहेत. येथे वेगळेपण अ.भा.सा. संमेलनाच्या व्यासपीठाचे आहे. म्हणूनच मारुती चितमपल्ली यांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही लेखनक्षेत्रातील विविध पातळ्यांवरील व्यक्तींना प्रेरणा देणारी घटना ठरावी.

नवीन स्वरूपाचे लेखन सध्या मराठीत होत आहे; आणि ते मान्यता मिळवत आहे असा याचा अर्थ आहे. ही प्रतिक्रिया यथार्थच आहे. वनखात्यामध्ये विविध पदांवर काम करताना वनस्पतींचे आणि पशुपक्ष्यांचे जाणीवपूर्वक निरीक्षण करून, निसर्गाचे सर्वंकष अवलोकन करून, त्याला अभ्यासाची व व्यासंगाची जोड देऊन आत्मप्रतीतीचे लेखन करणाऱ्या, स्वानुभवाला शब्दरूपे देऊन वेगळी वाट चोखाळणाऱ्या चितमपल्ली यांच्या निवडीने पर्यावरणवादी मंडळींना तर विशेषच संतोष व्हावा यात नवल नाही. मारुती चितमपल्ली यांनी जंगलातील अपरिचित वाटांचा शोध घेत, निसर्गाची, पशुपक्ष्यांची, झाडाझुडपांची ऋतुगणिक बदलणारी अनंत रूपे बघून, त्यावर लिहिले. त्यासाठी नवनवे शब्द शोधून काढले. वापरले. त्यामुळे मराठीतील निसर्ग-पर्यावरणविषयक शब्दसंपत्तीतही मोलाची भर पडली आहे. शरदिनी डहाणूकर, प्रकाश गोळे, सतीश पांडे, लालू दुर्वे, अतुल धामणकर,

श्रीकांत इंगळहळ्ळीकर, सुरेशचंद्र वारघडे, वगैरे निसर्गोपासकांनी पशुपक्षी-पुष्पसृष्टीची वेधक अवलोकने वाचकांपुढे ठेवली आहेतच!

मारुती चितमपल्ली यांचे वनविभागातले सेवाकार्य महाबळेश्वरसारख्या निसर्गरम्य स्थळी सुरू झाले. १९६७ सालापासून त्यांचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. 'पक्षी जाय दिगंतरा' (१९८३), 'जंगलाचं देणं' (१९८५), 'रानवाटा' (१९९१), 'शब्दांचं धन', 'रातवा' (१९९३) अशी स्वानुभवाधिष्ठित निरीक्षणे त्यांनी नोंदवली. 'मृगपक्षिशास्त्र' या संस्कृत ग्रंथाचा मराठी अनुवाद त्यांनी केला. निसर्गवाचन, सुवर्णगरुड, भारतातील साप वगैरे पुस्तकेही त्यांनी सिद्ध केली. 'पक्षिकोशा'च्या रूपाने एक मोठे सर्वसमावेशक संकलनही विस्तृत प्रस्तावनेसह तयार केले. महाराष्ट्रातील ५५० पक्ष्यांची माहिती त्यात एकत्र वाचायला मिळते. त्या त्या पक्ष्याची विविध भाषांतील नावेही त्यामुळे कळतात. त्यासाठी तेलुगु, तमीळ, गुजराती, कोकणी, माडिया-गौंड, गौंड, या भाषांतील जाणकारांची मदत घेऊन त्यांनी देवनागरीते नावांचे लिप्यंतर करून घेतले. पक्ष्यांची रंगीत छायाचित्रेही डॉ. सतीश पांडे, निरंजन संत, सलील तांबे, दिलीप यार्दी, डॉ. प्रकाश जोगळेकर, दीपक जोशी, चंद्रशेखर बापट, प्रभृतींकडून मिळवली. साहजिकच पक्षिकोशाद्वारे मराठीत पक्षीविषयक माहितीचा खजिनाच खुला झाला आहे. 'चकवाचांदण' या पुस्तकाद्वारे त्यांनी वेळोवेळी लेखन केलेल्या लेखांमधून आपले आत्मचरित्रही सादर केले आहे. तेही माहितीने परिपूर्ण आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान चितमपल्लींना मिळाला तो काहींना थोडा आश्चर्यकारक वाटला असला तरी याआधी त्यांनी औदुंबरचे ५० वे साहित्य संमेलन, विदर्भसाहित्य संघाचे ५१ वे अधिवेशन, यांचे इ.स. २००० मध्ये अध्यक्षपद भूषविलेले आहे; आणि निसर्गविषयक लेखनाचेही स्वतंत्र अस्तित्व दखलपात्र आहे हे दाखवून दिले आहे. अनेक पुरस्कारही त्यांना लाभले आहेत.

सोलापूरचे हे साहित्य संमेलन अध्यक्षीय वेगळेपणाला आणि वैशिष्ट्याला साजेसे काही विषय व उपक्रम राबवणारे ठरावे. पर्यावरणविषयक लेखकांचा स्वतंत्र मेळावा त्या निमित्ताने व्हावा. तशा पुस्तकांचे खास प्रदर्शन भरवावे. मराठी वाचकांच्या अभिरुचीला वेगवेगळ्या विषयांबद्दलच्या आस्थेची जोड मिळायला त्यामुळे चालना लाभेल.

सोलापूर संमेलनाला आमच्या शुभेच्छा.

साहित्यवार्ता

'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकाचे दिमाखदार प्रकाशन

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित होणाऱ्या **'मेहता मराठी ग्रंथजगत'** या दीपावली विशेषांकाचा प्रकाशन समारंभ नुकताच पार पडला.

या विशेषांकाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक **डॉ. द. भि. कुलकर्णी** यांच्या शुभहस्ते झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक **प्रा. रा. ग. जाधव** तसेच **डॉ. आनंद यादव** हे उपस्थित होते.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणाले की, 'प्रथितयश लेखकांसोबतच विविध क्षेत्रात उच्चपदी पोहचलेल्या व्यक्तींनाही आपले अनुभव मांडण्याची संधी या दीपावली विशेषांकाने उपलब्ध करून दिली आहे. समर्थ वाचकातूनच प्रगल्भ लेखकाची निर्मिती होत असते. साहित्य सृष्टीत वाचक हाच खरा केंद्रबिंदू असून लेखक,समीक्षक व प्रकाशक हे त्याच्या ग्रह उपग्रहांप्रमाणे कार्यरत असतात.'

डावीकडून संपादक श्री. सुनील मेहता, अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी, कार्यकारी संपादक श्री. शंकर सारडा व सहाय्यक संपादक सौ. सुनीता दांडेकर

याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव आणि डॉ. आनंद यादव यांनी मेहता मराठी ग्रंथजगतच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले. 'ग्रंथप्रसार' हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून या मासिकाची कौतुकास्पद वाटचाल सुरू असल्याचे सांगून त्यांनी या मासिकाचा गौरव केला.'

तत्पूर्वी उपस्थित सर्व लेखकांचा सत्कार डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. मासिकाचे कार्यकारी संपादक शंकर सारडा यांनी प्रास्ताविक व अध्यक्षांचा परिचय करून दिला. लेखकांचे स्वागत सहसंपादिका सौ. सुनीता दांडेकर यांनी केले सूत्रसंचालन अनिरुद्ध पाटील यांनी तर आभार सुनील मेहता यांनी मानले.

*** जर्मनीतील ग्रंथ मेळाव्यात मराठी लेखकांना निमंत्रण**

जर्मनीतील फ्रँकफुर्ट येथे २००६ मध्ये होणाऱ्या जागतिक ग्रंथ मेळाव्यात भारताला 'सन्मान्य पाहुण्याचा' (गेस्ट ऑफ ऑनर) दर्जा देण्यात येणार आहे. त्यात होणाऱ्या चर्चासत्रासाठी यू. आर. अनंतमूर्ती, दिलीप चित्रे, किरण नगरकर आदी लेखकांना निमंत्रित करण्यात येणार आहे. इंग्रजीव्यतिरिक्त भारतातील अन्य भाषांतील लेखक व प्रकाशकांनाही बोलावले जाणार आहे.

लेखक व प्रकाशकांची निवड करण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत समिती स्थापन केली जाईल, असे साहित्य अकादमीचे सरचिटणीस के. सच्चिदानंद यांनी सांगितले. ''प्रकाशक व लेखकांची निवड करताना सरकारी समित्या पक्षपात करतात, असा सूर सर्वत्र ऐकू येतो, त्यामध्ये राजकारणही होते. नामवंत लेखक व प्रकाशकांची नावे साहित्य अकादमीतर्फेही सुचविली जाणार असल्याने पक्षपात होईल, असे मानण्याची गरज नाही. प्रामुख्याने ज्या लेखकांच्या साहित्याचे जर्मन भाषेत रूपांतर झाले आहे, अशा लेखकांना प्राधान्य देण्यात यावे, असे आम्ही सुचविले आहे. त्यात वरील तीन लेखकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ओ. व्ही. विजयन व निर्मल वर्मा यांचे साहित्य तेथे ठेवण्यात येईल.'' सन २००४ मध्ये झालेल्या महाभारतावरील परिसंवादात दिलीप चित्रे यांनी भाग घेतला होता. 'महाभारत व मराठी कादंबरी' या विषयावरील निबंध वाचनात हरिश्चंद्र थोरात यांनी वि. स. खांडेकरांची 'ययाती' ही कादंबरी व गो. नी. दांडेकर लिखित 'अजुन आहे जागे गोकुळ' या साहित्याचे मूल्यकथन व विश्लेषण केले होते.

*** विक्रमचंद्रा यांच्या कादंबरीसाठी चार कोटी चाळीस लाख**

मुंबईतील गुन्हेगारी विश्वाचा वेध घेतानाच धर्म, राजकारण, पैसा, भ्रष्टाचार, आदर्शवाद, कुटुंब, निष्ठा आणि दगाबाजी यांचाही शोध घेणाऱ्या विक्रम चंद्रा यांच्या नव्या कादंबरीच्या प्रकाशनाचे अधिकार मिळविताना हार्पर कॉलिन्स या प्रकाशन संस्थेने लिलावात पाच प्रकाशकांवर मात केली. हा व्यवहार दहा लाख

डॉलर्सचा म्हणजेच सुमारे चार कोटी चाळीस लाख रुपयांचा असल्याचे समजते.

चार कोटी चाळीस लाख रुपयांची कमाई करणाऱ्या या कादंबरीची पृष्ठसंख्याही १२२५ पाने एवढी प्रचंड आहे. हार्पर कॉलिन्स या प्रकाशन संस्थेतर्फे पुढील वर्षी ही कादंबरी प्रकाशित करण्यात येईल. प्रकाशक जोनाथन बर्नहॅम यांनी याविषयी असोसिएटेड प्रेस या वृत्तसंस्थेला सांगितले की, वाचकाला खिळवून ठेवणारी ही एक असामान्य निर्मिती आहे. कादंबरीच्या प्रकाशनाच्या वाटाघाटीशी संबंधित असलेल्या एका जाणकाराने नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर सांगितले की, हा व्यवहार दहा लाख डॉलर्सचा आहे.

विक्रम चंद्रा यांच्या यापूर्वीच्या ग्रंथांमध्ये 'रेड अर्थ अँड पोअरिंग रेन' व 'लव्ह अँड लॉंगिंग इन बॉम्बे' यांचा समावेश होतो. त्यांनी आपल्या ताज्या कादंबरीसाठी सात वर्षे परिश्रम केले. ही कादंबरी आधुनिक मुंबईतील संघटित गुन्हेगारीभोवती केंद्रीत झालेली असून त्यामध्ये धर्म, राजकारण, पैसा, भ्रष्टाचार, आदर्शवाद, कुटुंब, निष्ठा आणि विश्वासघात यांचा वेध घेण्यात आला आहे.

विक्रम चंद्रा यांच्या या नव्या कादंबरीचा गेल्या काही वर्षांतील सर्वाधिक पृष्ठसंख्या असलेल्या ललित ग्रंथांमध्ये समावेश होतो. गेल्या वर्षी प्रसिद्ध झालेली पॉल अँडरसन यांची 'हंगर्स ब्राईड्स' ही ऐतिहासिक कादंबरी जाडजूड ग्रंथांमध्ये आघाडीवर आहे. या ग्रंथाची पृष्ठसंख्या तेराशेपेक्षा जास्त आहे.

अशा प्रकारचे प्रचंड पृष्ठसंख्या असलेले पुस्तक प्रसिद्ध करणे व्यावसायिकदृष्ट्या धोक्याचे असू शकते. पण 'गॉन विथ द विंड' व 'गांधी' अशा चित्रपटांसाठी प्रदीर्घ लांबी हेच एक बलस्थान ठरले असून त्यामुळे संबंधित कलाप्रकल्पांचा आस्वाद घेणे म्हणजे रसिकाने एखाद्या शिखरावर चढण्यासारखी घटनाच ठरते. डेव्हिड फॉस्टर वॅलेस यांची 'इन्फिनाईट जेस्ट', विक्रम सेठ यांची 'अ सुटेबल बॉय' आणि नॉर्मन मेलर यांची 'हार्लोट्ज घोस्ट' या कादंबऱ्यांची पृष्ठसंख्या प्रत्येकी एक हजारांपेक्षा जास्त असूनही त्यांचा समोवश सर्वाधिक खपाच्या ग्रंथांच्या यादीत झाला. प्रकाशक बर्नहॅम यांनी सांगितले, 'मला वाटते की, अशा ग्रंथांच्या बाबतीत मोठ्या चित्रपटासारख्या भावना निर्माण होतात. या प्रचंड भावविश्वात आपण हरवून जाऊ हे आपल्याला माहिती असते. छोटेखानी पुस्तकामुळे ते साध्य होत नाही.'

*** डिजिटल ग्रंथालयासाठी याहू – गुगल स्पर्धा**

जगभरातील वाचकांना इंटरनेटवर अभिजात साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी अशा लाखो पुस्तकांचे 'डिजिटल' ग्रंथालय स्थापन करण्याची घोषणा इंटरनेट सेवा देणाऱ्या 'याहू' या अमेरिकन कंपनीने केली आहे.

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात 'गुगल'नेही असेच 'डिजिटल' ग्रंथालय सुरू करण्याची योजना आखली होती; मात्र प्रकाशक आणि परंपरागत ग्रंथालयांच्या

जोरदार विरोधामुळे 'गुगल'ला नमते घ्यावे लागले आणि ही योजना स्थगित केली गेली. असे असले तरी 'गुगल' या आपल्या कट्टर प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी कॅलिफोर्नियास्थित 'याहू'ने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी ॲडोब सिस्टीम्स्, द ब्रिटिश नॅशनल अर्काईव्हज, ओरिली मेडिया आदी कंपन्यांसह कॅलिफोर्निया आणि टोरांटो या दोन विद्यापीठांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. या 'ऑनलाईन' ग्रंथालयात विविध स्वरूपाच्या ग्रंथांचा समावेश करण्यासाठी वरील संस्थांची मदत होऊ शकेल. ग्रंथालयातील सर्व साहित्य, बुद्धिसंपदा हक्क अबाधित ठेवत वाचकांना सहज उपलब्ध व्हावे यावर भर देण्यात येणार आहे. त्यामुळे गुगलच्या योजनेला शह बसू शकेल. विविध ग्रंथालये, संग्रहालये आणि प्रकाशकांकडून मिळालेले शेती, इतिहास आणि तंत्रज्ञान आदी विषयांसहित विस्तृत स्वरूपाचे साहित्य तसेच मल्टिमिडिया आणि डिजिटाईझ प्रिंटदेखील वाचकांना आता इंटरनेटवर उपलब्ध होणार आहेत. हे सर्व साहित्य कोणत्याही शुल्काविना म्हणजे अगदी मोफत वाचता आणि 'डाऊन लोड' करता येणार आहे. या 'डिजिटल लायब्ररी' मध्ये मार्क ट्वेन, हेन्री जेम्स आणि एडगर ॲलन पो यांच्या साहित्यकृतींसह सुमारे १८ हजार पुस्तकांचा समावेश असेल असे 'याहू' तर्फे सांगण्यात आले.

* साहित्यिक वर्तुळापासून दूर राहिलेले तेंडुलकर

माणसाचं आयुष्य हे गुंतागुंतीचं आहे, ते समजून घेण्यासाठी माणसांत राहणं मला आवडतं; पण साहित्यिक वर्तुळापासून दूर राहिल्यानेच आपल्याला 'एकलकोंडा' ठरविण्यात आलं असावं असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार विजय तेंडुलकर यांनी केले.

'तें' महोत्सवात ज्येष्ठ पत्रकार गौरी रामनारायण यांनी तेंडुलकर यांची मुलाखत घेतली. लेखक, तेंडुलकरांच्या मागील माणूस अन् हा माणूस लेखक कसा झाला, याचा वेध या मुलाखतीत रामनारायण यांनी घेतला. लहानपणीच्या आठवणी, पत्रकारिता, नेहरू फेलोशिपचे अनुभव, साहित्य सहवास कॉलनी, नाटक लेखन आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर तेंडुलकर यांनी आपल्या 'शैलीत' माहिती दिली.

सर्वसामान्य मध्यमवर्गीयांप्रमाणेच आपलं लहानपण गेलं. वयाच्या १५ व्या वर्षी शाळेतून काढण्यात आले. तेव्हापासूनच आपल्यात बदल घडला. मी इतरांशी कमी बोलायला लागलो, अगदी आईशीसुद्धा! मी स्वत:शीच तासन् तास बोलत असे, हे बोलणं मीच ऐकत असे. तेव्हापासूनच मी 'ऐकत' आलोय. मला लेखक व्हायचं नव्हतं. त्यामध्ये मी ओढला गेलोय. मी स्वत:शीच बोलताना लेखनास सुरुवात केली. लहानपणी जे पाहिलं, अनुभवलं ते लेखनात उतरलं, असे तेंडुलकर म्हणाले.

जीवनास मी प्राधान्य देतो, लेखन हे माझ्या जीवनाचा बाह्य परिणाम होय. जीवन हे मुळाशी अवघड असतं. प्रत्येक क्षण हा आव्हानात्मक असतो. चांगल्या-वाईट घटना घडतच असतात. या अनुभवातूनच तुम्ही काय शिकला हे महत्त्वाचे आहे. कठीण परिस्थितीशी झुंजत राहणं म्हणजेच जीवन होय. माणसाचं जीवन गुंतागुंतीचं आहे. एखादी व्यक्ती आपला अनुभव सांगते. तो अनुभव आपला का वाटावा याचा मी शोध घेतो. ते समजून घेण्यासाठीच मला माणसात राहणं आवडतं; पण साहित्यिक वर्तुळापासून आपण दूर राहिल्याने मला 'एकलकोंडा' ठरविलं गेलंय, असे आत्मविश्लेषण तेंडुलकर यांनी केले.

मुंबईला आलो तेव्हा डोक्यावर छत आणि खिशात पैसे नव्हते, असे सांगून ते म्हणाले, तुम्ही इतरांवर अवलंबून असता तेव्हा 'आज्ञा' पाळावीच लागते. स्वत:ला विसरून मान्यता द्यावी लागते. मला पत्रकारिता करताना हीच भूमिका बजवावी लागल्याचं त्यांनी नमूद केलं. नेहरू फेलोशिपच्या अभ्यासाचा अनुभव सांगताना ते म्हणाले की, या काळात अनेक गुन्हेगारांना, नक्षलवाद्यांना पाहता आले. पोलिसांकडून होणारा 'थर्ड डिग्री'चा वापर आणि गुन्हेगाराला फाशी देण्याची घटना आपण पाहिली. फाशीचा प्रकार म्हणजे खूनच होय.

तीन मुलींचा वडील या नात्याचा अनुभव मला सुंदर वाटतो. तिघींबरोबर घालविलेला वेळ मी विसरू शकत नाही. आई, पत्नी, मुलींविषयी मला आदर आहे. त्यामुळेच माझ्या नाटकांत महिलांना प्राधान्य दिले गेले; पण या महिला लढाऊ प्रवृत्तीच्या आहेत. कोणतीही व्यक्तिरेखा 'बळी' ठरल्याचं मी दाखविलेलं नाही, असेही तेंडुलकर यांनी सांगितले.

* 'आमचा बाप...' अमेरिकेत!

'आमचा बाप आन आम्ही' या मराठीत इतिहास घडवणाऱ्या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती सोळा नोव्हेंबरला अमेरिकेमध्ये प्रकाशित झाली. 'अनटचेबल्स' असे शीर्षक असलेल्या या आवृत्तीचे प्रकाशन 'सायमन अँड शुस्टर' या १६५ वर्षे प्रकाशन व्यवसायात असलेल्या कंपनीने केले आहे. अर्थात, मूळ पुस्तकाचे हे भाषांतर नाही तर अमेरिकन वाचक डोळ्यासमोर ठेवून अनेक बदल त्यात केले आहेत. तेथील वाचकाला येथील जातीव्यवस्था, बाबासाहेब आंबेडकर आणि इतरांनी दिलेला लढा, ग्रामीण समाजरचना, बहुजन समाजाचा ढाचा याची कल्पना अजिबात नाही हे लक्षात घेऊन हे पुस्तक पुन्हा लिहिले आहे. असे रिझर्व्ह बँकेमध्ये मुख्य सल्लागार आणि अर्थतज्ज्ञ या पदाची जबाबदारी सांभाळणारे नरेंद्र जाधव यांनी सांगितले. दलित समाजात होणारे सकारात्मक बदल, मराठमोळे वातावरण, दलित समाजाची उपेक्षेकडून मुख्य प्रवाहात सामावण्याची प्रक्रिया पुस्तकात नमूद करताना, गौतम बुद्ध, चार्वाक यांचे विचार, दलितांना अनेक शतके सोसावी लागणारी अवहेलना असे अनेक तपशील देण्यात आले आहेत.

'आतापर्यंत इंग्लिशमध्ये भारतीयांनी केलेले लिखाण मध्यमवर्गीयांबाबत होते. या पुस्तकामुळे एक वेगळी समाजरचना या देशात अस्तित्वात आहे हे पुढे येत आहे. यापूर्वी मी इंग्लिशमध्ये केलेले लिखाण आर्थिक विषयांबाबत होते, त्यामुळे हे पुस्तक लिहिताना थोडेसे दडपण होते. पण प्रकाशकांना ज्या सहजतेने ते स्वीकारले त्यावरून आत्मविश्वास बळावला आहे', असेही ते म्हणाले.

अमेरिकेत या पुस्तकाचे प्रकाशन भारतीय पद्धतीने व ओक्लाहामाचे माजी गव्हर्नर आणि वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्याची चौकशी करणाऱ्या आयोगाचे आयुक्त बॉब केरी यांच्या हस्ते झाले. न्यू स्कूल युनिव्हर्सिटीचे प्रा. अर्जुन अप्पादुराई यांनी यावेळी जाधव यांची मुलाखत घेतली. नंतर १२ दिवसांत नरेंद्र जाधव सुमारे ३० ठिकाणी पुस्तकाबद्दल भाषणे केली आणि रेडिओ स्टेशन्स, टीव्ही चॅनल्सवर मुलाखती दिल्या.

याच पुस्तकाच्या हिंदी, उर्दू, कन्नड आणि तामिळ आवृत्त्यांचे तसेच जाधव यांनी आर्थिक विषयांबाबत लिहिलेल्या ग्रंथांचे प्रकाशन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या हस्ते दिल्लीत झाले.

* अमराठी अधिकाऱ्यांची डोकेदुखी

राज्य मराठी विकास संस्थेच्या अनुदानात यंदा तब्बल १२ लाख रुपयांची कपात करण्यात आल्याने, मराठी भाषेच्या विकासासाठी संस्थेच्या वतीने राबविले जाणारे अनेक प्रकल्प रखडले आहेत. मराठीच्या विकासात केवळ निधीकपातीचाच एकमेव अडसर नाही; तर मंत्रालयात बसलेले सामान्य प्रशासन विभागातील 'अमराठी अधिकारी' ही मराठी विकास संस्थेची डोकेदुखी ठरत आहे.

राज्य मराठी विकास संस्थेसाठी दर वर्षी सरकारच्या वतीने ४० लाखांचे अनुदान दिले जाते. मराठी भाषा समृद्ध व्हावी, यासाठी संस्थेच्या वतीने या निधीचा वापर केला जातो. परंतु यंदा केवळ २७ लाख ५० हजार रुपयांचाच निधी मिळाल्याने संस्थेची कामे रखडली आहेत. 'दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश' व 'साहित्यसूची' तयार करण्याच्या कामासाठी डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या अध्यक्षतेखाली संपादक मंडळ कार्यरत आहे. या मंडळाच्या डिसेंबर २००४ पर्यंत दोन बैठका झाल्या. मात्र, त्यानंतर अनुदान न मिळाल्यामुळे या प्रकल्पासंदर्भात बैठक होऊ शकलेली नाही.

'वस्त्रनिर्मिती' माहितीकोशाच्या आठव्या खंडातील संज्ञांच्या संस्करणाचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी तज्ज्ञांच्या बैठका घेणे आवश्यक होते. परंतु निधी नसल्यामुळे बैठका घेणे शक्य झालेले नाही. मराठी ग्रंथसूची, संगणकासाठी एकरूप लिपी व वर्णमाला, पालघर तालुक्यातील बोलीभाषांचा समाजवैज्ञानिक अभ्यास, संकल्पना कोश, फारसी-मराठी शब्दकोश, 'बौद्धिक संपत्ती-अधिकार'विषयक पुस्तिका, तंजावर येथील मोडी हस्तलिखितांचे देवनागरीकरण, दासोपंतांच्या 'गीतार्णव'

संबंधीचा प्रकल्प आदी अनेक प्रकल्प रेंगाळले आहेत.

मध्यंतरी मंत्रालयात मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाची आढावा बैठक झाली. संस्थेच्या संचालिका वसुंधरा पेंडसे-नाईक यांनी या वेळी सर्व वस्तुस्थिती मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणली. तेव्हा संस्थेच्या अनुदानात कपात केली जाणार नाही, उलट अनुदान वाढवून देण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देशमुख यांनी दिली. विधान परिषदेतील काँग्रेसचे आमदार उल्हास पवार यांनी आपल्या आमदार निधीतून पाच लाख रुपयांचे अनुदान मंडळाला देण्याचे जाहीर केले.

* अस्सल ग्रामजीवनाचा वेध घेणारा कथासंग्रह

मराठवाड्याच्या मातीचे बीज घेऊन अस्सल ग्रामजीवनाचा वेध घेणारा मानवी मनाला आपलेसे करणारा 'सिरसी' हा कथासंग्रह आहे असे उद्‌गार ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी काढले.

'सिरसी' या सतीश सुरवसे लिखित कथासंग्रहाच्या प्रकाशन समारंभानिमित्ताने लातूर येथील शिवछत्रपती ग्रंथालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सूर्यनारायण रणसुभे तर अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत लातूरचे नगराध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते.

बोराडे पुढे म्हणाले, लेखनात ग्रामीण, दलित साहित्यापेक्षा पूर्णपणे वेगळा दिलखुलासपणा आहे. सुरवसे यांनी कोणाच्याही लेखनाचा आधार न घेता स्वतंत्र विचार कथेच्या रूपाने मांडला आहे. परंतु लेखकाने नेमकी भूमिका पुढे घेऊन लेखन करायला हवे, असा सल्लाही त्यांनी दिला.

डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना म्हटले की, खेड्यातील मानवी प्रवृत्तीचा वेध अतिशय विनोदी आणि गंभीरपणे कथेच्या रूपाने घेतला आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे म्हणाले की, अन्याय, अत्याचार, गळचेपी यामुळेच समाज दुभंगला जातो आणि यातूनच लेखनाला वाचा फुटते, मराठी साहित्यात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी आदी चळवळी निर्माण झाल्या आणि या चळवळीमुळेच खऱ्या अर्थाने साहित्य लेखन विपुल प्रमाणात निर्माण झाले. बदलत्या समाजजीवनाचे बारकावे टिपण्याचा प्रयत्न नव्या लेखकाने करावा तोच पुढील काळाला उपयोगी पडेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

'सिरसी' या कथासंग्रहाचे लेखक सतीश सुरवसे म्हणाले की, आजी, आई व माझे गुरु यांच्या प्रेरणेनेच लेखनाला मूर्त रूप आले. यात सिरसी गावचा मोलाचा वाटा असल्यानेच कथासंग्रहालाही 'सिरसी' हेच नाव देऊन गावच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला आहे.

* 'एका खेळियाने'चे प्रकाशन

''माझ्या आजवरच्या वाटचालीत दिग्दर्शकांचा वाटा मोठा आहे. वय आणि अनुभवाने मोठा झाल्यामुळे अलीकडे नवे दिग्दर्शक माझे मत विचारात घेतात. तरीही मुळात मी 'दिग्दर्शकाचा अभिनेता' आहे,'' असे मत प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी व्यक्त केले.

'आशय सांस्कृतिक' तर्फे आयोजित कार्यक्रमात प्रभावळकर यांनी लिहिलेल्या 'एका खेळियाने' पुस्तकाचे प्रकाशन अभिनेत्री सुलभा देशपांडे यांच्या हस्ते झाले, प्रसिद्ध निवेदक अरुण नूलकर यांनी प्रभावळकरांशी संवाद साधला. ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, दिग्दर्शक विजय केंकरे, अभिनेते विक्रम गोखले, नाट्यनिर्माते सुधीर भट, पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये, 'अक्षर प्रकाशन'च्या मीना कर्णिक, 'आशय'चे वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार उपस्थित होते.

आपल्या अभिनयप्रवासाचा आढावा घेताना प्रभावळकर म्हणाले, ''अभिनय हा सुरुवातीला केवळ छंद होता. 'टाटा मूलभूत संशोधन संस्थे'मध्ये संशोधन करण्याची इच्छा होती. मात्र, तिथे संधी मिळाली नाही आणि नाट्यव्यवसायात शिरलो. कुटुंबीयांना अभिनयक्षेत्राच्या 'ग्लॅमर'चे फारसे आकर्षण नव्हते; पण माझी ओढ त्यांना जाणवली आणि मग विरोध झाला नाही. बालनाट्ये, प्रायोगिक, हौशी, व्यावसायिक नाटके अशा सर्व प्रकारांत वावरलो. माझ्यातील ऊर्मी कधी अभिनयातून, तर कधी लेखनातून प्रकट झाली. विसंगती टिपण्याची दृष्टी दोन्ही ठिकाणी उपयोगी पडली. मात्र, लेखन तुलनेने आधी सुरू झाले. वेगवेगळ्या माध्यमांच्या गरजेप्रमाणे मी अभिनयामध्ये फरक करतो. 'एका खेळियाने'च्या निमित्ताने मला स्वत:मध्ये आणि माझ्या भूमिकांमध्ये डोकावून पाहता आले.''

गोखले म्हणाले, ''मित्र म्हणून असलेला दिलीपचा प्रेमाचा धाक आवडतो. मात्र, त्याने शारीरभाषेचा अतिवापर टाळला तर सोन्याहून पिवळे होईल.''

देशपांडे म्हणाल्या, ''दिलीप बारकाईने अभ्यास करतो. स्वत:चे आणि अन्य पात्रांचे तो सूक्ष्म अवलोकन करतो. हा अभ्यास त्याच्या लिखाणातून जाणवतो.''

* सुवार्ता साहित्य मेळावा

अनेक धर्म व संस्कृतीचे प्रतिबिंब भारतात दिसते. माणसे जोडणारा साहित्यधर्म सर्वात मोठा आहे. साहित्य म्हणजे सहत्व, ममत्व, एकात्म आणि देवत्व होय. मराठीच्या आळ्याला अमृत घातलेले असल्याने मराठी भाषा व संस्कृती अजरामर राहणार आहे, असे प्रतिपादन कोमसापचे संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी 'सुवार्ता साहित्य मेळाव्या'च्या उद्घाटनप्रसंगी वसई येथे केले.

देवतळाव येथील फा. भंडारी सभागृहात स्वागतगीताने मेळाव्यास सुरुवात झाली. फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांनी लिहिलेल्या 'पोप दुसरे जॉन पॉल-जीवनगाथा' ग्रंथाचे प्रकाशन कर्णिक यांच्या हस्ते करण्यात आले. सुवार्ता मासिकांच्या चळवळीचा आढावा फा. ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज यांनी आपल्या प्रास्ताविकातून यावेळी घेतला, तर फा. दिब्रिटो यांनी लिहिलेल्या ग्रंथाची ओळख प्रा. पु. द. कोडोलीकर यांनी करून दिली.

वसईतील ख्रिस्ती साहित्यात फा. डॉमनिक आब्रियो, जोसेफ नऱ्होना, रॉक कार्व्हालो या आधीच्या पिढीतील साहित्यिकांचे मोठे योगदान असून, ख्रिस्ती साहित्य परिषदेला वसईने चार अध्यक्ष दिले आहेत. सुवार्ताने लेखक घडविण्याचे काम केले आहेच, यापुढे अशा चळवळी वेगवेगळ्या वाटेने न जाता ख्रिस्ती परिषदेशी संलग्न व्हाव्यात, तसेच परिषदेची शाखा वसईत स्थापन व्हावी, असे मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष अनुपमा उजगर यावेळी म्हणाल्या. कामगार नेते भरत पेंढारी, 'सुवार्ता' च्या उज्ज्वला लेमॉंस, फा. जॉन परगोस, फा. मिस्टन घोन्सालवीस व थॉमस लोपीस व्यासपीठावर उपस्थित होते.

* मराठीची दुरवस्था भावनिक पातळीवरून मांडावी : जाधव

''मराठीच्या दुरवस्थेचा प्रश्न केवळ वैचारिक स्वरूपात न मांडता त्याला भावनिक पातळीवर नेले पाहिजे; कारण त्याशिवाय त्याचे कृतीत रूपांतर होणार नाही,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी केले. पुणे विद्यापीठाचा मराठी विभाग आणि 'सकाळ' तर्फे आयोजित 'माध्यमिक, उच्चमाध्यमिक परीक्षांमधील मराठी विषयाची दुरावस्था; कारणे व उपाय' या चर्चासत्राचा समारोप त्यांनी केला. ''पुस्तके भाषेला जगवत नसतात. त्यासाठी भाषिक अस्मिता निर्माण व्हायला हवी. इंग्रजी शिकताना आपले हे आत्मभान हरवून गेले. त्यामुळे वैचारिक पातळीबरोबरच भावनिक पातळीवरही ही अस्मिता व्यक्त करण्याची वेळ आली आहे,'' असे प्रा. जाधव म्हणाले.

''माध्यमिक आणि उच्च माध्यमिक पातळीवरील मराठी शिक्षणाच्या दुरवस्थेच्या प्रश्नाबाबत केवळ अनुत्तीर्णांची आकडेवारी मांडणे पुरेसे नाही. यातील शाळा, शिक्षक, पालक, विद्यार्थी, ग्रंथालये अशा सर्व घटकांचा, त्यातील उणिवांचा विचार करायला हवा. वस्तुस्थिती काय, याचे आकलन नसेल, तर उपाय शोधता येणार नाहीत. हा प्रश्न वैज्ञानिक काटेकोरपणे मांडावा लागेल. मराठी विषयाची दुर्दशा हा प्रश्न नसून, ते आव्हान आहे. ते अनेकमुखी आहे; मात्र त्याची वाटणी करून चालणार नाही. सांस्कृतिक बेजबाबदारपणामुळे आपण त्याची वाटणी करून घेतली आहे; मात्र हे आव्हान समग्रपणेच समजून घ्यावे लागेल. मराठीची दुरवस्था जन्मापासूनच आहे. १९६० नंतर मराठीची जेवढी उपेक्षा झाली, तेवढी आधीच्या सात-आठ शतकांतही झाली नसेल. सरकारला या इतिहासाचे वाचनच करता आलेले नाही. मराठीच्या संदर्भात संस्था निर्माण झाल्या, त्यांनी काय केले, हा प्रश्नही आहेच.''

श्री. आनंद आगाशे म्हणाले, ''मराठीच्या दुरवस्थेची जबाबदारी केवळ शिक्षकांवर टाकणे योग्य नाही. यावर दूरगामी उत्तर शोधायचे असेल, तर मूळ स्रोतापाशी जायला हवे. भाषेची ओळख ही घरात होते; पण ती शिकवण्यात पालकांना किती आस्था आहे? करिअरचे भूत आपल्या डोक्यावर बसले आहे; परंतु तेथेही संवादासाठी काही कौशल्ये लागतात. त्यासाठी भाषा हा महत्त्वाचा घटक आहे; ज्याची पायाभरणी घरातच होते. त्यामुळे शिक्षणपद्धतीतील बदलांबरोबरच पालकांचे प्रबोधनही आवश्यक आहे.''

''तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात अर्थार्जन होऊ शकत नाही, म्हणून मराठीकडे दुर्लक्ष केले जाते; मात्र मला स्वत:ला मराठीत शिकल्याचा फायदा मराठी मातीशी असलेले नाते घट्ट टिकवण्यासाठी होतो,'' असे मत निकित अभ्यंकर याने व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख प्रा. अविनाश आवलगावकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विजया देव यांनी सूत्रसंचालन केले. चर्चासत्रासाठी मराठी अभ्यास परिषद, राज्य मराठी विकास संस्था, प्रतिमा प्रकाशन यांनीही सहकार्य केले.

* तरुणपिढीला मराठीकडे वळविणे हे वृत्तपत्रांपुढील आव्हान

इंग्रजी ही ज्ञानभाषा असल्यामुळे तरुणपिढी मराठीपासून दूर जात आहे. त्यांना मराठीकडे वळविणे हे मराठी वृत्तपत्रांपुढील आव्हान आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र टाइम्सचे संपादक भारतकुमार राऊत यांनी केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या पदवी – प्रिंट, रेडिओ आणि टेलिव्हिजन मीडिया अभ्यासक्रमाचे उद्घाटन राऊत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक होते.

सध्याच्या व्यावसायिक पत्रकारितेचा 'धंदा' न करता व्यावसायिक पत्रकारितेशी प्रामाणिक राहून मराठी वाचक कसा टिकेल, याचा विचार केला पाहिजे, असे

सांगून राऊत म्हणाले की, लोकमान्य टिळक, आगरकर, आंबेडकर, अत्रे यांनी विविध उद्दिष्टांसाठी पत्रकारिता केली. पत्रकारिता हा त्यांचा धर्म होता. आता तो व्यवसाय झाला आहे. या व्यवसायाचा धंदा न करता मराठी वाचक टिकविणे गरजेचे आहे. टिळक, आगरकर, आंबेडकर, अत्रे हे संपादक नसते तरी त्यांच्या क्षेत्रात त्यांचे योगदान मोठे होते. पत्रकारिता हा त्यांचा धर्म होता. त्यांनी कधीही व्यावसायिक पत्रकारिता केली नाही. त्यांनी निर्भीडपणे पत्रकारिता केली, कधीही तडजोड केली नाही. सध्या पत्रकारितेचे संदर्भ बदलत आहेत. मराठी न वाचणाऱ्या या तरुणपिढीला मराठीकडे वळविण्यासाठी वृत्तपत्रांनी बदल करण्याचे धारिष्ट्य दाखविले पाहिजे. वृत्तपत्रात वाचकांना त्यांचे प्रतिबिंब दिसायला पाहिजे. वाचक हा अव्यक्त असतो. त्याची नाडी ओळखून बदल करणे जरुरीचे आहे, असे त्यांनी सांगितले.

आजच्या युवा पिढीला त्यांना राजकारण व राजकीय नेतृत्वाबद्दल अनास्था आहे. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या व राजकीय क्षेत्रातील घडामोडींबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता असते. अन्य भाषेतील शब्द मराठी भाषेत रुजविता आले पाहिजे, असे राऊत यांनी सांगितले.

'ध्येयवादी पत्रकारिता हा लोकमान्य टिळक, आगरकर यांचा उद्देश होता. आजची पत्रकारिता व्यावसायिक झाली आहे. वृत्तपत्रे लोकमत घडवत असतात, त्यासाठी विश्वासार्हता टिकविणे गरजेचे आहे,' असे दीपक टिळक यांनी सांगितले.

'केसरी'च्या वतीने राऊत यांचा सत्कार 'केसरी'चे कार्यकारी संपादक राकेश टोळ्ये यांच्या हस्ते करण्यात आला. राऊत यांचा परिचय 'केसरी'चे वृत्तसंपादक रामदास नेहुलकर यांनी करून दिला. वृत्तपत्रविद्या विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. दीपक देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन स्वप्निल पोरे यांनी केले.

* 'फूटपाथ विद्यापीठा'च्या 'विद्यार्थ्यां'चे बहुपेडी व्यक्तिमत्त्व

मुंबईच्या 'फूटपाथ विद्यापीठा'चा विद्यार्थी असे सार्थ वर्णन करीत विख्यात कवी अरुण कोलटकर यांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे पदर उलगडण्यात आले.

कवी, चित्रकार आणि संगीतातील दर्दी अशा कोलटकर यांनी लिहिलेल्या 'द पोलीसमन – अ पेपर टायगर बुक' पुस्तक प्रकाशन 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'च्या अमृतमहोत्सवा निमित्ताने झाले. त्या कोलटकरांचे निकटवर्तीय अविनाश गुप्ते, रत्नाकर सोहोनी, प्रकाशक अशोक शहाणे आणि मुद्रक सुजित पटवर्धन यांना प्रसिद्ध कवी दिलीप चित्रे यांनी बोलते केले.

सोहोनी म्हणाले, ''अरुणने या पुस्तकात रेखाटलेल्या 'स्केचेस'मधून पोलीस कोणकोणत्या मानसिकतेतून प्रवास करतो, ते कळते. पोलिसाला अरुणने जवळून न्याहाळून पाहिले होते; त्यामुळे या रेखाटनांतून अरुणच्याही संवेदनांचा प्रवास दिसतो. अरुणची निरीक्षणक्षमता अफाट होती.''

चित्रे म्हणाले, ''एखाद्या कलावंताच्या दृष्टीमध्ये जो अचूकपणा असतो; तो अरुणच्या बाबतीत दुतर्फा होता. कडक शासनव्यवस्थेविरुद्धची त्याची मते आणीबाणीआधीच तयार झाली होती. माणसांनी बनविलेले नियम आणि विश्वाचे नियम यांतील फरक अरुणने समजावून सांगितला.''

गुप्ते म्हणाले, ''१९६० च्या सुमारास 'जॅझ' संगीत ऐकणे, पखवाजवादन शिकणे आणि हिंडणे या गोष्टी अरुणच्या 'अजेंड्या'वर होत्या. अमेरिकी कृष्णवर्णीय गायकांचा त्याच्यावर प्रभाव पडला होता. अरुण स्वत:चे व्यक्तिगत अनुभव गाणी, कविता आणि रेखाटनांमध्ये अनुवादित करीत असे. त्याला वास्तवाचे प्रचंड भान होते. तो खऱ्या अर्थाने 'रस्त्यातला माणूस' होता.''

* ओरिगामी आणि चित्रकला

कागदाला काही घड्या पडल्या आणि साकारला वाऱ्याशी स्पर्धा करणारा घोडेस्वार, पक्षी, नाचणारा मोर. मुलांनीही लगेच 'नाच रे मोरा' चा ठेका धरला. व्हायोलिन वाजविणाऱ्या कागदाच्या वादकाने 'धूम मचाले' गाणे वाजविल्यावर मुलांनी आनंदाचा जल्लोष केला... हे कागदाचे प्राणी, पक्षी साकारत होते डॉ. अनिल अवचट.

'अक्षरधारा'ने आयोजिलेल्या पुणे ग्रंथोत्सवांतर्गत डॉ. अवचट यांचे विविध छंदांविषयी व्याख्यान झाले. 'निसर्गाने प्रत्येक व्यक्तीत कलेचा अंश दिलेला आहे; पण आपण तो जोपासत नाही, वाढवत नाही...'' प्रेक्षकांच्या सर्जनशीलतेला साद घालत ओरिगामी, चित्रे शिकवितानाच अवचट गोष्टी सांगत होते. गप्पा मारत होते.

''चित्रे काढायची भीती मनातून काढून टाका. आपल्याला दिसतो तसा आकार कागदावर उमटवत जायचे. हळूहळू हात तयार होईल.'' चित्रकलेचा रेषा-मंत्र डॉ. अवचट बाल-गोपाळांबरोबरच पालकांच्याही मनावर उमटवत होते. हातभर लांब दोरी बोटांमध्ये अडकवून त्यातून घर, मासे पकडायचे जाळे, गोगलगाय तयार होते हे पाहून उपस्थित थक्क होत होते. ''बाजारातील खेळण्यापेक्षा दोरी, रुमाल, कागद यांच्याशी मुलांना खेळू द्या. त्यांना सर्जनशीलतेचा आनंद घेऊ द्या.'' मुलांचीच इच्छा जणू डॉ. अवचट पालकांपर्यंत पोचवत होते. रंगलेल्या या मैफलीचा समारोप डॉ. अवचट यांनी बासरीवर छेडलेल्या मधुर सुरांनी झाला.

* अमेरिकेत मराठी नाट्यकार्यशाळा

सातासमुद्रापार मराठी नाटक पोहोचले आहे, पण येत्या काही वर्षांत तिथे नाट्यसंमेलन होण्याची नांदी सुरू झाली आहे. मराठी नाटकाची जडणघडण आणि नाट्यशास्त्राची मूलतत्त्वे परदेशात पोहोचविण्यासाठी अ. भा. मराठी नाट्यपरिषदेतर्फे वामन केंद्रे यांनी अमेरिकेत नाट्यकार्यशाळा घेतल्या आहेत. मराठी नाटकाचे तंत्र-मंत्र आणि त्यामधील शास्त्रोक्त पद्धतींवर व्याख्यानेही २९

ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या कालावधीत अमेरिकेतील वेगवेगळ्या शहरात घेण्यात आली.

केवळ एकतर्फी संवाद न होता तेथील नाट्यप्रकार आणि त्यांच्या उगमाबाबतचे प्रवाह जाणून घेण्याकडे आपला कल असल्याने वामन केंद्रे यांजवर नाट्यपरिषदेने ही जबाबदारी टाकली. अमेरिकेतील नाट्यशाखेने मऱ्हाटमोळ्या मातीतील नाटकाची मूलतत्त्वे जाणून घेण्यासाठी उत्सुकता दाखवली. मराठी नाट्यप्रयोग आणि त्यामागील पार्श्वभूमी तसेच या नाटक उभी राहण्याची प्रक्रिया या विषयी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली जात आहे. अमेरिका नाट्यशाखेतर्फे निमंत्रण आल्यानंतर अ. भा. मराठी नाट्यपरिषदेने पुढाकार घेऊन मुंबई विद्यापीठ नाट्यशाखेचे प्रमुख प्रा. वामन केंद्रे यांची यासाठी निवड केली होती.

* 'अज्ञातवासातल्या कविता' व 'शतपावली'चे प्रकाशन

''मानवाच्या ज्या वेदना, जी दु:खे औषधांनी बरी होत नाहीत, त्यावर काव्यांची फुंकर घालून दूर होतात; आणि जीवनात आशेचा किरण निर्माण करतात हेच डॉ. कराड यांच्या काव्यविषयक भूमिकेवरून स्पष्ट होते,'' असे श्री. शंकर सारडा यांनी सांगितले.

सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका डॉ. पद्मिनी कराड यांच्या 'अज्ञातवासातल्या कविता' व 'शतपावली' या अनुक्रमे कवितासंग्रह व कथासंग्रहाचे प्रकाशन श्रीमती ऐनापुरे व ज्येष्ठ साहित्यिक शंकर सारडा यांच्या हस्ते झाले.

व्यासपीठावर लेखिका श्रीमती डॉ. कराड, राज्याचे आरोग्य महासंचालक डॉ. प्रकाश डोके, उद्धव भडसाळकर, डॉ. शिवाजी कराड आदी उपस्थित होते.

''डॉ. पद्मिनी कराड यांनी स्त्रियांचे अनुभव व मनोवेदना अत्यंत मार्मिक आणि नेमक्या शब्दात मांडल्या आहेत. सामाजिक कार्य व व्यवसायाने डॉक्टर असल्यामुळे त्यांच्या लिखाणात समुदपदेशनाची भावना दिसून येते,'' असे मत विनीता ऐनापुरे यांनी व्यक्त केले.

डॉ. कराड यांनी यापुढे पुरुषांच्या प्रश्नांवरही लिहावे. त्यांचे लिखाण रोखठोक असून शिवार व खेड्यातील जीवनाचे दर्शन घडविणारे आहे, असे डॉ. डोके म्हणाले. दैनंदिन जीवनातील अनुभवांशी थेट नाते सांगणाऱ्या या कविता व कथा आहेत, असे श्री. भडसाळकर म्हणाले.

* फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे पाचवे अखिल भारतीय अधिवेशन

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, नवी दिल्ली आणि केरळ पब्लिशर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले पाचवे अखिल भारतीय अधिवेशन तिरुअनंतपुरम, केरळ येथे संपन्न झाले.

दिनांक पाच ते सात नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या अधिवेशनाला दिल्लीच्या डायमंड बुक्सचे संचालक श्री नरेंद्रकुमार वर्मा, मेहता पब्लिशिंग

हाऊसचे श्री अनिल मेहता, साहित्य अकादमीचे श्री निर्मलकुमार भट्टाचार्य व डॉ. अशोक गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

विविध भारतीय भाषांमधील सर्व प्रमुख प्रकाशकांना एकाच छत्राखाली आणण्याच्या उद्देशाने 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' या संस्थेची १९९३ साली स्थापना झाली. तिचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. १९९३ व १९९५ साली आयोजित करण्यात आलेली अधिवेशने दिल्ली येथेच झाली. तिसरे अधिवेशन १९९९ साली पुण्यात तर २००० साली चौथे अधिवेशन कोट्टायम, केरळ येथे संपन्न झाले.

यावर्षीच्या पाचव्या अधिवेशनाला सर्व प्रमुख भारतीय प्रकाशकांची उपस्थिती होती. यात एकूण नऊ चर्चासत्रे झाली. यात वाचनसंस्कृती समाजात टिकविण्याची आवश्यकता, परदेशी प्रकाशकांचा प्रकाशन व्यवसाय व वितरण व्यवस्था, पोस्टाचे वाढते दर, कागदाची वाढती किंमत, इतर माध्यमांसोबतची तीव्र स्पर्धा आदी विषयांसंदर्भात ऊहापोह झाला.

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे अध्यक्ष श्री डी. एन. मलहोत्रा यांनी भारतीय प्रकाशन व्यवसायाची सद्य:स्थिती व आगामी वाटचाल यासंदर्भात मार्गदर्शन केले तर पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष श्री. अनिल मेहता यांनी भारतीय प्रकाशकांच्या संघटनेची आवश्यकता, दर्जेदार ग्रंथांचे अनुवाद, कॉपीराईट आदी विषयांसंदर्भात मार्गदर्शन केले.

या अधिवेशनाचे आयोजन कोट्टायम येथील डी. सी. बुक्सचे संचालक श्री रवी डीसी यांनी केले.

(संपूर्ण केरळमध्ये श्री. रवी डीसी यांच्या प्रकाशन संस्थेची एकूण पस्तीस केंद्रे असून विशेष म्हणजे त्यांच्या प्रकाशन संस्थेचे दररोज किमान एक पुस्तक प्रकाशित होते.)

* 'शाकुंतल' – १२५ वर्षे...

रेव्हेन्यू कमिशनरच्या कार्यालयात काम करणारे अण्णासाहेब किर्लोस्कर व त्यांचे सहकारी आनंदोद्भव थिएटरात इचलकरंजीकर नाटक मंडळींचे 'तारा' हे नाटक पाहण्यास गेले. पण तिकीट न मिळाल्याने अप्पा बळवंत चौकातल्या थिएटरात पारशी रंगभूमीवरचं 'इंद्रसभा' हे गद्यपद्यात्मक पाहण्यास त्यांना जावे लागले. त्यातील संगीताने, संवादांनी प्रभावित होऊन आपणही मराठीत असा प्रयोग करावा, असा विचार त्यांच्या मनात आला. दुसऱ्या दिवशी पहाटेच त्यांनी 'शाकुंतला'चा पहिला अंक लिहून काढला. महाभारतातल्या आदिपर्वातल्या मूळ कथेवर कविकुलगुरू कालिदासांनी 'अभिज्ञान शाकुंतल'ने प्रतिभेचे लेणे चढवले.

रेव्हेन्यू खात्यातली काही सहकारी मंडळी, बाळाकोबा नाटेकर व मोरोबा वाघुलीकर यांच्यासारखे आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे, गोड आवाजाचे गायक नट यांच्या मदतीनं अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'संगीत शाकुंतल'ची तयारी केली.

पनवेलचे धनिक व रसिक गुळवे सावकार यांच्या उदार आश्रयानं, तसेच

केरुनाना छत्रे, नानासाहेब साठे यांच्या प्रोत्साहनानं 'संगीत शाकुंतल'ची रंगीत तालीम गुळवे सावकारांच्या रविवार पेठेतल्या तंबाखू आळीतल्या हवेलीत १३ ऑक्टोबर १८८० रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर झाली.

३१ ऑक्टोबर १८८० च्या रात्री आनंदोद्भव थिएटरचे तीन मजले रसिकांनी भरून गेले. 'परक्यांचे धन कन्या, ते त्या देऊनि आज मी सुटलो...' हे शेवटचं पद बाळकोबा नाटेकर यांनी गाऊन संपवलं तेव्हा प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. रसिक मान्यवर, लेखक यांनी 'शाकुंतल'ची मुक्त कंठानं प्रशंसा केली. पुढे शकुंतलचे आणखी तीन अंक लिहिले गेले. शाकुंतलेचं काम करणारे शंकरराव मुजुमदार यांना आवाजाची देणगी नसल्यानं सुरवातीला शकुंतलेच्या तोंडी पदं नव्हती, पण पुढे बालगंधर्व, भाऊराव कोल्हटकर, मा. दीनानाथ यांनी शकुंतला सादर केली व गाण्यानं रसिकांना रिझवलं. मूळ २०३ पदं असलेलं संगीत शाकुंतल आजही तरुण कलावंतांना आवाहन करतं. 'सौभद्र', 'रामराज्यवियोग' (अपूर्ण) ही नाटकं लिहून अण्णासाहेब किर्लोस्कर २ नोव्हेंबर १८८५ या दिवशी वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी मृत्यू पावले.

एकशे पंचवीस वर्षांपूर्वी 'शांकुतल'च्या नांदीचे सूर ज्या आनंदोद्भव थिएटरमध्ये घुमले ते पुण्यातलं पक्कं पहिलं नाटकगृह १८६४ रोजी बुधवार पेठेत तांबेकर यांनी आपल्या भल्यामोठ्या वाड्याचं रूपांतर करून बांधलं होतं. संगीत रंगभूमीचा भरभराटीचा काळ, उतरती, कळा, बोलपटाचा जमाना, काळाचा प्रहार असे चढउतार झेलीत 'आनंदोद्भव'ची वास्तू आज ४९४, बुधवार एवढा पत्ता ठेवून आहे. मूळ वास्तू वीस वर्षांपूर्वीच हस्तांतरित होऊन व्यावसायिक बिल्डरच्या हाती गेलेली आहे

* 'पृथ्वी'चा थिएटर मॅनिया आणि ब्रिटिश नाटक!

पृथ्वी थिएटर फेस्टिवल म्हणजे विविध भाषिक नाट्याविष्कारांचा अनेकरंगी उत्सव असतो, हे यंदाच्या आठव्या पृथ्वी नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा सिद्ध झाले. मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी रंगभूमीवरचे अनेक लेखक-दिग्दर्शक आणि कलावंत यांनी या महोत्सवात छोट्या छोट्या नाट्यकृतींचा मनोहर गोफ गुंफला. सर्वात मोठे आकर्षण होते ते इंग्लंडच्या 'कॉम्प्लिसिट' या ख्यातनाम कंपनीच्या 'मेजर फॉर मेजर' या नाटकाचे सात प्रयोग. ३ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत हा महोत्सव झाला.

४ तारखेला आयडियाज अनलिमिटेड या ग्रुपतर्फे 'मेस्ट्रो-मास्टर-स्वामी' या शीर्षकाचा बेकेट, चेकॉव्ह, स्ट्रिंडबर्ग आदी आठ नाटककारांच्या नाटकातले अंश घेऊन केलेला मनोज शहा दिग्दर्शित नाट्यप्रयोग झाला. ५ नोव्हेंबरला '३६ घंटे' हा अभिनव प्रयोग झाला. यात मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गुजराती रंगभूमीवरील प्रत्येकी चार नाटककारांनी दहा तास एकत्र बसून दहा मिनिटांचा

प्रत्येकी एक नाट्यप्रवेश लिहिला. याच भाषांतले प्रत्येकी तीन दिग्दर्शकांनी एकूण १२ प्रयोगांचे ४८ कलाकारांसह सादरीकरण केले.

'सेलिब्रेटिंग तेंडुलकर' हा छोटेखानी कार्यक्रमही झाला. याची सुरुवात खुद्द विजय तेंडुलकर आपल्या नव्या व प्रयोग न झालेल्या 'हिज फिफ्थ वुमन' या इंग्रजी नाटकाच्या वाचनाने केली. मकरंद देशपांडेचा 'सखाराम की खोज में हवालदार' हा हिंदी नाट्यप्रयोग, तसेच ते महोत्सवातील रामप्रहर, जन्मदाता, माझी बहीण, आमच्यावर कोण प्रेम करणार, वैऱ्याची रात्र, थीफ पोलीस हे नाट्यप्रयोग झाले.

* परदेशी चित्रित झालेला पहिला मराठी चित्रपट –'पैलतीर'

भारताबाहेर चित्रित केलेला पहिला मराठी सिनेमा म्हणून गाजत असलेला 'पैलतीर' अनिवासी भारतीयांची व्यथा मांडण्याचे काम करणार आहे. निर्माता अतुल सोमण आणि सहनिर्माता आनंद मुंदडा आता 'पैलतीर' पाठोपाठ 'शिखर' हा दुसरा मराठी सिनेमा लवकरच मलेशियात चित्रित करणार आहेत.

'श्वास'मुळे गाजलेले अरुण नलावडे आणि पुण्यातील रंगमंच आणि दूरदर्शन मालिकांमधून काम करणाऱ्या रमा जोशी यांची मध्यवर्ती भूमिका असलेला हा सिनेमा कॅनडातील श्याम जोशी यांनी दिग्दर्शित केला आहे. वि. वा. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'जवळ जाणारी ही कथा असली तरी 'पैलतीर' आजच्या व्यथा मांडतो, असे नलावडे यांनी सांगितले.

कॅनडातील टोरांटो, फिलीसॅगा, ब्रॉम्हन आणि नायगरा परिसरात हा सिनेमा प्रवास घडवतो, असे निर्माते आणि अभिनेते अतुल सोमण यांनी सांगितले.

पैशासाठी आपल्या जन्मदात्यांकडे पाठ फिरवणारी मुले हा वैश्विक प्रश्न मराठी माणसाच्या संदर्भात मांडला आहे. परदेशी स्थायिक होणे आणि घरातील मोठ्यांना विसरणे या शोकांतिकेबरोबरच माणसातील इतर गुंतेही उलगडण्याचा प्रयत्न हा चित्रपट करतो, असे नलावडे यांनी सांगितले.

* आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'ज्योतिर्गमय'!

रेल्वेच्या फलाटाला अंगण आणि जिन्याला निवारा समजून राहणाऱ्या असंख्य मुलांना आधार देणाऱ्या संस्थेवर एका पुणेकराने केलेला 'ज्योतिर्गमय' हा माहितीपट इटलीत फ्लॉरेन्स येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवडला गेला आहे.

या माहितीपटाचे लेखक आणि दिग्दर्शक धीरज अकोलकर म्हणाले, ''रेल्वेच्या फलाटावर काम करणाऱ्या अनेक लहानग्यांचा ठावठिकाणा त्यांनाच ठाऊक नसतो. अगदी कोवळ्या वयात त्यांना चांगली आणि वाईट अशी विविध प्रकारची कामे करण्याची सवय जडते. त्यातून होरपळणाऱ्या त्यांच्या बालपणाला योग्य मार्गावर आणण्याचे काम 'स्नेहालय'तर्फे सुरू आहे. फादर लुकोस चेरुवलेल

यांच्या पुढाकाराने, रेल्वे फलाटाच्या जगाबाहेरचे घर 'स्नेहालय'च्या पाच शाखांमध्ये राहणाऱ्या १७५ मुलांना मिळाले आहे.''

डोक्यावर छत नसणाऱ्या अशा अभागी मुलांची, त्यांच्या जीवनाची व्यथा सर्वांना समजावी, यातूनच 'ज्योतिर्गमय'चा जन्म झाला, असे स्पष्ट करून ते म्हणाले, ''या संस्थेमध्ये घरापासून दुरावलेल्या, नात्याचे माणूस हरवलेल्या अनेकांना हक्काचे घर प्राप्त होते. संस्थेच्या वर्धापनादिनी १६ ऑगस्टला हा माहितीपट गुवाहाटीत दाखविण्यात आला. इटलीमध्ये 'द रिव्हर टू रिव्हर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल'मध्ये १४ डिसेंबरला तो दाखविला जाणार आहे.'' ३८ मिनिटांच्या या लघुपटासाठी संगीत देणाऱ्या तराली सर्मा यांनी गुवाहाटीत 'स्नेहालय'च्या मदतीसाठी खास शो केला.

आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान'पासून 'ट्रेनी' म्हणून सुरुवात करणाऱ्या श्री. अकोलकरांनी 'देवदास', 'साला बंदर', 'चरस' अशा चित्रपटांसाठी कला दिग्दर्शक आणि प्रॉडक्शन डिझायनर म्हणून काम केले आहे. संजय लीला भन्साळी यांच्या 'ब्लॅक'साठी त्यांनी मुख्य सहाय्यक दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली.

पुणे विद्यापीठातून 'वास्तुविशारद' ही पदवी प्राप्त केल्यावर दृक्श्राव्य माध्यमाकडे वळण्याचे कारण स्पष्ट करताना ते म्हणाले, ''एखादी कल्पना विकसित झाल्यावर ती प्रत्यक्षात उतरेपर्यंतची चित्रपटाची सर्व प्रक्रिया ही वास्तु शास्त्राशी साधर्म्य असणारी आहे. त्या प्रक्रियेतील तंत्रात फरक असला, तरी त्याचे अनेक गुणधर्म समान आहेत.''

* 'निरोगी जीवनासाठी पंचसूत्री

शरीराची अंतर्बाह्य स्वच्छता, सकस व संतुलित आहार, नियमित व्यायाम, चांगल्या सवयी आणि निरोगी मन ही पंचसूत्री आरोग्य उत्तम राखण्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी केले.

मराठी 'रंगभूमी दिना' निमित्त अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या वतीने ज्येष्ठ रंगकर्मीचा डॉ. सरदेसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्याचबरोबर 'कलावंताचे आरोग्य' या विषयावर त्यांचे भाषण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाट्यपरिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष मनोहर कुलकर्णी होते.

* गीतांतून उलगडले भालजी

एकाहून एक गोड गाणी आणि जीवनातील हृदयस्पर्शी प्रसंग यांच्याद्वारे चित्रमहर्षी भालजी पेंढारकर यांच्या १९२३ ते १९८६ या काळातील कारकिर्दीचा आढावा घेणारा नक्षत्रांचे देणे हा कार्यक्रम झी मराठी आणि आयडिया यांनी आयोजित केला होता. पेंढारकर यांची हिमालयाएवढी कामगिरी मांडण्याचे अवघड काम होते, पण त्यातील मोजक्या टप्प्यांची सुरेख मांडणी करण्यात आली.

या जोडीला दृकश्राव्य माध्यमातून चित्रमहर्षींचे अनेक पैलू उलगडत गेले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्याविषयी भालजींनी काढलेले गौरवोद्‌गार सर्वांनाच भावून गेले. 'अवेळी गाणारी कोकिळा तुला पाहायची आहे का?' असे भालजींनी आपल्या पत्नींना विचारले आणि ही मुलगी पुढे उभी आहे ती पाहा, असे सांगितले. समोर लता मंगेशकर उभ्या होत्या.

'ऐरणीच्या देवा तुला', 'माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पाणी जातं', 'शूर आम्ही सरदार आम्हाला', 'आज शिवाजी राजा झाला' आदी एकाहून एक गोड गीते या वेळी सादर झाली. ही गीते राजेश दातार, अनुराधा मराठे, विभावरी आपटे, ऋषिकेश रानडे यांनी सादर केली. निवेदन स्मिता तळवलकर यांनी केले.

* जयवंत गंधाले यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

हडपसर उपनगरातील कवी जयवंत गंधाले यांच्या 'दूर जाताना...' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन सिनेअभिनेते अविनाश खर्शीकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी खर्शीकर म्हणाले की, उदयोन्मुख कवींनी साहित्यक्षेत्रात आपला ठसा उमटवायची गरज आहे. या वेळी पंचायत समिती सदस्य शंकर हरपळे, उद्योजक दशरथ जाधव, ग्रामपंचायत सदस्य राजाभाऊ होले, हडपसर साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सुधीर मेथेकर, नगरसेवक शिवाजी पवार आदी उपस्थित होते.

* 'सुरभी'चे वेगळेपण

''हल्ली गल्लोगल्ली सांस्कृतिक संस्था निर्माण होत आहेत; पण 'सुरभी कल्चरल ॲकेडमी'सारख्या संस्था संस्कृतीचे दालन उघडतात, तिचे रक्षण करतात. अशाच संस्था अभिरुचिसंपन्न समाज घडवतील,'' असा विश्वास ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी व्यक्त केला.

'सुरभी कल्चरल ॲकेडमी'तर्फे आयोजित 'पदन्यास' या कार्यक्रमात अभिनेत्री कविता लाड-मेढेकर आणि गायक संजीव अभ्यंकर यांना श्री. गोखले यांच्या हस्ते 'सुरभी नैपुण्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

श्री. गोखले म्हणाले, ''ज्या रंगमंचावर लय, ताल, संगीत, साहित्य यांचा विचार होतो, त्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव या संस्थेने केला हे महत्त्वाचे आहे.''

श्री. अभ्यंकर म्हणाले, ''पं. जसराज यांच्याकडे सलग दहा वर्षे राहून गाणे शिकत होतो. त्यामुळे गुणात्मक शिक्षण झाले. सुंदर कलाकृती उभारायची हेच लक्ष्य बनले. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रम ही माझ्यासाठी एक परीक्षा, पूजाच असते. लहानपणी प्रसिद्धी मिळाल्याने दडपण जरूर वाढले; पण आई-वडिलांनी माझ्या प्रसिद्धीचे कधीच भांडवल केले नाही.''

सौ. कविता मेढेकर म्हणाल्या, ''मालिकेत काम केल्यानंतर लोक त्या भूमिकेच्या नावाने ओळखतात. मात्र, नाटकातील कामामुळे माझ्या नावाने मला

लोक ओळखतात आणि तेच मला आवडते. नाटकातून जे शिकायला मिळाले, त्याच्या जोरावरच मालिकांमध्ये चांगली कामे करू शकले.''

संस्थेच्या विद्यार्थिनींनी विविध नृत्य प्रकार सादर केले. मधुरा लेले-कुलकर्णी यांचे नृत्यदिग्दर्शन होते. संस्थेच्या अध्यक्षा हेमा लेले यांनी प्रास्ताविक केले. राजेश दामले यांनी सूत्रसंचालन केले.

* 'राष्ट्राची उंची व श्रीमंती कृतार्थ व्यक्तीवर अवलंबून'

राष्ट्राची उंची व श्रीमंती ही त्या राष्ट्रभक्ती करणाऱ्या नि:स्पृह, सदाचार, नीतिमत्ता, सकस मानवी मूल्यांचे चिंतन करणाऱ्या जीवन निष्ठा, तत्त्वनिष्ठा बाळगणाऱ्या कृतार्थ व्यक्तीवर अवलंबून असते, त्यातील एक ज्येष्ठ पत्रकार व संत साहित्याचे गाढे अभ्यासक बापूसाहेब तथा चं. प. भिशीकर यांना जनसेवा पुरस्कार देऊन खऱ्या अर्थाने जनसेवा बँक कृतार्थ झाली असल्याचे संतसाहित्याचे अभ्यासक व विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी सांगितले.

पुरस्कारास उत्तर देताना बापूसाहेब भिशीकर म्हणाले की, पत्रकारांनी आपल्या जबाबदारीचे भान विसरू नये. माझ्यावर दोन महत्त्वाच्या गोष्टींचा प्रभाव होता. तो म्हणजे संस्कार करणारी संस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय संत. राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्यांनी सत्तेचीच अभिलाषा न ठेवता समाजाच्या सर्वांगीण विकासाचा विचार करावा. यावेळी मिळालेल्या पुरस्काराची रक्कम ५ संस्थांना वाटण्याचा संकल्पही भिशीकर यांनी सोडला. पुरस्काराचे स्वरूप शाल, रोख रक्कम २४०००रुपये असे होते.

* तिची कविता बहरते आहे 'शिफ्ट आल्ट डिलिटच्या' जंजाळातही...

कसं लिहू म्हणता बरंच काही लिहून गेले, मनाची दालने एक एक करत उलगडत गेले, अशी भावना काव्यातून व्यक्त करणाऱ्या पुण्याच्या प्रिया वैद्य हिचा कवितासंग्रह चक्क बोस्टनमध्ये प्रकाशित झाला. अमेरिकेत 'इंटेल' या जगप्रसिद्ध कंपनीत नोकरी करतानाही आपली प्रतिभा फुलवत ठेवलेल्या प्रियाने या साहित्यकृतीच्या माध्यमातून 'मराठी गोज् ग्लोबल' या विधानाला आणखी एक अर्थ बहाल केला.

इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विषयामध्ये पुण्यात पदवी, मुंबईच्या आयआयटीमधील शिक्षण, अमेरिकेतील ॲमहर्टस् येथील उच्च शिक्षण, त्याबरोबर भरतकाम-विणकाम, सतारवादन असे छंद जपणाऱ्या प्रियाचा ओढा साहित्याकडेही आहे.

काव्य हा माझा माझ्या मनाशी केलेला संवाद आहे, त्याला शब्दात गुंफले तर ते तुमच्या माझ्यातील नातं आहे, अशी आशयघन भाषेत कविता करणाऱ्या प्रियाने 'प्रथमा' ही साहित्यसेवेतली पहिली पायरी असल्याचे सांगितले.

इंग्रजी माध्यमात शिक्षण झाले असले तरी लहानपणापासून पुण्यामध्येच

मराठी साहित्याची गोडी लागली होती. त्यातूनच कदाचित या कवितेच्या ओळी उत्स्फूर्त आल्या असाव्यात! आत्तापर्यंतचे वाचन, विचार, काही अनुभव जसे भावले तसेच कवितेच्या ओळींमधून मांडण्याचा हा प्रामाणिक खटाटोप आहे, असे प्रिया सांगते.

'श्रावणसर', 'एका संध्याकाळी', 'फुलपाखरू', 'प्रतिबिंब', अशा कवितेमधून प्रियामधील संवेदनशील कवयित्री दिसते. 'शाळा' आणि 'खारुताई' यांच्यासारख्या बालकवितांपासून 'बंधन' आणि 'अनुभव' या जीवनाचे वैचारिक तत्त्वज्ञान मांडणाऱ्या गंभीर कवितांपर्यंत तिचा हा काव्यमय प्रवास आहे. 'मी जेव्हा एकटी असते, मी माझाच आरसा बनते' अशी अंतर्मुखता तिच्यात आहे.

* शतायू बालमासिक 'आनंद'

कोणत्याही प्रकारच्या सरकारी मदतीशिवाय मुलांसाठी काढण्यात येणाऱ्या 'आनंद' मासिकाने यावर्षीचा शतकमहोत्सवी दिवाळी अंक पालखीतून सनई-चौघड्याच्या मंगल सुरांसह प्रकाशित केला. प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झालेल्या या हृद्य सोहळ्याने अनेक ज्येष्ठ पुणेकरांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला!

शताब्दीत प्रवेश केलेला हा एकमेव दिवाळी अंक असून आपल्या बालपणात 'आनंद'चा मोलाचा वाटा आहे, अशी कबुली कुलकर्णी यांनी दिली. एवढंच नव्हे तर संपादिका पद्मा गोखले यांना पुढील कार्यासाठी २५ हजार रुपयांची देणगी डीएसके समुहातर्फे त्यांनी दिली.

* सुशीलकुमार शिंदे यांचे वाचनवेड

दलित म्हणून महाराष्ट्रात माझ्यावर कोणी आरोप करू शकत नाही. सर्व समाजांच्या हिताचा विचार केला. समाजाने दिलेल्या प्रतिभाशक्तीवर सर्व समाजांना उभे करण्याचा प्रयत्न केला. दलितांबरोबरच उच्च वर्गातील 'नाहीरे' वर्गासाठी कार्य केले. तेव्हाच नेतृत्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली. अन्य समाजातील लोक पाठीशी उभे राहिल्यानेच काही निर्णय घेऊ शकलो. खासगी क्षेत्रांत आरक्षण आणण्याचा निर्णय मी मुख्यमंत्री असताना घेतला. सर्व लोक पाठीशी उभे राहिल्यानेच ही हिंमत केली. आज भारत सरकार मात्र हे आरक्षण आणण्यासाठी मागे-पुढे पाहत आहे, असे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांनी स्पष्ट केले.

वीरशैव कक्कय्या समाजाच्या वतीने राज्यपाल शिंदे यांना विशेष जीवन गौरव पुरस्काराने पुण्यात सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात वयाच्या पासष्टाव्या वर्षापर्यंत किती काळ अंधारात राहावे लागले, किती झगडा करावा लागला याच्या आठवणी त्यांनी सांगितल्या. या हेलावणाऱ्या आठवणी ऐकताना त्यांच्या सुविद्य पत्नी उज्ज्वला यांच्या डोळ्यांच्या कडाही पाणवल्या.

एक आई व एक मुलगा दोघांमध्ये छटाक मटण आणायचं. मीठ- मिरचीच्या पाण्यात फरकटायचं आणि खायचं. हे सांगायला मला लाज वाटत नाही. पण परिस्थिती आता बदलली. चांदीच्या ताटात जेवण येतं. आयुष्यात असे होत असते, अशी भावुक जीवनकथा सांगतानाच राज्यपालांनी 'सुशील' कसा निर्माण झाला याची कहाणी ऐकवली.

माझं सुरुवातीचं नाव गेनबा. पण परिस्थितीच्या रेट्यात गेनबाचा दगडू कधी झाला आणि दगडूचा सुशील कसा झाला हे कळले नाही. आयुष्याशी नेहमी द्वंद्व करीत गेलो. 'तुफानाचा दिवा' यात मी हा झगडा सांगितला. तिथे फसलो असतो तर आज माझा सत्कार झाला नसता. अगदी आत्महत्येचा प्रयत्न डोकावला होता. कॉलेजमध्ये शिकताना मी कोर्टात लालकपडा घालून पट्टेवाल्याचे काम करीत होतो. त्यावेळी 'तो मी नव्हेच'च्या सय्यद काझीची केस सुरू होती. ती ऐकण्यास कॉलेजमधील मित्र-मैत्रिणी आल्या. कॉलेजच्या नाटकातील हिरो इथं पट्टेवाला म्हणून त्यांच्यात चर्चा सुरू होती. त्यांच्या मनात काय विचार असेल ही गोष्ट सतावत होती. एवढा अपमान सहन करण्यापेक्षा धरणीमाता पोटात का घेत नाही. हा विचार शिवला आणि तेथेच दगडू व्हायचे की सुशील हे द्वंद्व झाले. यात सुशीलकुमार विजयी झाला. दगडू संपला, तो परत कधी परतलाच नाही.

आयुष्याच्या सर्वच प्रवासात मजा लुटतो. कधी वाईट प्रसंग येतात. त्यातही झगडण्यात मौज आहे. शिव्या देऊन नव्हे तर युक्तिवाद व आत्मविश्वास यावर जिंकतो. त्यामुळे आत्मविश्वास कधी ढळू देत नाही. कधी कधी आयुष्याचा जमा-खर्च बघतो. त्यात कितीवेळ अंधारात काढावा लागला याची गोळाबेरीज करतो. पण हे प्रत्येकाच्या आयुष्यात घडते. त्याला एकटा सुशील अपवाद नाही.

धडपड थांबली तर पुढे जाऊ शकणार नाही या भावनेने सगळ्या गोष्टींकडे पाहतो, ही जीवनदृष्टी सांगताना आमचे जीवन कष्टप्रद गेले. तरुण मुलांनी गरिबी असली तरी दुसऱ्यावर अवलंबून राहू नये. प्रसंगी परिस्थितीला वाकवलं पाहिजे असा संदेश शिंदे यांनी दिला

* इंग्रजाळलेल्या उपरेपणामुळे हिंदी सिनेमा उतरणीला

इंग्रजाळलेल्या उपरेपणामुळे आजचा हिंदी सिनेमा उतरणीला लागला आहे. याचा फायदा घेत आशयघन साहित्य आणि बदलत्या आधुनिक तंत्राचे भान ठेवून मराठी सिनेमाने उत्तम निर्मितीसाठी पुढे सरसावले पाहिजे, अशी अपेक्षा प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी व्यक्त केली. बंडखोरी करून 'अस्सल मराठी वेगळेपण' जपायला हवे, असा सल्लाही त्यांनी तरुण दिग्दर्शकांना दिला.

नाट्य चित्र कला अकादमीच्या पहिले अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलनाचे

अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या या कार्यक्रमात डॉ. पटेल आणि उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार यांच्याहस्ते निर्मात्या दिग्दर्शक सुषमा शिरोमणी यांना चित्रवैभव पुरस्कार, पॅडी ऊर्फ पंढरीनाथ कांबळे यांना नाट्यवैभव पुरस्कार, अभय छाजेड यांना रसिक वैभव पुरस्कार, तसेच शरद वर्तक यांना रंगवैभव पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते निळू फुले यांच्याहस्ते सूर्यकांत तिवडे यांच्या 'तीन एकांकिका' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रसिद्ध अभिनेते श्रीकांत मोघे, राघवेंद्र कडकोळ, नृत्यकार-अभिनेत्री लीला गांधी, अखिल भारतीय मराठी तसेच चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष जय सरपोतदार, लेखक-दिग्दर्शक श्रीनिवास भणगे उपस्थित होते.

मल्टिप्लेक्सच्या आजच्या काळात तीन ते चार दिवसांमध्ये व्यावसायिकदृष्ट्या संपणाऱ्या हिंदी सिनेमापेक्षा मराठी सिनेमा नव्या जाणिवा घेऊन येत आहे. त्याची नोंद आजच्या दिग्दर्शक, कलावंतांनी घ्यायला हवी, असे डॉ. पटेल म्हणाले.

मराठी सिनेमाची जातकुळी आणि त्याचे वेगळेपण हे पौराणिक, संतपट, ऐतिहासिकपट, सामाजिकपट आणि निष्पाप विनोदपटांत आहे. याशिवाय कौटुंबिक सिनेमा, तमाशापट आणि आजच्या संपूर्ण बदलत्या अभिव्यक्तीच्या सिनेमांमुळेही मराठी चित्रपटसृष्टी व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होऊ शकेल, असेही ते म्हणाले.

* मुंबईत शेक्सपिअरची नाटके

नाटक करणं म्हणजेच राजकीय कृती करणं होय. त्यासाठी तुम्ही नाटकातून राजकीय विषय मांडण्याची गरज नाही. ते स्वभावत:च राजकीय असतं कारण ते वर्तमानाशी खेळतं, अशा निसंदिग्ध शब्दांत ब्रिटिश नाट्य दिग्दर्शक सायमन मॅकबर्नी यांनी आपली भूमिका मांडली आणि शेक्सपिअरसुद्धा चिरकाल टिकणाऱ्या वैश्विक गोष्टींबद्दल नव्हे तर वर्तमानातील घटनांविषयीच बोलत होता, असे सांगितले.

पृथ्वी थिएटर फेस्टिवलमध्ये शेक्सपिअरचे 'मेजर फॉर मेजर' हे नाटक सादर करण्यासाठी लंडनच्या 'कॉम्प्लिसिट' या थिएटर कंपनीला पाचारण करण्यात आले होते. या कंपनीतले प्रमुख कलावंत आणि 'मेजर फॉर मेजर'चे दिग्दर्शक सायमन मॅकबर्नी यांची ब्रिटिश कौन्सिलच्या सभागृहात संजाना कपूर यांनी मुलाखत घेतली. नाटकाच्या राजकीयत्वाविषयी आणि त्याच्या वर्तमानाशी शेक्सपिअरच्या नाटकांचा तुम्ही कसा संबंध जोडता, असे विचारले तेव्हा मॅकबर्नी उत्तरले की, शेक्सपिअर हा कुठल्याही काळातल्या वर्तमानाशी नाते सांगतोच. त्याची भाषा आणि नाटकातले संदर्भ हे तत्कालीन असले तरी तो अतिशय हुशारीने मानवी नातेसंबंध आणि त्यातली लैंगिकता मांडतो.

मॅकबर्नी म्हणाले, 'वर्तमान काळात विकत घेतलेल्या वस्तू लगेच भूतकाळात ढकलल्या जातात. जुन्या होतात. भांडवलशाही त्याच्यावरच जगत असते. वस्तू

चिरकाल टिकल्या तर भांडवलशाहीला धोका निर्माण होईल. पण नाटकात मात्र वर्तमानकाळच खरा असतो आणि तो ताणून, मोठा करून बघितलेला असतो.'

मॅकबर्नी यांनी आपल्याला शैली निर्माण करण्यात रस नसून नाटकातूनच उमलून येणाऱ्या त्याच्या अधिकाधिक शक्यता पडताळून पाहण्यात रुची आहे, असे सांगितले. ते वेगवेगळ्या रंगमंचावकाशात शेक्सपिअरची नाटके करतात.

अवकाशानुसार नाटकाच्या रचनेत बदल होतो आणि दरवर्षी वेगळा अनुभव येतो, हीच त्याची गंमत आहे, असे ते म्हणाले.

* पाकिस्तानातील पुस्तके पुण्यात

''फ्रेंडशिप थ्रू बुक्स असे माझे ब्रीद आहे. पुण्यात येऊन हे कर्तव्य पूर्ण केल्याची माझी भावना आहे. पाकिस्तानविषयी जाणून घेण्याची भारतीयांना अनिवार उत्सुकता आहे. तिच्यापोटीच मी भारतात येत असतो; येत राहीन,'' अशा शब्दांत पाकिस्तानातील प्रकाशक अहमदअली शेख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

'पुणे बुक फेअर'मध्ये शेख यांची लाहोरस्थित 'पब्लिशर्स युनायटेड' ही प्रकाशनसंस्था सहभागी झाली होती. शेख हे १९८८ पासून दिल्ली, कोलकता, मुंबई, हैदराबाद, पाटणा, लखनौ आणि अलीगढमध्ये भरणाऱ्या पुस्तक प्रदर्शनांत भाग घेत आहेत. विशेषत:, दिल्लीला ते वर्षातून दोनदा भेट देतात. ''मात्र, अन्य शहरांच्या तुलनेत पुस्तकांचा पुण्यातील खप वाढण्यास अजून वाव आहे,'' असे नमूद करून शेख म्हणाले, ''तरीही मी समाधानी आहे. पुण्यात पहिल्यांदाच आलो, भेटीगाठी झाल्या आणि उभय देशांदरम्यान मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होण्यात आमच्या प्रकाशनसंस्थेने खारीचा वाटा उचलला.''

सुमारे ३६०० पुस्तके घेऊन आलेल्या शेख यांच्याकडील उर्दू पुस्तकांची संख्या ३०००; तर इंग्रजी पुस्तकांची संख्या ६०० होती. अन्य पुस्तके फारसी भाषेतील होती. 'उर्दू जाणणाऱ्यांची संख्या स्टॉलला भेट देणाऱ्यांत कमी होती,' असे सांगून शेख म्हणाले, ''तरीसुद्धा ५००-६०० उर्दू पुस्तके विकली गेली, हे विशेष. मुख्यत्वेकरून इंग्रजीत असणारी इतिहासाची पुस्तके विकली गेली. पाकिस्तानमध्ये इंग्रजी पुस्तकांच्या किमती भारताशी तुलना करता जास्त आहेत; कारण आमच्याकडे कागद, छपाई, बांधणीचे मूल्य अधिक आहे. आयात केलेली शाई, महाग कच्चा माल ही त्यामागची कारणे आहेत. शायर सरमोहम्मद इक्बाल यांची सुमारे ३५० पुस्तके आम्ही आणली होती; पण त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. उर्दू वाचनालयांचे ग्रंथपाल, विद्यापीठांतील प्राध्यापक यांनी प्रदर्शनाकडे पाठ फिरवली, असे वाटते.

दररोज भेट देणाऱ्या सुमारे ५००-६०० वाचकांमध्ये प्रामुख्याने सामान्यजनांचा भरणा होता. पुस्तके आणताना काहीच अडचणी आल्या नाहीत. मात्र, दिल्ली ते पुणे मार्गावरील वाहतुकीच्या सुमारे दहा हजार रुपयांच्या खर्चातून पुढील वर्षी सूट मिळाली, तर बरे होईल, असे ते म्हणाले.

ॲलिस्टर मॅक्लीन



'मी काही जन्मजात लेखक नाही कादंबरीकारही नाही मात्र मी कथाकार आहे' असे म्हणणाऱ्या ॲलिस्टर मॅक्लीनने आपल्या उत्कंठावर्धक कादंबऱ्यांनी जगाला अक्षरशः वेड लावले. १९६० ते १०७०च्या दशकात त्याच्या कादंबऱ्यांनी विक्रीचे सर्व उच्चांक मोडले. नौदलातील सैनिक म्हणून अनुभव घेतलेल्या मॅक्लीनने त्याच्या कादंबऱ्यांमधून बोटीवरील जीवनाचे अत्यंत सूक्ष्म दर्शन घडवले. त्याच्या कादंबऱ्यामध्ये अत्यंत बुद्धिमान खलनायक आणि त्याने निर्माण केलेली अत्यंत कठीण परिस्थिती पण त्याच्यावरही मात करणारा विलक्षण साहसी नायक असा साचा असूनही प्रत्येक कादंबरीतील थरार सर्वस्वी वेगळा असतो. त्याचा अनुभव विलक्षणच!

ॲलिस्टर मॅक्लीनच्या काही पुस्तकांचे अत्यंत सरस मराठी अनुवाद आम्ही सादर केले आहेत. हे सर्व अनुवाद **अशोक पाध्ये** यांनी केले आहेत.

फिअर इज द की

अब्जावधी डॉलर्सच्या संपत्तीची लूट करणाऱ्या क्रूर गुन्हेगारांशी एका झपाटलेल्या माणसाने आकाश, जमीन तसेच समुद्रतळाशी दिलेली थरारक झुंज...प्रचंड गाजलेली उत्कंठावर्धक कादंबरी

किंमत : **१६०रु.**

द गोल्डन गेट

अमेरिकेच्या अध्यक्षांना ओलीस ठेवून गोल्डन गेट पूल उडवण्याचं सूत्रबद्ध कारस्थान... आणि ते कारस्थान उलथून टाकणारी केवळ एका व्यक्तीची थक्क करणारी साहसी मोहीम...

किंमत : **२२०रु.**

द गोल्डन रॉन्देव्हू

दक्षिण अमेरिकेतील एका देशात क्रांती घडते. क्रांती झाली पण देशाची तिजोरीही रिकामी झाली. शेवटी त्या हुकूमशहाने चाचेगिरी करून देशासाठी पैसा मिळवण्याची योजना आखली, तसे घडत गेले... पण ...पुढे काय घडलं?

किंमत : **२००रु.**

द डार्क क्रुसेडर

अचानकपणे प्रकट होऊन शत्रूवर कोसळणाऱ्या 'डार्क क्रुसेडर'या क्षेपणास्त्राप्रमाणेच प्रत्येक पावलावर हार पत्करूनही शेवटच्या क्षणी शत्रूचा संपूर्ण विनाश घडवून आणणाऱ्या स्फोटक नायकाची आणि त्याच्या विलक्षण साहसी विजयाची थरारक कहाणी.

किंमत : **२४०रु.**

साऊथ बाय जावा हेड

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सागरावरील युद्धाच्या भीषण छायेत एक तेलवाहू बोट प्रवास करीत होती... जपानची आक्रमणाची लष्करी गुपिते चोरून नेणारा हेर, बहुमोल हिरे नेणारी व्यक्ती,आणि या धामधुमीत सापडलेले २ वर्षाचे अनाथ पोर.... अशा अनेक थरारक अनुभवातून फुलत गेलेली विलक्षण थरारकथा...

किंमत : **२५०रु.**

२००५ सालतील लोकप्रिय ठरलेली पुस्तके

पुस्तकाचे नाव	लेखक	किंमत
कादंबरी		
शिवा डान्सिंग : भारती कर्चनर	अनु : मंजूषा गोसावी	२५०/-
आभाळझुंज	अनंत भोयर	२००/-
सिटी ऑफ बोन्स: मायकेल कॉनेली	अनु : अजित ठाकूर	२४०/-
चाइल्ड ऑफ द होलोकॉस्ट: जॅक कुपर	अनु : सिंधू विजय जोशी	१३०/-
ओमेर्ता : मारिओ पुझो	अनु : अनिल काळे	२२०/-
गॉन फॉर गुड : हार्लन कोबेन	अनु : अजित ठाकूर	२५०/-
द डार्क क्रुसेडर : ॲलिस्टर मॅक्लीन	अनु : अशोक पाध्ये	२४०/-
साऊथ बाय जावा हेड :ॲलिस्टर मॅक्लीन	अनु : अशोक पाध्ये	२५०/-
फॉर युवर आईज ओन्ली : इयान फ्लेमिंग	अनु : अनिल काळे	१२०/-
सन्स ऑफ फॉर्च्यून : जेफ्री आर्चर	अनु. अजित ठाकूर	३५०/-
समर्पिता	शरद दळवी	२२०/-
लेडीज कूपे : अनिता नायर	अनु : अपर्णा वेलणकर	२५०/-
टॉक्सिन : डॉ. रॉबिन कुक	डॉ. प्रमोद जोगळेकर	२५०/-
मूनरेकर : इयान फ्लेमिंग	अनु. उदय नारकर	१५०/-
संभाजी	विश्वास पाटील	३८०/-
लोकसखा ज्ञानेश्वर	आनंद यादव	३५०/-
कथासंग्रह		
काबुलीवाला आणि इतर कथा : रवीन्द्रनाथ टागोर	अनु : मृणालिनी गडकरी	१००/-
दोस्त	व. पु. काळे	१२०/-
खेकडा	रत्नाकर मतकरी	८०/-
निरपराध बळी	व. कृ. जोशी	१००/-
कुंकू पुसणारा हात	व. कृ. जोशी	१४०/-
कबंध	रत्नाकर मतकरी	१००/-
निर्मनुष्य	रत्नाकर मतकरी	१००/-

का रे भुललासी	व. पु. काळे	१२०/-
पाऊलवाटेवरले गाव	आशा बगे	११०/-
प्रतिद्वंद्वी	आशा बगे	१२०/-
चित्तचित्रे	संपा. अरुण शेवते	९०/-
शोधकथा इन्स्पेक्टर व्ही.अनंतांच्या	प्रा.अनंत वासुदेव वाईकर	१६०/-
सिरसी	सतीश सुरवसे	७०/-
गोल गोल राणी	स्वाती चांदोरकर	१००/-
कवडसे	योगिनी वेंगुर्लेकर	१२०/-
ऑक्टोपसी : इयान फ्लेमिंग	अनु. जयमती दळवी	८०/-
मध्यरात्रीचे पडघम	रत्नाकर मतकरी	१००/-
ललित		
स्वप्नी जे देखिले	संपा. अरुण शेवते	९०/-
वैचारिक		
मुग्ध कहाणी प्रेमाची	अनु. मीना टाकळकर	१२०/-
विज्ञानाच्या समाजधारणेवरील परिणाम : बर्ट्रांड रसेल	कमलाकर दीक्षित	१००/-
बंडखोर	अनु. माधुरी काबरे	९०/-
चरित्रे		
छत्रपती राजर्षी शाहू महाराज	तु. बा. नाईक	१००/-
जे. आर. डी. एक चतुरस्त्र माणूस	माधुरी शानभाग	१००/-
माहिती		
प्रवास - पर्यटनाचे नवे पैलू	यशोधरा भोसले	१५०/-
खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ		
तारकांच्या विश्वात	पराग महाजनी	३५०/-
कलाविषयक		
भारतीय शिल्प वैभव - प्राचीन मध्ययुगीन	डॉ. सु. र. देशपांडे	१५०/-
प्रवासवर्णन		
दक्षिणायन : केप हॉर्न ते कॅरिबियन	डॉ. रणजित मिरजे	२५०/-
विज्ञान विषयक		
विज्ञान प्रपंच (लेख)	डॉ. बाळ फोंडके	१५०/-
नवे शतक	निरंजन घाटे	१५०/-
खेळणीच खेळणी	डी. एस्. इटोकर	६०/-
ग्यानबाचं विज्ञान	डॉ. बाळ फोंडके	१३०/-
अंतरिक्षाचा वेध	सुधा रिसबूड	१५०/-

कथारूपी खगोलशास्त्र	लीना दामले	१००/-
व्यक्तिमत्त्व विकसन		
चला उठा कामाला लागा! : स्वाती शैलेश लोढा	अनु: अंजनी नरवणे	१२०/-
द मॅजिक ऑफ थिंकींग बिग : डेव्हिड जोसेफ श्वार्त्झ	अनु : प्रशांत तळणीकर	२००/-
आरोग्य		
पाणी : ए. आर. हरी	अनु: सुभाष जोशी	७०/-
आरोग्यासाठी योग	अनु.मंगेश कश्यप	८०/-
कार्यमग्न,व्यस्त लोकांसाठी योगसाधना : बिजयालक्ष्मी होता	अरुंधती महाम्बरे	५०/-
तणावमुक्तीसाठी योगसाधना : भरत ठाकूर	अनु. डॉ. सुभाष दांडेकर	५०/-
वजन कमी करण्यासाठी योगसाधना	अनु. डॉ. सुभाष दांडेकर	५०/-
नाटक		
तन-मन	रत्नाकर मतकरी	४०/-
मार्गदर्शनपर		
चला जाणून घेऊ या! चालणे	मोतिया बसर्गेकर	३०/-
चला जाणून घेऊ या! प्रथमोपचार	मंगेश कश्यप	२५/-
चला जाणून घेऊ या! वास्तुशास्त्र	स्वाती शहा	३०/-
चला जाणून घेऊ या! योगविद्या	मंगेश कश्यप	२५/-
चला जाणून घेऊ या! अंकशास्त्र	गंगाधर महाम्बरे	३०/-
चला जाणून घेऊ या! यशाचं रहस्य	सुभाष जोशी	३०/-
चला जाणून घेऊ या! हस्तसामुद्रिक	डॉ. वृषाली पटवर्धन	३०/-
चला जाणून घेऊ या! गुडघेदुखी	सुषमा शाळीग्राम	३०/-
चला जाणून घेऊ या! चक्रनाडी	सुभाष जोशी	३०/-
चला जाणून घेऊ या! अध्यात्मिकता	प्रशांत तळणीकर	३०/-
चला जाणून घेऊ या! पाण्याची अद्‌भुत शक्ती	सुभाष जोशी	३०/-
२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी : शेली बात्रा	अनु: गंगाधर महाम्बरे	१३०/-
मंत्र श्रीमंतीचा	श्याम भुर्के	१३०/-
क्रोशा विणकाम	प्रभावती पुरम	२००/-

साहित्यायन
२५वे साहित्य संमेलन
सटाणा- अध्यक्षीय भाषण

वाचकवर्गानेही चोखंदळ बनायला हवे

शंकर सारडा

साहित्यप्रेमी बंधूभगिनींनो,

सटाणा येथील साहित्यायन या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक व्यासपीठाद्वारे आयोजित पंधराव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मला दिल्याबद्दल प्रथमच साहित्यायनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी आभार मानतो. या संस्थेचे अध्यक्ष डॉ. मोहन माजगावकर, कार्यवाह प्रा. शंकरराव कापडणीस, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीपकुमार शहा, अन्य सदस्य आणि कार्यकर्ते... या सर्वांनी बागलाणमधील या सुपीक, समृद्ध भूमीमध्ये साहित्याचेही मळे फुलावेत, रसिकतेचे उदंड पीक यावे म्हणून चालवलेला हा संमेलनाचा उपक्रम- कविवर्य कुसुमाग्रजांच्या तपस्वी आशीर्वादाने अविरतपणे सुरू आहे आणि माधव गडकरी, वसंतराव कानेटकर, वसंत बापट, विजय तेंडुलकर, ना. धों. महानोर, शांता शेळके, केशव मेश्राम, वगैरे मान्यवर साहित्यकारांनी त्याच्या प्रतिष्ठेत मोलाची भर टाकलेली आहे. त्यामुळे या खुर्चीवर बसताना मला काहीसे संकोचल्यासारखे होत आहे. पत्रकारिता, बालसाहित्य आणि समीक्षा या क्षेत्रात गेली पन्नासावर वर्षे माझा वावर आहे; महाराष्ट्र टाइम्सच्या रविवार पुरवणीचा संपादक म्हणून १९६२ ते १९६८ या आरंभीच्या पर्वात काम करण्याची संधी मला मिळाली. साप्ताहिक साधना, दैनिक ऐक्य (सातारा), दैनिक देशदूत (पुणे), लोकमत, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ललित, मराठी ग्रंथजगत यांच्याशी संपादक—सहसंपादक म्हणून मी संबंधित होतो. दोन हजारावर पुस्तकांवर मी समीक्षात्मक लेखन केले आहे. पन्नासावर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार आणि सरस्वती सन्मान पुरस्कार यांच्या प्रादेशिक निवड समित्यांवर एक सदस्य म्हणून मी काम केले आहे. अनेक वाङ्मयीन उपक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, संमेलने यांचे आयोजन केले आहे. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत वाङ्मयीन क्षेत्राशी आणि नव्याजुन्या लेखक-कवींशी संपर्क... याद्वारे मराठी साहित्यमंदिराच्या या प्रांगणात एक भाविक म्हणून, अभ्यासक म्हणून वावरता आले याची धन्यता निश्चितच वाटते... म्हणून आपण दिलेल्या या सन्मानाचा नम्रतापूर्वक स्वीकार करतो. आपल्या औदार्याचा, मोठेपणाचा हा आविष्कार... त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

मराठी साहित्यक्षेत्राचा व्याप विस्तार आणि दबदबा आज वाढत आहे. गावोगावी भरणारी साहित्यसंमेलने, अक्षरधारा-शुभम् साहित्य-साहित्ययात्रा वगैरे संस्थांतर्फे

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात भरणारी ग्रंथप्रदर्शने, प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची वाढती संख्या, प्रकाशनसंस्थांची व ग्रंथविक्रेत्यांची संख्या, वृत्तपत्रांचा वाढता खप, साहित्याला देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची संख्या, पुस्तक प्रकाशनसमारंभाची मांदियाळी, वाङ्मयीन कार्यक्रमांची रेलचेल– या सर्वांकडे लक्ष दिले तर ग्रंथव्यवहार फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे याची खात्री पटते. पुस्तकांची बाजारपेठ ही कोट्यवधी नव्हे अब्जावधी डॉलर्स मिळवूना देणारी, निर्यातक्षम बाजारपेठ आहे याचे भान नव्यानेच येऊ लागले आहे.

हे सर्व आपल्याला आनंददायक, आशादायक आहे यात शंकाच नाही. आपण पुस्तके विकत घेऊन वाचतो आहोत, संमेलनांना हजारोंनी जमतो, कविसंमेलनांना दाद देतो; उत्तम गोष्ट आहे.

परंतु आपण कुठली पुस्तके जास्त घेतो? कुठली पुस्तके वाचतो? कुठल्या कार्यक्रमांना गर्दी करतो? असाही प्रश्न विचारायला हरकत नाही.

गेल्या वर्षी मराठीत 'इडली ऑर्किड आणि मी' या विठ्ठल कामत यांच्या पुस्तकाच्या दहा आवृत्त्या निघाल्या. तीस-चाळीस हजार प्रती खपल्या. 'मजेत जगावे कसे?' या शिवराज गोर्ले यांच्या पुस्तकाच्या दहा-बारा हजार प्रती खपल्या. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, रणजित देसाई, वि. स. खांडेकर यांच्या पुस्तकांच्याही नवनव्या आवृत्त्या निघाल्या. 'एक होता कार्व्हर'च्या २०वर्षांत एक लाखावर प्रती खपल्या, म्हणून नवी डीलक्स आवृत्ती काढण्यात आली. 'मी आणि माझा बाप' या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती निघाली. शिव खेरा यांच्या 'यश तुमच्या हातात' या पुस्तकाच्या ऐंशी हजार प्रती दोनतीन वर्षांत विकल्या गेल्या. ओशोंच्या पुस्तकांच्याही अनेक आवृत्ती निघाल्या. रुचिरा, अन्नपूर्णा, परफेक्ट रेसिपीज् यांच्याही नव्या आवृत्त्या निघाल्या... त्यामुळे ग्रंथव्यवहारात चैतन्य राहिले. पुस्तक प्रकाशकांच्या हाती पैसा खेळता राहिला.

परंतु ही अशी खूप खपणारी, वाचकांना हवीहवीशी वाटणारी पुस्तके... एक वाचक म्हणून आपल्या अभिरुचीची काय ओळख देतात?

वरवर जरी या पुस्तकांकडे लक्ष दिले तरी असे दिसेल की ही पुस्तके प्रामुख्याने रंजनपर आणि माहितीपर आहेत; उपयुक्त आहेत. आत्मचरित्रात्मक वा चरित्रात्मक आहेत. व्यक्तिमत्त्व विकास, व्यवस्थापन, पाककला, उद्योजकांच्या यशोगाथा, अध्यात्म-धर्म-आरोग्य याबद्दलची आहेत. पु.लं.ची आणि व.पुं.ची पुस्तकेही विनोदी, गुदगुदल्या करणारी, नाट्यपूर्ण– मुख्यत्वे रंजनात्मकच आहेत.

पण या रंजनाच्या गरजेपलीकडे आपण कधी जाणार की नाही?

आपण साहित्य वाचतो ते दोन कारणांसाठी.

एक रंजन, दुसरे उद्बोधन. भाष्य. जीवनदर्शन.

रंजनात्मक साहित्य हे आपण केवळ सुटका, टाइमपास, वास्तवापासून पळ

काढण्यासाठी वाचतो, वापरतो. हे साहित्य आपल्याला वास्तवापासून दूर नेते. याचाच अर्थ रंजनात्मक साहित्य हे पलायनवादी असते.

आणि याच्यापेक्षा वेगळे असे जे साहित्य असते त्याला जीवनावर भाष्य करणारे, जीवनाचा अर्थ उलगडून दाखवणारे, गंभीर, ललित साहित्य असे म्हणता येते.

मात्र याचा अर्थ असा नव्हे की दोन मोठी खोकी घ्यावीत, आणि एकात रंजनवादी साहित्य टाकावे, दुसऱ्यात भाष्यात्मक, ललित साहित्य टाकावे.

खरेतर ही दोन टोके आहेत आणि साहित्य हे या दोन टोकांमध्ये वावरात असते. निखळ रंजनात्मक किंवा निखळ भाष्यात्मक असे काही नसते. या दोहोंची कमीजास्त सरमिसळ प्रत्येक कृतीत असते.

ललित साहित्य हे अशा ट्रिक्सपेक्षा अधिक काही देते. ते आपल्याला मानवी मनाचे, अंतर्विरोधाचे, सुखदु:खाचे नवे भान देते. जीवनाचे जे सत्य त्याला भिडवते. अस्वस्थ करते. आपली गृहीतकृत्ये बदलायला लावते. वरवर जे दिसते त्यापेक्षा अधिक काहीतरी पडद्याआड दडलेले आहे हे ते दाखवून देते. जीवनाबद्दल नवी अंतर्दृष्टी देते.

इतिहास आणि ललित साहित्य यातला फरक सांगताना फ्रेंच तत्त्वज्ञ डिडेरो याने म्हटले आहे, ''इतिहासात सन आणि व्यक्तींची नावे सोडली तर बाकी सर्व काल्पनिक असते; तर ललित कृतीत सन आणि व्यक्तींची नावे सोडली तर बाकी सर्व खरे असते.''

The truest history is full of falehoods and your romance is full of truths.

हे लक्षात घेतले की आणखी एका द्वंद्वाकडे आपणास जाता येते.

वाचक म्हणून आपण कोणत्या प्रकारात पडतो?

साहित्य जसे दोन प्रकारचे- रंजनात्मक आणि ललित-भाष्यात्मक; तसे वाचकही दोन प्रकारचे असतात. एक सामान्य; दुसरे चोखंदळ आणि प्रगल्भ. सुजाण.

सामान्य वाचक रंजनपर साहित्यात रमतो. त्याची अपेक्षा माफक असते. दोन घटका मजा. रहस्यकथा, भयकथा, प्रेमकथा, गुन्हेगारकथा, विनोद... त्याला तेवढ्यापुरती गंमत हवी असते. तो नाटकाला जातो. दोन घटका हसण्यासाठी. स्वत:ला विसरण्यासाठी.

पण प्रगल्भ वाचकाला कसदार, पौष्टिक, पोषणमूल्ये असणारे साहित्य हवे असते. वाचलेल्या पुस्तकातून त्याला जास्तीत जास्त लाभ मिळावा असे वाटते.

आज रंजनपर साहित्याला अधिक मान्यता आणि महत्त्व.

त्यामुळे उत्तम दर्जेदार ललित साहित्याकडे बहुसंख्य वाचकांचे दुर्लक्ष होत आहे. त्याची उपेक्षा होत आहे. ही परिस्थिती भयावह आहे. अंतर्मुख करणारी आहे.

एक उदाहरण देतो.

गेल्या वर्षी 'जिहाद विरुद्ध इन्किलाब' ही लक्ष्मीकांत देशमुख यांची कादंबरी

प्रसिद्ध झाली. हजार पृष्ठांची. अभ्यासपूर्ण. अफगाणिस्तानच्या पार्श्वभूमीवरची. पन्नास वर्षांतील घटनांचा मागोवा घेणारी. आंतरराष्ट्रीय राजकारण-धर्मकारण-दहशतवाद-मूलतत्त्ववाद यांचा संघर्ष चितारणारी... परंतु या कादंबरीचा व्हावा तसा उठाव झाला नाही... गेल्या वर्षी तिला खरे तर महत्त्वाचे पुरस्कार मिळायला हवे होते. महाराष्ट्र फाउंडेशन, प्रियदर्शनी, दमाणी, साहित्य अकादमी... पण अजून ती कादंबरी वाचक-समीक्षकांपर्यंत नीट पोहोचलीच नसावी. तिच्यावर समीक्षणेही फारशी आली नाहीत.

असे अनेक कृतींबद्दल, लेखकांबद्दल सांगता येईल.

आपले वाचक, आपले समीक्षक, आपले संपादक, आपले संमेलनांचे आयोजक हे नव्या प्रतिभेचा शोध घेण्यात, तिला दाद देण्यात कमी पडतात. त्यामुळे दुय्यम दर्जाच्या रंजनात्मक पुस्तकांची वाहवा होते; दुय्यम दर्जाच्या राशीचक्र-वऱ्हाड चाललंय लंडनला वगैरे रंजनपर कार्यक्रमांची भलामण होते; पण उत्तम कलाकृतींकडे मात्र दुर्लक्ष होते.

चोखंदळ वाचकांनी त्यासाठी जागृत व्हायला हवे. जागरूक रहायला हवे.

त्यादृष्टीने जागोजाग जागरूक वाचकांनी आपले छोटे छोटे गट करून, नवीन चांगल्या पुस्तकांची खरेदी करून त्यावर चर्चा करायला हव्या. त्यासाठी वाचकवृंद किंवा वाङ्मयीन अड्डे सुरू करायला हवेत. अशा चर्चांतून, नवीन उत्तम कृतींकडे लक्ष जाणे, त्यांचा प्रसार होणे ही गोष्ट सुलभ होईल. नव्या लेखकांना योग्य वेळी प्रोत्साहन मिळाले, दाद मिळाली तर त्यांचे बळ वाढेल. त्यांची निर्मिती वाढेल. अशा उत्तम कृती अनुवादित होऊन इंग्लिश व इतर जागतिक भाषांमध्ये जाऊ शकतील.

मराठीत आज माहितीपर, रंजनात्मक, आत्मवृत्तात्मक, व्यक्तिमत्त्व-व्यवस्थापन विकासात्मक साहित्याला जो उठाव मिळत आहे, तो तर मिळत रहावाच; पण त्यापलीकडेही अधिक महत्त्वाचे ललित साहित्य हे दालन आहे याचे विस्मरण होऊ नये.

त्यासाठी जागरूक, चोखंदळ वाचकवर्गाची गरज आहे. अभिरुचीची गरज आहे. अशी संमेलने म्हणजे अशा चोखंदळ, अभिरुचिसंपन्न वाचकांची प्रेरणास्थळे बनावीत.

पुन्हा एकदा आपल्या सर्वांना धन्यवाद.

(२३ ऑक्टोबर २००५ रोजी सटाणा येथे झालेल्या १५व्या साहित्यायन साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. वसंतराव पवार यांनी केले. आजच्या काळातील लेखकाची जबाबदारी परिसंवाद (एकनाथ पगार, राणी दुर्वे, सुधीर देवरे, डा. धोंगडे), कविसंमेलन (सुनंदा भोसेकर) वगैरे कार्यक्रम यात झाले.)



जेआरडी
एक चतुरस्त्र माणूस

माधुरी शानभाग

किंमत १००रु.

'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान मिळवलेले पहिले अन् एकमेव उद्योगपती जेआरडी टाटा यांनी उद्योगाचा विकास करताना ' जे देहाच्या भल्याचे ते टाटांसाठी उत्तमच असेल' हा विचार प्रधान मानला. नीतीमूल्यांची बूज राखत व्यवहार, उद्योग चालवणारे हात अन् मने जपणे , समाजातून मिळवलेली संपत्ती समाजाच्या विकासासाठी वापरणे, उद्योग उभा असलेल्या परिसराचा विकास ही टाटा उद्योगसमुहाची संस्कृती आहे. नव्याचे स्वागत करत जेआरडींनी अनेकजणांना घडवले, नव्या वाटा खोदल्या, नवे मापदंड निर्मिले. त्यांना लाभलेला उज्ज्वल वारसा, व्यक्तिमत्वाची जडणघडण, नवे आयाम मिळत विकसित झालेले त्यांचे समृद्ध, चतुरस्त्र व्यक्तिमत्व याची ओळख या पुस्तकातील लेख करून देतात. विशेषत: अनेकविध भूमिकांना पुरून वर दशांगुळे उरणारा त्यांच्यातील सहृदय, रसिक, संभाषणचतुर, आनंदी माणूस वाचकाला अधिक भावतो.

पुरस्कार

* ब्रिटिश नाटककार हॅरॉल्ड पिंटर याना साहित्याचा नोबेल पुरस्कार

प्रख्यात ब्रिटिश नाटककार हॅरॉल्ड पिंटर यांना साहित्याचा नोबेल पुरस्कार घोषित झाला आहे.

७५ वर्षीय पिंटर यांनी उच्च साहित्यिक मूल्य असलेल्या नाट्यलेखनाची परंपरा पुनरुज्जीवित केली, असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांच्याविषयीच्या सन्मानपत्रात करण्यात आला आहे.

पिंटर यांची 'द रूम', 'द बर्थडे पार्टी', 'द डम्ब वेटर' आणि 'द केअरटेकर' ही नाटके गाजली आहेत. जन्माने ज्यू असलेल्या पिंटर यांना 'योम किप्पूर या ज्यूंच्या सर्वात महत्त्वाच्या दिवशी हा पुरस्कार घोषित झाल्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला.

मूळ भारतीय वंशाचे पण सध्या इंग्लंडमध्ये वास्तव्य असलेले सर व्ही. एस. नायपॉल यांना २००१ मध्ये साहित्याचाच नोबेल पुरस्कार मिळाला होता.

* डॉ. नारळीकर यांना चतुरंगचा जीवनगौरव पुरस्कार

जीवनात सुरुवातीला आपण काय करायचे ठरवितो ते सर्वच पूर्ण होतेच असे नाही. ठरविलेल्या काही गोष्टी पूर्ण तर काही अपूर्ण राहतात. आज लौकिक अर्थाने नोकरी अन् जबाबदारीतून निवृत्त झालो असलो तरी मनातील जिद्द आणि काम करण्याची इच्छा मात्र अद्यापही कायम आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी डोंबिवली येथे केले.

'चतुरंग प्रतिष्ठान'ने आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या रंगसंमेलनात शेवटच्या दिवशी 'चतुरंग'चा जीवनगौरव पुरस्कार डॉ. नारळीकर यांना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र उदगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरुण टिकेकर, निवड समितीचे सदस्य रवींद्र पिंगे, डॉ. प्र. ल. गावडे, डॉ. अशोक प्रधान, अविनाश धर्माधिकारी, डॉ. नारळीकर यांच्या पत्नी मंगला आणि विजय कुवळेकर उपस्थित होते. एक लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

आजचा हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद, अभिमान आणि संकोच

वाटत असल्याचे सांगून डॉ. नारळीकर म्हणाले की, चतुरंगसारखी संस्था पुरस्कार देत असल्याबद्दल आनंद, सर्वसामान्य नागरिकांनी दिलेल्या ऐच्छिक देणगीतून असलेला हा पुरस्कार असल्याने अभिमान आणि हा पुरस्कार मिळविलेल्या पूर्वसुरींच्या तुलनेत आपण कोठेच नाही म्हणून संकोच वाटत आहे. शेक्सपियर यांनी म्हटल्याप्रमाणे काही लोक जन्मत: मोठे असतात. काहींना कर्तबगारीने मोठेपणा मिळतो, तर काहींवर मोठेपणा लादला जातो. मी स्वत:ला या तिसऱ्या गटातील मानतो.

वेळेचा प्रत्येक क्षण ही संपत्ती असून हा क्षण हातातून निसटला की पुन्हा मिळत नाही. तो हातात आहे तोपर्यंत संधी घेतली पाहिजे, अशा अर्थाचे संस्कृत वचन जपानमध्ये पाहण्यात आले. त्यांनी वेळेचे महत्त्व ओळखले. आपण भारतीय मात्र हे महत्त्व ओळखू शकलो नाही अशी खंतही डॉ. नारळीकर यांनी या वेळी व्यक्त केली. एक उदाहरण देऊन डॉ. नारळीकर म्हणाले की, मोठी कामे करताना जो वेळ मिळतो त्यात आपली अन्य छोटी कामे करून घ्या म्हणजेच जीवनात जे लहान-मोठे उद्दिष्ट आपल्याला गाठायचे आहे त्यांना योग्य ते प्राधान्य द्या आणि मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून आपली कामे पूर्ण करा.

विजय कुवळेकर यांनी 'राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मानसन्मान आणि दिगंत कीर्ती लाभलेला पहिला मराठी शास्त्रज्ञ', अशा शब्दांत नारळीकरांचा गौरव केला. विज्ञान प्रसार आणि वैज्ञानिक निष्ठा रुजविण्याचे काम त्यांनी केले आहे. वयाच्या २१ व्या वर्षी ते रँग्लर झाले. २६ व्या वर्षी गुरुत्वाकर्षणाचा व विश्वरचनेचा सिद्धांत मांडला आणि अवघ्या २७ व्या वर्षी पद्मभूषण किताब मिळविला. नारळीकर यांनी मराठीतच विज्ञानकथेचे नवे पर्व सुरू केले. त्या कथेला त्यांनी मराठीपण व आधुनिकपण दिले. म्हणूनच आधुनिक मराठी विज्ञानकथेचे ते प्रणेते आहेत.

निवड समितीचे अध्यक्ष डॉ. टिकेकर यांनी नारळीकर यांचा 'महाराष्ट्राचा विवेक' या शब्दांत गौरव केला. 'चतुरंग'चे किरण जोगळेकर यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन प्रदीप भिडे यांनी केले. जीवनगौरव पुरस्काराच्या मानपत्राचे लेखन रवींद्र पिंगे यांनी केले असून प्रा. वीणा देव यांनी त्याचे वाचन केले.

* सामाजिक सांस्कृतिक आयुष्याची नव्याने मांडणी व्हावी

आपल्या कुटुंब, समाज, अर्थकारण, ऐतिहासिक, राजकीय, धर्मकारण आणि सांस्कृतिक आयुष्याची नव्याने मांडणी करायला हवी. त्याची सुरुवात आपल्या घरातूनच सुरू व्हावी आणि आवश्यकता वाटल्यास परंपराही मोडल्या पाहिजेत. त्यातूनच उत्तम असे डोळस आयुष्य निर्माण करता येईल, असा विश्वास प्रसिद्ध साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष केशव

मेश्राम यांनी व्यक्त केला.

केसरी मराठा संस्थेचा साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार 'ब्र' कादंबरीच्या लेखिका कविता महाजन यांना, तर रा. वि. वारदेकर पुरस्कार आरोग्यक्षेत्रात मोलाची कामगिरी करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दादा गुजर यांना देण्यात आला. 'केसरी'चे संपादक डॉ. दीपक टिळक समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.

१९४७ पासून आजपर्यंतच्या साहित्यिक, कलावंत आणि पत्रकारितेचा आढावा घेताना मेश्राम यांनी अभिजनवर्ग बहुजनांचे लेखन वाचत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. मर्ढेकरांच्या उक्तीप्रमाणे आज 'आम्हास आम्ही पुन्हा पाहावे, काढूना चष्मा डोळ्यावरचा' अशी स्थिती आहे, असे ते म्हणाले.

सर्व राजकीय पक्षांची 'श्रीमंत दुकाने' होत असून बुद्धिवादी, समाजसेवी पत्रकारांना विकत घेतले जात आहे. जादा पैसे मिळतात म्हणूनच ते एकीकडून दुसरीकडे जाताना दिसतात. म्हणूनच अखंड ५३ वर्षे 'केसरी'ची परंपरा ठेवणाऱ्या केळकरांना 'साहित्यसम्राट' पद शोभले. त्यांच्या साहित्याचेही नव्याने मूल्यमापन व्हायला हवे, अशी अपेक्षा मेश्राम यांनी व्यक्त केली.

पुस्तकाचा पहिला पुरस्कार केळकर यांच्या नावाने मिळाला, याचा आनंद आहे, असे उद्‌गार यावेळी कविता महाजन यांनी काढले. समविचारी लोकांशी संवाद साधायला लेखन हा एकच पर्याय आहे असे वाटते, असेही त्या म्हणाल्या.

* ना. सी. फडके पुरस्कार

मराठी साहित्यावर एकेकाळी अधिराज्य गाजवलेल्या फडके, खांडेकर, आचार्य अत्रे आदींच्या साहित्याची ओळख करून देणारी छोटी पुस्तके नव्या पिढीच्या हाती देण्याचे काम साहित्य संस्था आणि साहित्य संमेलने भरवणाऱ्या संस्थांनी करावे, अशी सूचना आंध्र प्रदेशचे राज्यपाल सुशीलकुमार शिंदे यांनी केली. 'ना. सी. फडके पुरस्कार प्रदान समारंभा'त प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे उपस्थित होते.

गेली अकरा वर्षे हे पुरस्कार दिले जात असून यंदाचा कादंबरीसाठीचा मुख्य पुरस्कार राजेंद्र बनहट्टी यांच्या 'मीपण माझे' या कादंबरीला देण्यात आला. 'फडके ललित गद्य पुरस्कार' सुभाष अवचट यांच्या 'स्टुडिओ' या पुस्तकाला, तर 'कमला फडके पुरस्कार' कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना देण्यात आला. विजय फडके यांनी प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले. ना. सी. फडके यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणाऱ्या अनेक आठवणीही त्यांनी सांगितल्या. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे यांच्यासारख्या लेखकांनी स्वप्रतिभेने मराठीच्या एका युगावर आपल्या साहित्याचा ठसा उमटवला. मराठी वाचकांसाठी फार मोठे धन ते ठेवून गेले; पण हे धन नव्या पिढीच्या हाती दिले गेले, तरच अत्रे, फडके, खांडेकर कोण होते, हे नव्या पिढीला कळेल. त्यासाठी साहित्य

संस्था आणि साहित्य संमेलने भरवणाऱ्या संस्थांनी या साहित्यिकांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या साहित्याची ओळख मराठी वाचकांना करून देणारी छोटी छोटी पुस्तके प्रकाशित करावीत, अशी सूचना शिंदे यांनी केली.

परीक्षक मंडळाच्या वतीने डॉ. प्रल्हाद वडेर यांनीही मनोगत व्यक्त केले.

* आत्माराम भेंडे यांना नाट्यगौरव पुरस्कार

कलागौरव प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांना 'नाट्यगौरव पुरस्कार' देण्यात येणार आहे.

गेल्या १४ वर्षांपासून हे पुरस्कार दिले जात आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यास जोडून 'नाट्यगौरव विशेषांका'चे प्रकाशन करण्यात येणार आहे. प्रदीर्घ नाट्यसेवेबद्दल देण्यात येणारे पुरस्कार गो. पु. देशपांडे आणि उषा नाडकर्णी यांना प्रदान करण्यात येणार असून, लोककलेसाठी काम करणाऱ्या वसंत अवसरीकर यांचा विशेष सन्मान केला जाणार आहे.

रोहिणी व कुसुम मांजरेकर या भगिनींचा कृतज्ञता सन्मान करण्यात येणार आहे, तर बालरंगभूमीसाठी कार्यरत असणाऱ्या मुंबईच्या विद्या पटवर्धन यांनाही गौरविले जाणार आहे. पुण्यातून नावारूपास आलेली कलाकार म्हणून सोनाली कुलकर्णीचा सत्कार केला जाईल.

* डॉ. राजेंद्र सिंह, अरुणा देसाई, गोपीनाथन नायर यांना जमनालाल बजाज पुरस्कार

मॅगसेसे पुरस्कार विजेते जलव्यवस्थापनातील ज्येष्ठ कार्यकर्ते राजेंद्र सिंह, गांधीवादी नेते पी. गोपीनाथन नायर, सामाजिक कार्यकर्त्या अरुणाबेन देसाई आणि जपानमध्ये गांधी विचारांचा प्रसार करणारे दायसाकू इकेदा यांना यंदाचे जमनालाल बजाज पुरस्कार नोबेल पुरस्कार विजोते अमर्त्य सेन यांच्या हस्ते, चार नोव्हेंबर रोजी देण्यात आले. रोख पाच लाख रुपये, स्मृतीचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

महिला व बालकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्त्या अरुणाबेन देसाई यांना, तर रचनात्मक कार्यात बहुमोल कामगिरीसाठी नायर यांना पुरस्कार देण्यात आला.

ग्रामीण विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाबरोबरच जलव्यवस्थापनासाठी केलेल्या कामाचा गौरव म्हणून राजेंद्र सिंह यांना, तर भारताबाहेर गांधीवादी विचारांच्या प्रसारासाठी इकेदा यांना पुरस्कार देण्यात आले.

माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. एच. एन. सेठना, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एअर चीफ मार्शल आय. एच. लतीफ आणि नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्षा एम. एस. स्वामीनाथन

यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने या मान्यवरांची निवड केली.

* मुक्त विद्यापीठाचे विशाखा पुरस्कार

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या गौरवार्थ दरवर्षी नवोदित कवींच्या पहिल्या काव्यसंग्रहाला विशाखा काव्य पुरस्कार देण्यात येतात.

प्रथम पुरस्कार रावजी राठोड यांच्या 'मलाण' या कवितासंग्रहाला, द्वितीय पुरस्कार एकनाथ पाटील यांच्या 'सत्त्वशोधाच्या कविता' या कवितासंग्रहाला, तृतीय पुरस्कार सुहास जेवळीकर यांच्या 'दहशतीची दैनंदिनी' या कवितासंग्रहाला देण्यात आला.

श्री. राठोड यांच्या कवितासंग्रहात संपन्न आणि सर्वसामान्य मराठी वाचकाला परिचित नसलेले अनुभवविश्व आणि बोलीभाषा महत्त्वपूर्ण आहे. श्री. पाटील यांच्या कवितासंग्रहात वास्तवाच्या अनेक अंगोपांगांना सामोरे जाताना आलेल्या भीषण व दाहक अनुभवांची ताकदीने मांडणी केली आहे. श्री. जेवळीकर यांनी शहरातील मध्यमवर्गीयांच्या धसमुसळेपणाचा आविष्कार केला आहे.

* प्रसाद सावकार यांना 'विष्णुदास भावे गौरवपदक'

''संगीत नाटक मराठी संस्कृतीतील अमूल्य ठेवा आहे. मात्र, सध्या संगीत रंगभूमीचा अस्त होतो की काय, अशी स्थिती आहे. जर नवा आकृतिबंध शोधला, तर भविष्यातही संगीत नाटक तरेल,'' असा विश्वास अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष सुरेश खरे यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ अभिनेते व गायक प्रसाद सावकार यांना 'रंगभूमीदिनी' सांगली येथील भावे नाट्य मंदिरात खरे यांच्या हस्ते 'विष्णुदास भावे गौरवपदक' देऊन गौरविण्यात आले. या वेळी ज्येष्ठ गायिका वर्षा भावे यांच्या नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

खरे म्हणाले, 'काळाप्रमाणे कलेतही परिवर्तन येते. भावे यांची रंगभूमी किर्लोस्कर, देवल आणि खाडिलकर यांच्या काळात बदलली. पुढे संगीत रंगभूमी ऱ्हासाला जात असतानाच विद्याधर गोखले यांनी नवसंजीवनी दिली. आतादेखील तीच अवस्था आहे. संगीत रंगभूमीची आवड असेली पिढी काळाच्या पडद्याआड चालली आहे. अशा वेळी संगीत रंगभूमीनेही कात टाकून नवा आकृतिबंध शोधण्याची गरज आहे. समकालीन समाजजीवनातील विषय घेऊन हा नवा आकृतिबंध साकारला पाहिजे, तरच नव्या पिढीलाही संगीत नाटकाबद्दल ओढ निर्माण होईल.''

प्रसाद सावकार यांनी सांगलीकरांनी केलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, ''देवल आणि भावे असे दोन श्रेष्ठ पुरस्कार देऊन मला सांगलीकरांनी आपलेसे केले आहे,'' असे ते म्हणाले.

* प्रा. वसंत कुंभोजकर यांना पुरस्कार

औरंगाबाद येथील धोंगडे परिवाराच्या वतीने 'श्रीनिवासराव व लक्ष्मीबाई धोंगडे' स्मरणार्थ देण्यात येणारा लक्ष्मी-श्रीनिवास पुरस्कार प्रा. वसंत कुंभोजकर यांना शिक्षणतज्ज्ञ वि. वि. चिपळूणकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सिडकोतील किलबिल प्राथमिक शाळेत झालेल्या सोहळ्यास डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. त्र्यंबक महाजन, प्रा. भगवान काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

* ई कालनिर्णयला ब्राँझ पुरस्कार

कालनिर्णय कॅलेंडरच्या ईकालनिर्णय या इलेक्ट्रॉनिक आवृत्तीला 'डिजिटल कम्युनिकेशन'मधील ब्राँझ पुरस्कार मिळाला आहे. २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या समारंभात हा पुरस्कार देण्यात आला. कालनिर्णयने १९९६ साली www.kalnirnay.com ही वेबसाइट सुरू केली. २००१ पासून कालनिर्णय ई-कॉमर्स तंत्राने मिळते. ते www.kalnirnay.com/e-kalnirnay.html या साइटवर उपलब्ध आहे.

* मराठी सिनेमाला ५ लाखांचा संत तुकाराम पुरस्कार

यावर्षीच्या चौथ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये उत्कृष्ट मराठी सिनेमांसाठी पाच लाख रुपयांचा 'संत तुकाराम पुरस्कार' देण्यात येणार असल्याचे या महोत्सवाचे संचालक डॉ. पटेल यांनी सांगितल. १९३७ मध्ये व्हेनिसमध्ये उत्कृष्ट सिनेमा ठरलेल्या 'प्रभात'च्या 'संत तुकाराम'वरूनच ही कल्पना मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मान्य केली. या स्पर्धेसाठी इंग्रजी सबटायटल्स असणे गरजेचे असून निवडक १० चित्रपट १२ ते १९ जानेवारी २००६ दरम्यान परदेशी ज्युरींपुढे दाखवले जातील. त्यातूनच उत्कृष्ट मराठी सिनेमाची निवड जाहीर करण्यात येईल.

* बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' कादंबरीला ग्रंथपुरस्कार

प्रसिद्ध ग्रामीण कादंबरीकार बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' या कादंबरीला अमरावती येथील जनसारस्वत वाचनालयातर्फे गुरूकुंज आश्रम, मोझरी, जि. अमरावती येथे दि. १९ व २० नोव्हें. २००५ रोजी आयोजित मराठी जनसाहित्य परिषदेच्या दहाव्या साहित्य संमेलनात डॉ. रवींद्र ठाकूर (कोल्हापूर) यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मातंग समाजाच्या दोन पिढ्यांच्या सत्त्वाचा, स्वाभिमानाचा, हक्कांच्या जाणीवांचा संघर्ष 'वारूळ' कादंबरीत चितारला गेला आहे. ही कादंबरी एक दिवस अख्ख्या महाराष्ट्राचे लक्ष वेधेल, असा विश्वास डॉ. आनंद यादव, प्राचार्य रा. रं. बोराडे, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. रावसाहेब कसबे, शंकर सारडा यांच्यासह अनेक मान्यवरांनी व्यक्त केला आहे.



तणावमुक्तीसाठी
योगसाधना

भरत ठाकूर

अनुवाद
डॉ. सुभाष दांडेकर
५० रुपये

कार्यमग्न,व्यस्त लोकांसाठी
योगसाधना

बिजयालक्ष्मी होता
अनुवाद
अरुंधती महाम्बरे
५० रुपये



वजन कमी करण्यासाठी
योगसाधना

भरत ठाकूर

अनुवाद
डॉ. सुभाष दांडेकर
५० रुपये

भारतीय संस्कृतीचा एक अभिमानास्पद घटक म्हणून योगशास्त्राला महत्व आहे. योगासने नियमित व शास्त्रशुद्ध रीतीने केल्यास आपले आरोग्य निरामय राहते. शरीर कार्यक्षम राहते. आपला देह आणि आपले मन यांच्यामध्ये उत्तम संतुलन राहते. शास्त्रशुद्ध योगसाधनेचे महत्व उलगडून सांगणारी ही छोटेखानी पुस्तके म्हणूनच उपयुक्त आहेत. आपल्या संग्रही ही पुस्तके असलीच पाहिजेत.

'चला जाणून घेऊ या' ही वेगवेगळ्या विषयांची परिपूर्ण माहिती देणारी मालिका आम्ही सादर करीत आहोत. दैनंदिन जीवनात पदोपदी आवश्यक ठरणाऱ्या, अनेक विषयांवर मार्गदर्शन करणारी ही पुस्तके

तुमच्या संग्रही हवीतच!

चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती	मोतिया बसर्गेकर	३०/-
चला जाणून घेऊ या! रेकी	शुभदा गोगटे	३०/-
चला जाणून घेऊ या! सुख	शुभदा गोगटे	३०/-
चला जाणून घेऊ या! फेंग शुई	शुभदा गोगटे	३०/-
चला जाणून घेऊ या! स्मरणशक्ती कशी वाढवावी?	शुभदा गोगटे	३०/-
चला जाणून घेऊ या! तणाव व राग	शुभदा गोगटे	३०/-
चला जाणून घेऊ या! चालणे	मोतिया बसर्गेकर	३०/-
चला जाणून घेऊ या! प्रथमोपचार	मंगेश कश्यप	२५/-
चला जाणून घेऊ या! वास्तुशास्त्र	स्वाती शहा	३०/-
चला जाणून घेऊ या! योगविद्या	मंगेश कश्यप	२५/-
चला जाणून घेऊ या! अंकशास्त्र	गंगाधर महाम्बरे	३०/-
चला जाणून घेऊ या! यशाचं रहस्य	सुभाष जोशी	३०/-
चला जाणून घेऊ या! हस्तसामुद्रिक	डॉ. वृषाली पटवर्धन	३०/-
चला जाणून घेऊ या! गुडघेदुखी	सुषमा शाळीग्राम	३०/-
चला जाणून घेऊ या! चक्रनाडी	सुभाष जोशी	३०/-
चला जाणून घेऊ या! अध्यात्मिकता	प्रशांत तळणीकर	३०/-
चला जाणून घेऊ या! पाण्याची अद्‌भुत शक्ती	सुभाष जोशी	३०/-

प्रत्येकी पोस्टेज २०रु. एकत्रित ३०रु.

शांततेनं काम करा!

मूळ लेखक : पॉल विल्सन
अनुवाद : सुनंदा अमरापूरकर

रोजच्या 'रुटीन वर्क' मधला तोचतोचपणा घालवून उत्तेजित कसे व्हावे, कामाचे समाधान कसे मिळवावे, याचे सहज सोपे मार्गदर्शन

'कामाचा ताण जाणवतो? रोजचे काम तुम्हाला ओझ्यासारखे वाटते का? मग हे पुस्तक तुमच्यासाठीच आहे. पुस्तकाचा उद्देश तुमच्या प्रश्नांचा नुसता ऊहापोह करणे, हा नसून त्याची उत्तरे शोधणे हा आहे. तुमचा व्यवसाय करणे तुम्हाला आनंददायक कसे करता येईल, हेच लेखकाला सांगायचे आहे. त्याच त्या कंटाळवाण्या कामात शांतता, समाधान मिळवायचे मार्ग तुम्हाला या पुस्तकाच्या प्रत्येक पानात दिसतील. काम करताना तुम्हाला स्वत:कडूनच अपेक्षित असलेली सर्व मदत कशी घेता येईल, याचे सोपे उपाय या पुस्तकात दिलेले आहेत. हे सर्व उपाय सर्वांगिण अभ्यास करून, संशोधन, चाचण्या करून मगच तुमच्यापर्यंत पोहोचवले आहेत. तणावरहित, सकारात्मक वातावरणात काम करा. आणि शांत होण्याचा आनंद अनुभवा.'

जानेवारी २००६ मध्ये उपलब्ध.

श्रद्धांजली

* निर्मल वर्मा

मराठी कथेतील साचलेपणा आणि साचेगिरी या विरोधात बंडाचा झेंडा साधारण १९५० च्या दशकात प्रथम उभारला गेला. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर आदी मंडळी त्या बंडातील बिनीचे शिलेदार. त्यांनी मराठी कथेच्या प्रवाहाला संपूर्णपणे वेगळे वळण दिले. त्याच सुमारास हिंदी भाषेतही नवकथेचा प्रवाह वाहू लागला होता. तो जोरकस करण्यात ज्यांचा हातभार लागला त्यातले एक अतिशय महत्त्वाचे नाव निर्मल वर्मा! अनेक भाषांमध्ये उगम पावलेल्या नवसाहित्याच्या त्या प्रवाहांना पार्श्वभूमी होती तत्कालीन समाजस्थितीची. महायुद्धांनंतर आलेली सर्वव्यापी विषण्णता, यांत्रिकीकरणाचा विलक्षण रेटा यामुळे जुने जपलेले असे बरेच काही मोडून पडत होते. जे नवे उद्‌भवत होते, ते स्वीकारणे फारच अवघड होत होते. हा सारा माहौल, त्यातून आलेले तुटलेपण-एकटेपण या साऱ्यांचे प्रतिबिंब पडले नवसाहित्यात. हे प्रतिबिंबही असे की पाहणाऱ्याची छाती भयाने, अस्वस्थतेने दडपूनच जावी! निर्मल वर्मा यांच्या लेखणीत तशी ताकद होती. वाचकाला अस्वस्थ करून सोडणारी, भोवतालचे वास्तव भान देणारी. 'परिंदे', 'जलती झाडी', 'कव्वे और काला पानी' यासारखे कथासंग्रह असोत की 'वे दिन', 'लाल टीन की छत' या कादंबऱ्या असोत, वर्मा यांच्या साहित्यातून अनेकदा सामोरा येत राहिला तो मध्यमवर्गीय माणूस. स्वत:ची मुळे हरवल्याच्या वेदनेचे ओझे माथी बाळगणारा. त्यांच्या साहित्यातील माणसे ही ओझी वाहत स्वत:च्या आणि एकूणातच अस्तित्वाचा अर्थ आपापल्या परीने शोधताना, लावताना दिसतात. अशा जातकुळीचे साहित्यिक बहुतांश स्वत:च निर्माण केलेल्या कोशात राहणारे असल्याचे दिसते. वर्मा मात्र त्याला अपवाद होते. राजकीय स्थितीचे सजग भान, स्वत:ची अशी ठाम राजकीय मते आणि ते मांडण्याचे धाडस ही त्यांची वैशिष्ट्ये म्हणता येतील. रशियाने झेकोस्लोवाकियावर स्वारी करताच कम्युनिस्ट पक्षाला दिलेली सोडचिठ्ठी, आणीबाणीविरोधात, विशेषत: संजय गांधी यांच्या विरोधात उठवलेला आवाज ही त्याची काही उदाहरणे. स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या अनेक साहित्यिकांनी त्या काळ्या पर्वात डोळे मिटून घेतले. तशा परिस्थितीत वर्मा यांच्यासारखे ठामपणे उभे राहणारे विरळाच. लघुनिबंध, रिपोर्ताज, डायरी यातून वर्मा यांची ही भूमिका अधोरेखित

होत राहते. खरे सांगायचे तर तीव्र राजकीय भान असतानाही कुठल्याही पोथीबंद विचारसरणीशी बांधील राहणे, वर्मा यांच्या प्रकृतीला मानवले नाही. त्यांचे लिखाण समग्र मानवतेलाच कवेत घेण्याचा प्रयत्न करणारे होते. या प्रज्ञावंताच्या आयुष्यातील अखेरचे पान नुकतेच मिटले.

* कवयित्री शैला सायनाकर

स्त्रीत्वाचा जोरदार पुरस्कार करताना कवितांमधून प्रकाशाची उधळण करणाऱ्या प्रथितयश कवयित्री आणि साहित्यिका प्रा. शैला ऊर्फ विजया बाबूराव सायनाकर (वय ५१) यांचे १ नोव्हेंबर रोजी मिरज येथील खासगी रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले.

इंग्रजी विषयाच्या प्रपाठक म्हणून त्या गेल्या ३० वर्षांपासून इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात कार्यरत होत्या. मुलींच्या छात्र विभागाच्या लेफ्टनंट म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम केले. महिलांविषयक चळवळी, अंधश्रद्धा निर्मूलन अशा उपक्रमांतही त्या हिरीरीने सहभागी होत असत. त्यांच्या 'कविता सायली'च्या या काव्यसंग्रहाला राज्यपुरस्कार मिळाला आहे. रक्तकमळाचे रान, पाणडोह, काळीज गोंदण, सखी हे त्यांचे प्रकाशित काव्यसंग्रह आहेत. ललित लेखनामध्ये सूर्यफुलाचा गाव, अजूनी वाढतात झाडे, क्षितिज हा अनुवादित कथासंग्रह, गिरीश कर्नाड यांच्या कन्नड व इंग्रजी नाटकांचा 'अग्निवर्षा' नावाने मराठी अनुवाद यांचा समावेश आहे. रहिमतपूरच्या साहित्यसेवा मंडळाचा कृतज्ञता पुरस्कार, मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार, शांतिरत्न पुरस्कार, संवेदना पुरस्कार, सागरेश्वर साहित्यिक पुरस्कार व कविवर्य बापूसाहेब ठाकरे वाङ्मय पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांचा गौरव झाला होता.

त्यांच्या 'सखी' या काव्यसंग्रहाला दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला होता. 'दिशा'चा प्रेरणा पुरस्कार, तोरु दत्त पुरस्कार, चंद्राई कदम स्त्री चळवळ पुरस्कारांनी त्यांची कारकीर्द उजळलेली होती. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह राज्यभरातील अनेक ठिकाणी त्यांनी कवितांचे वाचन केले होते. कवितेबरोबरच पुस्तक परीक्षण, परिचय, रेखाटने त्यांनी चित्रित केली होती. 'बुरख्याबाहेर' या सदराखाली त्यांनी 'दैनिक लोकमत'साठी लेखन केले होते. विविध दिवाळी अंकांमधून त्यांची लेख, कविता आणि रेखाटने प्रसिद्ध झाली आहेत.

ऋजुता, नम्रता आणि सृजनशीलता सहज, सुलभपणे प्रकट करणारी प्रत्येक कविता मनाचा ठाव घेणारी असायची. 'सखी' या काव्यसंग्रहातून त्यांनी स्त्रियांवरील अन्याय, त्यांची घुसमट रेखाटली आहे. कवितेशी नाते जोडून कलंदर आयुष्य जगणाऱ्या या कवयित्रीने कर्करोगाशीही तेवढ्याच हिमतीने मैत्री केली होती.

* योगिनी जोगळेकर

विविध प्रकारचे विपुल साहित्य लेखन करणाऱ्या आणि संगीतात रमणाऱ्या

प्रसिद्ध लेखिका व गायिका-अभिनेत्री योगिनी जोगळेकर (वय ८०) यांचे दि. १ नोव्हेंबर रोजी दुपारी निधन झाले.

श्रीमती जोगळेकर अविवाहित होत्या. गेला दीड महिना त्यांची प्रकृती ठीक नव्हती. पन्नासहून अधिक कादंबऱ्या, तीस कथासंग्रह, कवितासंग्रह, नाटके, बालवाङ्मय आणि लघुनिबंध संग्रह असे साहित्यातील अनेक प्रकार त्यांनी लेखनातून हाताळले.

त्यांचे शालेय शिक्षण हुजूरपागेत, तर महाविद्यालयीन शिक्षण स. प. महाविद्यालयात झाले. सरस्वती मंदिर शाळेत १९४८ ते १९५३ या कालावधीत त्यांनी शिक्षिका म्हणून काम केले.

गायिका म्हणूनही त्या प्रसिद्ध होत्या. त्यांच्या घरात संगीताचे वातावरण होते. भारत गायन समाजात त्यांनी संगीताचे रीतसर शिक्षण घेतले. शंकरबुवा अष्टेकर, बापूसाहेब केतकर आणि राम मराठे हे त्यांचे संगीतातील गुरू होते. 'पहिली मंगळागौर' या चित्रपटासाठी त्यांनी पार्श्वगायन केले होते, तर 'गीतरामायणा'तील 'सूड घे त्याचा लंकापती' हे गीत त्यांनी गायिले होते.

पं. भास्करबुवा बखले यांच्या आयुष्यावर त्यांनी 'या सम हा' ही कादंबरी लिहिली होती. राम मराठे यांच्यावर लिहिलेले 'रामप्रहर' या चरित्राचेही वाचकांकडून स्वागत झाले होते. भारत गायन समाजाच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्या कार्यरत होत्या. त्यांनी देश-परदेशात कथाकथनाचे; तसेच शास्त्रोक्त, नाट्य आणि सुगम संगीताचे अनेक कार्यक्रम केले.

'गुलबाक्षी', 'नाद-ब्रह्म', 'ऋणानुबंध', 'वादळफूल', 'अस्वस्थ', 'ज्योतिर्मयी', या त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय होत्या. 'रेषा', 'प्राची', 'साक्षात्कार', 'निरागस', 'शिलंगण' हे कथासंग्रह, तर 'रिमझिम', 'सूरगंध', 'कलापिनी' हे त्यांचे प्रसिद्ध झालेले कवितासंग्रह होत. 'मागील दार' 'तिसरी घंटा' आणि 'रंगात रंगला श्रीरंग' ही नाटके त्यांनी लिहिली होती. 'मातृसेवा', 'गुरुशिष्य', 'तीळगूळ', 'गोपाळकाला', 'वादळवारा' असे त्यांचे बाल आणि कुमारांसाठीच लेखनही प्रसिद्ध झाले.

* ख्यातनाम लेखिका अमृता प्रीतम

'रसिदी टिकट' हे वादग्रस्त आत्मचरित्र व देशाच्या फाळणीवरील पिंजर या कादंबरीमुळे गाजलेल्या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त प्रख्यात पंजाबी लेखिका अमृता प्रीतम यांचे ३१ ऑक्टोबरला दक्षिण दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्या ८६ वर्षांच्या होत्या.

त्यांनी शंभरहून अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाचे समीक्षकांनीही कौतुक केले. भारत, पाकिस्तान फाळणीविषयी त्यांनी लिहिलेल्या 'पिंजर' या कादंबरीवर तयार करण्यात आलेला चित्रपटही गाजला. त्या राज्यसभेच्या माजी सदस्या होत्या. 'रसिदी तिकट' हे त्यांचे आत्मचरित्र वादग्रस्त ठरले.

अमृता प्रीतम यांचा ३१ ऑगस्ट, १९१९ रोजी गुजराँवाला येथे जन्म झाला. फाळणीनंतर हा भाग पाकिस्तानमध्ये गेला. १९४७ साली देशाच्या फाळणीनंतर त्या नवी दिल्ली येथे स्थलांतरित झाल्या. येथे आल्यानंतर त्यांनी आपली मातृभाषा पंजाबीमधून लेखन करण्याऐवजी हिंदीतून लेखन सुरू केले. त्या १९६१ पर्यंत आकाशवाणीवर काम करीत होत्या. १९६० साली घटस्फोट झाल्यानंतर त्यांच्या लेखनावर स्त्रीवादाचा प्रभाव वाढला. वैवाहिक आयुष्यात त्यांनी सोसलेल्या दु:खाचे पडसाद त्यांच्या अनेक कथांमध्ये व कवितांमध्ये उमटलेले दिसतात. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्या त्या पहिल्याच लेखिका होत. त्यांना १९६९ साली पद्मश्री पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्य पहिल्या पंजाबी महिला आहेत. पंजाबी साहित्यामध्ये त्यांनी केलेल्या मोलाच्या योगदानाचा सन्मान म्हणून त्यांना १९८२ साली ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला. दिल्ली, जबलपूर आणि विश्वभारती या विद्यापीठांकडून त्यांना डी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली होती. त्यांचे वडील शालेय शिक्षक व कवी होते. त्य अकरा वर्षांच्या असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यामुळे त्यांना लहान वयातच मोठी जबाबदारी पेलावी लागली. त्याचवेळी त्यांनी आपल्या लेखनासही सुरुवात केली होती. केवळ सोळा वर्षांच्या असतानाच त्यांचा पहिला लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. त्याचवेळी त्यांचा एका प्रकाशकाशी विवाह झाला. त्यांचे निधन झाले त्यावेळी त्यांच्यासोबत प्रख्यात लेखक इमरोज उपस्थित होते. गेली काही दशके ते त्यांच्यासोबत राहत होते.

* दिनकर द. पाटील

दिनकर पाटील हे चिक्कोडी तालुक्यातील बेनाडी गावचे रहिवासी. कोल्हापूर संस्थानचे क्षात्र जगद्गुरू बेनाडीकर यांच्या कुटुंबीयांतील असलेल्या दिनकर द. पाटलांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बेनाडी येथे घेतल्यानंतर १९४० च्या सुमारास कोल्हापुरात स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये लेखन सुरू केले आणि १९४१ मध्ये मास्टर विनायक यांच्या 'हंस पिक्चर्स' द्वारे त्यांची मराठी चित्रपट व्यवसायात उमेदवारी सुरू झाली. एक शिस्तबद्ध आणि तितकाच भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा लेखक म्हणून त्यांची ख्याती होती. पाटील यांनी १९४७ पर्यंत 'हंस' मध्ये काम केले. पाटील खऱ्या अर्थाने ठळक प्रसिद्धीत आले ते 'मंगल पिक्चर्स'च्या 'जय मल्हार'मुळे. वामनराव कुलकर्णी आणि विष्णुपंत चव्हाण यांच्या या चित्रपटाचे संवाद दिनकर द. पाटलांनी लिहिले आणि तमाशाप्रधान मराठी चित्रपटांच्या नव्या पायवाटेचा आरंभ झाला. पाटील यांनी १०० हून अधिक चित्रपटांचे लेखन केले आणि ५० हून अधिक चित्रपट दिग्दर्शित केले. रामराम पाव्हणं, पाटलाचं पोरं, बेल भंडारा, मूठभर चणे, शिकलेली बायको, बाळ माझं नवसाचं, सुधारलेल्या बायका, कामापुरता मामा, पाटलाची सून, कुंकू माझं भाग्याचं, धन्य ते संताजी

धनाजी इथंपासून फटाकडी, कुंकवांच लेणं, गुणवंताची कन्या, मोसंबी नारंगी अशा अनेक चित्रपटाद्वारे त्यांनी स्वतंत्र ओळख मराठी माणसाच्या हृदयात निर्माण केली.

मराठी चित्रपटाच्या लेखन, दिग्दर्शनाबरोबर त्यांच्या मनाला चित्रपटाच्या निर्मितीनेही मोहिनी घातली होती. ७० च्या दशकात त्यांनी निर्मिती केलेला चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारसे यश देऊ शकला नसला, तरी कोल्हापूरची स्वराज्य संस्थापिका ताराराणीच्या जीवनावर चित्रपट काढण्याची त्यांची इच्छा होती. यानुसार शरीर थकलेले असतानाही त्यांनी या चित्रपटाची जिद्द सोडली नाही. त्यांनी निर्माण केलेला ताराराणी हा त्यांचा १०२ वा चित्रपट. चित्रपटाखेरीज नाटके, लघुनाटकेही त्यांच्या नावावर जमा आहेत. १९४४ साली त्यांनी लिहिलेल्या 'एरिना' या कथेला किर्लोस्कर मासिकाच्या कथास्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कथेचा पुरस्कार मिळाला होता. यानंतर मान, सन्मानाची ही परंपरा सतत चालू राहिली. त्यांच्या कुंकू माझं भाग्याचं या चित्रपटाला १९७४ मध्ये फिल्म फेअर पुरस्कार मिळाला. दिनकर द. पाटलांच्या कर्तृत्वाला १९८२ मध्ये ग. दि. मा. पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा चित्रभूषण पुरस्कार १९९५ मध्ये तर पी. सावळाराम (१९९८) व व्ही. शांताराम पुरस्काराने (१९९८) त्यांना सन्मानित करण्यात आले होते. कोल्हापूर महापालिकेने त्यांचा 'कोल्हापूर भूषण' पुरस्कार देऊन सन्मान केला होता.

* माजी राष्ट्रपती के. आर. नारायणन

भारतासारख्या खंडप्राय देशाच्या राजकीय व्यवस्थेतील सर्वोच्च मानाचे स्थान असलेले राष्ट्रपतिपद भूषविलेले कोचेरी रामन नारायणन दलित होते हे सांगून कोणाला खरे वाटणार नाही. उच्चविद्याविभूषित असलेल्या नारायणन यांनी आपल्या राष्ट्रपतिपदाच्या कारकीर्दीत देशातील उदार आणि धर्मनिरपेक्ष परंपराशी आपल्या विद्वत्तेचा आणि राजकीय परिपक्वतेचा घातलेला मेळ यामुळे त्यांची कारकीर्द प्रभावी ठरली. राजकीय नेत्यांच्या दडपणाला बळी न पडता आणि आवश्यक असेल तिथे आपली मते ठामपणे मांडणे हे त्यांचे स्वभाववैशिष्ट्य होते.

२५ जुलै १९९७ रोजी त्यांनी राष्ट्रपती पदाची सूत्रे स्वीकारली तेव्हा काही राजकीय पक्षांनी त्यांच्या दलित असण्याचा मुद्दा उपस्थित करून टीका केली होती. बिहारमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा प्रस्ताव त्यांनी फेटाळून लावला. शिक्षणतज्ज्ञ, उत्तम प्रभावी प्रशासक आणि पत्रकार असलेल्या नारायणन यांनी राजकीय क्षेत्रात मानाचे स्थान मिळविले होते. त्यामुळेच उपराष्ट्रपती म्हणून पाच वर्षे काम केल्यानंतर राष्ट्रपतिपदासाठीच्या त्यांच्या उमेदवारीला सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला होता. १९७०-१९७२ या काळात त्यांना जवाहरलाल नेहरू पाठ्यवृत्ती देण्यात आली होती. अनेक पुस्तकांचे लेखक असलेल्या नारायणन यांनी सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय तसेच साहित्य अशा विषयांवर विपुल लेखन केले.

लेडीज कूपे

आजच्या स्त्रीला आत्मनिर्भर होऊन, आत्मविश्वासाने स्वत:चा मार्ग चोखाळण्याचे स्वातंत्र्य मिळवता येईल

अनिता नायर अनु. अपर्णा वेलणकर

बंगलोरला राहणाऱ्या अनिता नायर या लेखिकेची 'लेडीज कूपे' ही 'द बेटर मॅन'नंतरची दुसरी कादंबरी पेंग्विनने प्रकाशित केली; आणि ती बेस्टसेलरच्या यादीत जाऊन बसली. तिचा मराठी अनुवाद अपर्णा वेलणकर यांनी केला असून मेहता पब्लिशिंग हाऊसने तो 'टी बुक क्लब'मध्ये समाविष्ट केला आहे.

'लेडीज कूपे' म्हणजे महिलांसाठी राखीव असणारा रेल्वेच्या डब्याचा कक्ष. काही टू-थ्री टायर स्लीपर कोचमध्ये सहा आसनांचा एक कोपरा हा स्वतंत्र दार असणारा असा असतो; त्यामुळे एकेकट्याने प्रवास करणाऱ्या महिलांना त्यात बसून प्रवास करणे सुरक्षित व सोयीचे वाटते. महिलांसाठी स्वतंत्र डबा वगैरे सोयीही असतातच.

अनिता नायर यांनी 'लेडीज कूपे' हे नाव आपल्या कादंबरीला दिले आहे कारण या कादंबरीतील सर्वच घटनांचे मूळ या लेडीज कूपेमध्ये बसलेल्या सहा महिलांच्या परस्पर परिचयात आणि पूर्वायुष्याच्या स्मरणरंजनात आहे. नायिका अखिला (अखिलनंदेश्वरी) ही पंचेवाळीस वर्षांची अविवाहित तमिळ ब्राह्मण तरुणी आयकर विभागात नोकरी करून आपल्या कुटुंबाचे भरणपोषण करीत असते. वडिलांच्या आकस्मिक निधनाने अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळवून, धाकट्या भावंडांचे शिक्षण-संगोपन करण्यावर लक्ष केंद्रित करते. भावंडांची लग्ने होतात; पण मिळवत्या अखिलाच्या लग्नाचे कुणीच मनावर घेत नाही. वय वाढत जाते... आणि तिचे सरळमार्गी आयुष्य बेचवपणे पुढे चालू राहते...

एके दिवशी तिला या सर्व चाकोरीबद्ध आयुष्याचा उबग येतो आणि आपण कुठेतरी भटकून यावे असे मनात येते. जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी आर्त अस्वस्थ असताना विवेकानंदांना केप कामोरिन, कन्याकुमारीला आत्मसाक्षात्कार झाला हे

तिला आठवते. आणि त्याच रात्री रेल्वेचे रिझर्वेशन मिळवून ती कन्याकुमारी एक्सप्रेसमधील लेडीज कूपेमध्ये स्थानापन्न होते. १९ डिसेंबर १९९७. एका रात्रीचा तर हा प्रवास!

या लेडीज कूपेमध्ये तिच्याशिवाय आणखी चार महिला असतात. पाचवी महिला पुढे दुसऱ्या एका स्टेशनवर चढणार असते. या सहा महिलांच्या जीवनकहाण्या या रात्रीच्या रेल्वेप्रवासात उलगडत जातात; आणि स्त्रीजीवनाचे, विवाहाचे, संसाराचे, एकाकी जीवनाचे आणि सहजीवनाचे वेगवेगळे पैलू स्पष्ट होत जातात. त्यातून पुढे काय करावे याचाही निर्णय घेणे तिला सोपे जाते.

साहजिकच या पाचही महिलांच्या आयुष्यात अशा काही घटना असणार की त्याद्वारे अखिलाला या पुढच्या आयुष्यात काय करावे, कसे वागावे, कुटुंबातील इतरांना व समाजाला कसे तोंड द्यावे, आपल्या एकाकी आयुष्याचे लोढणे तसेच रेटत राहावे की त्याला इच्छित वळण देण्यासाठी आत्मबळ एकवटावे– याचा उलगडा होणे शक्य व्हावे.

या सहा महिलांच्या जीवनकहाण्या या रात्रीच्या रेल्वेप्रवासात उलगडत जातात; आणि स्त्रीजीवनाचे, विवाहाचे, संसाराचे, एकाकी जीवनाचे आणि सहजीवनाचे वेगवेगळे पैलू स्पष्ट होत जातात.

या पाच महिला असतात : जानकी, मार्गारेट शांती, प्रभादेवी, शीला आणि मारीकोलान्थू.

आरंभीच त्यांची जी जुजबी सलामी घडते, तिच्यातून त्यांची वैशिष्ट्ये सहज लक्षात येतात. खरे तेच बोलावे, मुखवटे टाकून द्यावे असे अखिलाला वाटते. या बायका ना नात्याच्या, ना ओळखीपाळखीच्या. पुन्हा जगात भेटीगाठी होणे दुरापास्त. यांना खरं ते सांगण्यात धोका शून्य. अविवाहित बायकांना स्वत:च्या घुसमटीबद्दल खरं सांगण्याची अशी संधी एरव्ही कुठे मिळणार? असे अखिलाच्या मनात येऊन जाते आणि खरं बोलण्याचं ती ठरवते. 'लग्न का केलं नाहीस तू?' या प्रभादेवीच्या भोचक प्रश्नाला ती खरं उत्तर देते.

''लग्न करायचं नाही असं मी ठरवलं नव्हतं. पण माझे वडील लवकर वारले. मी मोठी मुलगी. शिवाय मिळवती. घरादाराची, आईच्या अर्ध्या संसाराची जबाबदारी घ्यावीच लागली. भांवंडं मिळवती होऊन मार्गाला लागेतो माझं वय वाढलं. आता माझ्यासारख्या जून बाईशी लग्न?...''

''तू सुखी आहेस का?'' प्रभादेवीचा पुन्हा प्रश्न.

''सुखी? तुम्ही कुणी सुखी आहात का?'' अखिलाचा सवाल.

''तसं सांगणं अवघड. पण सुख शेवटी मानण्यावर असतं. सुखाची ज्याची

त्याची व्याख्या पुन्हा निराळीच!'' प्रभाला सांगावे लागते.

''खरं सांगू का? माझ्या दृष्टीनं लग्न झालं नाही म्हणून फारसं काही बिघडत नाही. लग्नापेक्षा संवाद, मैत्री महत्त्वाची! पुरुषाचा सहवास महत्त्वाचा! मलाही तो मिळाला तर हवा आहे. हवाच आहे... पण खरा प्रॉब्लेम तो नाही. मी एकटी राहते याचा बाकीच्या लोकांना जो त्रास होतो तोच खरा प्रॉब्लेम असतो... एकट्या बाईचं जगणं मुश्किल. कसं निभावणार तुझं? असं जो तो म्हणत असतो. खरंच इतकं अवघड आहे का बाईचं एकटीनं जगणं? तुम्हाला काय वाटतं?'' अखिलाच्या या प्रश्नावर प्रभादेवी म्हणते,

''पण बाईनं मुळात एकटीनं जगावंच का? पुरुषाशिवाय बाईला पूर्णत्व नाही. शिवाय प्रत्येक बाईच्या मागे चार तरी पुरुष घोटाळत असतातच.'' वृद्ध जानकीबाई.

''हे बघ अखिला, स्वत:वरचा विश्वास महत्त्वाचा! आपली उत्तरं, आपले मार्ग शेवटी आपल्यालाच शोधावे लागतात. कुणी कुणाला मदत करू शकत नाही.' मार्गारेट.

जानकीदेवी अखिलाच्या आईच्या वयाच्या. मार्गारेट आणि प्रभादेवीही त्यांना मुलींसारख्याच. त्या अनोळखी चार स्त्रियांमध्ये अचानक एका नात्याचा जन्म होतो. एक वृद्ध आई आणि तिच्या तीन मुली... दोघी मिळून एकीला एकटी पाडू पाहताहेत म्हटल्यावर जानकीदेवी दोघींना दटावतात. ''ती काहीतरी महत्त्वाचं सांगतेय... मी म्हातारी. माझ्या लग्नाला ४० वर्षे उलटून गेली. सगळं आयुष्य पुरुषाच्या आधारानं गेलं. मी काय सांगणार– एकट्या बाईचे काय भोग असतात ते!''

''खरं सांगू का? माझ्या दृष्टीनं लग्न झालं नाही म्हणून फारसं काही बिघडत नाही. लग्नापेक्षा संवाद, मैत्री महत्त्वाची! पुरुषाचा सहवास महत्त्वाचा! मलाही तो मिळाला तर हवा आहे. हवाच आहे... पण खरा प्रॉब्लेम तो नाही. मी एकटी राहते याचा बाकीच्या लोकांना जो त्रास होतो तोच खरा प्रॉब्लेम असतो...

–अखिलाला तिच्या बोलण्यात अचानक एक ऊब जाणवते.

जानकी सांगते, ''हे बघ अखिला, मी चार भिंतींच्या आत जगणारी बाई... अक्कल म्हणशील तर उंबरठ्याच्या आतल्या संसारापुरती... मी-माझं लग्न-त्या लग्नाचा मला उमगलेला अर्थ– मी बाईच्या जन्माला आले. पण एकटीने, पुरुषाशिवाय जगतात ते कसं हे मला ठाऊक नाही... आधी वडील, मग भाऊ– पुढे नवरा... माझ्यासारख्या बायका नाजूक वेलीसारख्या जगायला शिकतात. जगतात. भक्कम झाड असतात संगतीला... म्हणून स्वत:च झाडासारख्या जगणाऱ्या बायका आवडत नाहीत आम्हाला... चांगली पत्नी होणं, उत्तम आई होणं... हेच एकमेव आमचं ध्येय... त्यावर विश्वास... जिवापाड झटून मी माझं साम्राज्य उभं केलं.''

प्रभाकरबरोबरचे विवाहानंतरचे आरंभीचे दिवस... जवळिकीचे तंत्र जमल्यावर लाभलेला आनंद... अपत्याचा जन्म... वय वाढत गेल्यावर नवरा, बाप आणि कर्ता पुरुष या भूमिका पार पाडण्याची नवऱ्याची क्षमता... लग्नाची चाळीस वर्षं उलटून गेल्यावर कधीतरी लग्न करूनही जीवन व्यर्थ गेल्याची चुटपूट लावणारी जाणीव जपणारं बायकी मन... इतक्या वर्षांच्या संसारानंतर दोघांत तयार झालेला घट्टमुट्ट, चिवट बंध– एकाच बिछान्यावर झोपणाऱ्या, एक मूल आणि संपूर्ण आयुष्य शेअर करणाऱ्या दोघांना झालेली परस्परांची सवय... सून आणि मुलगा जेव्हा 'मम्मी, तू फार हट्टी आहेस... ज्याने त्याने तुला लाडवून ठेवलंय... सतत स्वत:चा विचार...' असे म्हणून तिचा पाणउतारा करतो तेव्हा 'इतक्या लोकांबरोबर तुम्हाला वाटून घेता घेता थकलेय मी... मला माझा नवरा हवाय... माझा एकटीचा' असे म्हणून जानकी पतीला कवटाळते..

वृद्ध जानकीची ही कहाणी ऐकून अखिलाला आपल्या आईवडिलांच्या सहजीवनाचे स्मरण होते. वडील अप्पा इन्कम टॅक्स क्लार्क– पण एका पैशाचीही लाच न घेणारे. त्यामुळे इतर सहकाऱ्यांना नकोसे वाटणारे... अम्मा आणि अप्पा यांचं एकमेकांवरचं प्रेम– रविवारचा कार्यक्रम– मुलं मोठी झाली तरी नि:संकोच नवऱ्याचं डोकं अतीव प्रेमानं आपल्या मांडीवर घेत विसावणारी अम्मा... अप्पा हयात असेपर्यंत चाललेलं हे रहाटगाडगं... अप्पांनी दूर राहणाऱ्या नातलगांशी संबंध ठेवण्याबाबत दाखवलेली उदासीनता... त्यांच्या मृत्यूनंतर जमलेले गणगोत... यांचे ती नव्या संदर्भात विश्लेषण करते... कुटुंबाचे कर्तेपण स्वीकारते.

> मी बाईच्या जन्माला आले. पण एकटीने, पुरुषाशिवाय जगतात ते कसं हे मला ठाऊक नाही... आधी वडील, मग भाऊ- पुढे नवरा... माझ्यासारख्या बायका नाजूक वेलीसारख्या जगायला शिकतात. जगतात. भक्कम झाड असतात संगतीला...

...कुठल्याशा स्टेशनवर त्या कूपेतील शेवटची महिला– जेमतेम चौदापंधरा वर्षांची मुलगी– प्रवेश करते. धड ना मुलगी, ना स्त्री. निळ्या जीन्सवर लालपांढऱ्या रंगाचा टॉप... नववीत शिकणारी... वडील शेजारच्या डब्यात... आजच मृत झालेल्या आजीच्या अंत्यदर्शनाहून परतणारी शीला...

शीला आपल्या आजीच्या आठवणींनी व्याकुळ. अम्मुम्मा आजीने शीलाच्या आईला कधी प्रेमाने वागवले नव्हते; अम्मुम्मा मृत्यूपत्र करायचे टाळते... ती शीलाला मात्र आत्मीयता दाखवते. अम्मुम्माच्या मृत्यूने आपल्या जगण्याचा अखेरचा आधार गेल्याच्या जाणिवेने शीलाची मम्मी हवालदिल... 'मी मेले की माझ्या...'

आपल्या हेडमास्तर नवऱ्याला खूप खाऊपिऊ घालून लठ्ठ बेडौल बनवण्याचा

घाट घालणारी शिक्षिका मार्गारेट... त्याचा आत्मविश्वास ठेचावा, त्याचं व्यक्तिमत्त्व मोडून काढावं... म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करणारी मार्गारेट... ती असे का करते? तर नवरा तिला मूल होऊ देत नाही, गर्भ राहिला तर गर्भपात करायला भाग पाडतो म्हणून... नवऱ्याकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण करीत नाही म्हणून... नवरा या प्राण्याला बदलणं, सुधारणं शक्य नाही हे समजून चुकलं म्हणून... आपला नवरा सारखा चावणारा, डिवचणारा, खिजवणारा, रंगहीन, तेलकट, मंदबुद्धी, आंबट, भडकू, अतिरेकी... सर्वांना जळून खाक करणारा... विखारी... हायड्रोजन सल्फेटसारखा खादाड... नवऱ्याला आपण बदलू शकत नाही तर आपणच का बदलू नये?... ती त्याच्या शरीराला चेतवते... त्याची अनावर आग जागवते... त्याला खूप खूप खाऊ घालते... आपल्या बालिश लाडांनी त्याला गोंजारत राहते... वर्षात त्याच्या अंगावर चरबीचे थर चढू लागतात... फर्लांगभर चालतानाही धाप लागू लागते... संथ सैलावलेल्या जाड्या नवऱ्याच्या शरीरातील आग हळूहळू थंडावत जाते आणि त्यांच्या आयुष्यातले वादविवाद, ताणही संपतात. सल्फ्युरिक ॲसिडची शक्ती मंदावून ते निरुपद्रवी बनून जाते...

> **नवरा या प्राण्याला बदलणं, सुधारणं शक्य नाही हे समजून चुकलं म्हणून... आपला नवरा सारखा चावणारा, डिवचणारा, खिजवणारा, रंगहीन, तेलकट, मंदबुद्धी, आंबट, भडकू, अतिरेकी... सर्वांना जळून खाक करणारा... विखारी... हायड्रोजन सल्फेटसारखा खादाड... नवऱ्याला आपण बदलू शकत नाही तर आपणच का बदलू नये?**

प्रभादेवीची कहाणी वेगळ्या वळणावरची असते. ती अखिलाला चल जरा मजा करू म्हणत पलक्कड जंक्शनवर कुर्मा, अप्पम, शिकरण खाण्याचा आग्रह करते. ''मीही तुझ्यासारखीच होते आधी. इतरांचा विचार करायचा. स्वत:चं मन मारायचं. काही नवीन करायची, वेगळा अनुभव घेऊन पाहण्याची हिंमतच व्हायची नाही. शेवटी माझा मलाच कंटाळा यायला लागला... आणि एके दिवशी ठरवलं बास. इथून पुढे बदलायचं स्वत:ला... आणि बदलले... प्रत्येक गोष्टीमागे कारणं घडतात. पुढे त्याचे परिणाम भोगावे लागतात. माझ्या प्रश्नाचं कारण मीच होते आणि परिणामही!''

प्रभादेवी... एका व्यापाऱ्याची मुलगी. मद्रास शहरात पेढीच्या पाच शाखांसाठी पाच मुलगे हवे असणाऱ्या हिशेबी व्यापाऱ्याला चार मुलांनंतर झालेली ही पाचवी मुलगी बघून प्रथम दु:ख झाले. पण जावई पाचवी पेढी सांभाळेल म्हटल्यावर तो तिचा स्वीकार करायला उत्साहाने राजी होतो. कॉन्व्हेंटमध्ये घातल्याने मुलगी फॅशनेबल राहायला शिकेल, इंग्रजी सफाईने बोलेल, चांगला नवरा मिळवेल असाही धोरणी विचार बाप करतो. चारचौघीत मिसळत जा, आत्मविश्वासाने सर्वांशी बोलत

जा, मुलांशी मैत्री चालेल पण मैत्रीच्या नावाखाली वाहवत जाऊ नको– असे वडील बजावतात. वडील एका हिरे व्यापाऱ्याच्या एकुलत्या एका मुलाशी, जगदीशशी तिचे लग्न ठरवतात. लेकीचं कोटकल्याण. शिवाय हिरे विकण्याची नवी संधी... वडील खूष! लग्नानंतर सासरी खूपसं प्रेम. थोडी भीती. आशा-अपेक्षा... आणि नवऱ्याची प्रतीक्षा हे तिचं रुटीन बनतं... तशात नवऱ्याबरोबर न्यूयॉर्कचा दौरा... परतताना ढिगभर परफ्युम्स... सेक्सी पॅन्टीज्... ब्रेसियर्स... डिनरसेट... आणि शरीरात नव्यानं भरलेली आस... रुबाबदार चाल; ताठ खांदे, हिंदकळणारे नितंब, अभिमानाने झुलणारी पुष्ट छाती... तीन इंच उंच टाचांचे सँडल्स, मान उडवण्याचे तंत्र, साडीऐवजी नक्षीदार कफ्तान... मॅचिंग ब्लाऊझ... जगदीश या बदलांनी धास्तावलेला... कधी ना कधी ठेच लागणार. ती ठेच प्रभादेवी मूल नको.. आता इतक्यात नको म्हणते तेव्हा त्याला लागते... मूल झालं की मजा जाते, असे म्हणतानाच स्वत:चं सौंदर्य जास्तीत जास्त आक्रमकपणे दाखवण्याचे, आपल्या नजरेने घायाळ होणारे पुरुष पाहण्याचे तिचे प्रयोग चालूच राहतात. नवऱ्याबरोबर क्लबात ती जाई. तेथे प्रमोदचे तिला आकर्षण वाटू लागते. प्रमोदही त्या संधीचा फायदा घेतो. तेव्हा मात्र ती जमिनीवर येते. हा प्रमोद आपल्याला तसली बाई समजतो काय– ती त्याला दूर लोटते. 'पातिव्रत्याचं नाटक नको... तूच लागलीस माझ्यामागं' म्हणत तो तिच्यावर झडप घालू पाहतो... ती त्याला घराबाहेर काढते. सुन्न होते. कर्तव्यदक्ष घरंदाज सुनेच्या रूपात ती घरकामात झोकून देते... आज्ञाधारक पत्नी, समर्पित आई... कॉलेजात जाणारी अठरा वर्षांची नित्या आणि पंधरा वर्षांचा विक्रम... आपल्या कन्येला ती भावी आयुष्याबद्दल धडे देऊ पाहते.

भरलेली आस... रुबाबदार चाल; ताठ खांदे, हिंदकळणारे नितंब, अभिमानाने झुलणारी पुष्ट छाती... तीन इंच उंच टाचांचे सँडल्स, मान उडवण्याचे तंत्र, साडीऐवजी नक्षीदार कफ्तान... मॅचिंग ब्लाऊझ... जगदीश या बदलांनी धास्तावलेला...

''लग्न झाल्यावर नवऱ्याच्या हाती सोपवून दे... तुला घराबाहेरचं काही जमत नाही हे त्याला जाणवून दिलं की तो प्रत्येक काम करील. त्याचं पुरुषत्व सुखावेल तोवर तो तुझे लाड पुरवत राहील. पण तुझा निर्बुद्ध दुबळेपणा त्याला समजून चुकला की तो तुझ्यावर अधिकार गाजवायला लागेल... याला पर्याय म्हणजे... लग्नानंतर स्वत:चं स्वातंत्र्य जपायचं. प्रत्येक गोष्ट स्वत: करायची. मग नवरा तुला तुझ्या भरवशावर सोडायला शिकेल... पण गरजेच्या वेळी तो तुझ्या मदतीला येईलच असे नाही... मध्यममार्ग नाही.. अल्याड किंवा पल्याड.''

नवरा आपल्याशी उर्मटपणे बोलतोय हे तिच्या लक्षात येते.

आपण अशा विझलेल्या चेहऱ्याने वावरतो, पूर्वीचे चैतन्य आपल्याला उरलेले नाही, अशा बाईबरोबर उरलेले अर्धे आयुष्य काढायच्या विचाराने कुठल्याही पुरुषाचा संतापच होईल... मग कसं टिकणार आपलं नातं... असा विचार प्रभादेवीच्या मनात येतो.

ती पोहायला शिकते... तिचं शरीर अचानक जागं होतं. आपल्या शरीरातलं उधाण तिला अनावर होतं... जगदीश तिच्या त्या आवेगाने सुखावतो. थक्क होतो... त्याचं विझलं तारुण्य पुन्हा चेतवत जातं... उष्ण सुखाचा तवंग...

आपल्यालाही प्रेम करावंसं वाटतं... साद घातली तर प्रतिसाद मिळतो... जेवढं देऊ करावं त्या पटीत परत मिळतं– हे तिला पहिल्यांदाच अनुभवल्यासारखे तीव्रतेने जाणवते. नव्या धाडसाची नवी चव तिच्या ओठांवर रेंगाळू लागते...

नंतर येते मारीकोलान्थूची कहाणी. (मारीकोलान्थू म्हणजे कुंपणासाठी लावण्यात येणाऱ्या काटेरी झाडाचं पान) वय एकतीस. तिला एक तेरा वर्षांचा मुलगा... नवरा नाही. आईवडील हयात नाही. भाऊ आहेत पण त्यांच्याशी संबंध नाही. एका मिशन हॉस्पिटलमध्ये हेल्पर म्हणून ती काम करीत असते. ती नऊ वर्षांची असताना वडील अचानक मरण पावतात; आई हातमागाचा कारखानदार श्रीमंत चेट्टीयारच्या बंगल्यावर स्वयंपाकीण म्हणून काम सुरू करते. घर चालवते. मारीकोलान्थू लहानपणापासून आपल्या घरातले स्वयंपाकपाणी बघू लागते. गृहिणीची भूमिका परकरी वयातच रंगवू लागते... चेट्टीयारच्या नवजात मुलाला मारी तीनचार वर्षे सांभाळते; त्याच्यावर आपल्या मातृत्वाचा वर्षाव करते. ती वयात येते तेव्हा तिची मालकीण तिला वेल्लोरच्या मिशनच्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांना हेल्पर म्हणून नोकरी लावून देते. ''या घरात एवढे तरणेताठे पुरुष आहेत... तू चांगली मुलगी आहेस... एखादी ठिणगी पडली तरी अनर्थ होईल...'' त्या हॉस्पिटलमध्ये नर्सिंग वगैरे ती करू लागते. एकदा आपल्या गावी आली असता चेट्टीयारच्या सुनेचा धाकटा भाऊ मुरूगसान तिला आमराईत एकटी गाठून तिच्यावर बलात्कार करतो. ''साली दीडदमडीची मोलकरीण. चड्डी आणि ब्रा घालते... नखरे पहा नखरे'' म्हणत बळजबरी करतो... आणि महिन्याने तिला मळमळू लागते... तिच्या आईच्या लक्षात ते येते. ''कार्टे, कुठं शेण खाल्लंस? दिवस गेलेयत तुला. पोटात पाप वाढतंय तुझ्या! कोण आहे तो? नाव सांग तुझ्या याराचं.'' मारी सर्व सांगते. पण आई मारीलाच दोष देते. ''इतक्या

ती पोहायला शिकते... तिचं शरीर अचानक जागं होतं. आपल्या शरीरातलं उधाण तिला अनावर होतं... जगदीश तिच्या त्या आवेगाने सुखावतो. थक्क होतो... त्याचं विझलं तारुण्य पुन्हा चेतवत जातं... उष्ण सुखाचा तवंग...

दिवसांपूर्वी तुझ्यावर बलात्कार झाला आणि तू गप्प बसलीस... वर म्हणतेस विश्वास ठेव... मुरूगसान असलं घाणेरडे कृत्य करणार नाही. त्याच्या नावावर उगीच वाटेल ते खपवू नकोस.'' शेवटी मारी सुजाताअक्काला सर्व सांगते. ती अम्माला म्हणते, ''मुरुगसन आहेच तसला! त्या राक्षसाने बरोबर डाव साधला.'' अम्मा म्हणते, ''आता कोण लग्न करणार तुझ्याशी? आयुष्य नासवलंस... संपलं तुझं आयुष्य...''

आणि मारी पोट पाडायला पेरियम्मा या आईच्या आत्येकडे जाते. आत्या पोट पाडण्याऐवजी भलतीच औषधे देते. –आणि नऊ महिन्यांनी मारीला मुलगा होतो. पेरियम्माने मदत करण्याचे नाटक केलेले असते.

हे पोर म्हणजे आयुष्यभराचा छळवाद... अम्मा त्या मुलाला जवळ ठेवून घेते. मारी वेल्लोरच्या नोकरीवर रुजू होते. ती ज्यांच्याबरोबर राहाते त्या दोघी नर्सेस लेस्बियन... जगण्यातून तिचं मन उडतं. ती किंचाळून रात्री जागी होऊ लागते तेव्हा तिला गुंगीच्या गोळ्या देण्यात येतात.

लग्न जुनं झालं की कंटाळा येतो. शिसारी येते. नवऱ्याला इच्छा झाली की रात्री तो जवळ घेतो; तर अंगावर पाल चढल्यासारखं वाटतं मला... तो दुसऱ्या बाईकडे जातो... पण त्याला नाही म्हटलं तर तो त्या सटवीला आणून माझ्या बोडक्यावर बसवेल...

चेट्टीयारच्या मृत्यूनंतर त्यांचे घर फुटते. सुजाताअक्का, तिची वेडसर सासू व नवरा श्रीधर अण्णा एवढेच तेथे राहतात. सुजाता मारीला तेथे परत यायला सांगते. वेडसर सासूच्या सेवेत मारी रमते. रात्री गुंगीचे औषध... एके दिवशी सासू मरते. मारीला सुजाता आपली मदतनीस म्हणून ठेवते. सुजाता घराचे नूतनीकरण करते... नवा टीव्ही आणते... सुजाता आणि मारी यांचेही लेस्बियन संबंध सुरू होतात. सुजाता सांगते, ''लग्न जुनं झालं की कंटाळा येतो. शिसारी येते. नवऱ्याला इच्छा झाली की रात्री तो जवळ घेतो; तर अंगावर पाल चढल्यासारखं वाटतं मला... तो दुसऱ्या बाईकडे जातो... पण त्याला नाही म्हटलं तर तो त्या सटवीला आणून माझ्या बोडक्यावर बसवेल... मी उघडी होऊन त्याच्यापुढे प्रेतासारखी थंड पडते...'' सुजाताला सुख देण्याचे नवनवे मार्ग मारी शोधत राहते. पुरे पुरे म्हणेपर्यंत शरीराला लुचत राहते.

...आणि श्रीधर अण्णाही मारीचे लाड पुरवू लागतो. तिलाही त्या सुखाची चटक लागते. दिवसा सुजाता... रात्री श्रीधर... या दोघांपैकी कुणाचंही आपल्यावर प्रेम नाही हे मारीला ठाऊक असते; पण त्यांना आपली गरज आहे हे ती जाणून असते.

अम्माच्या मृत्यूनंतर सुजाता मारीला घराबाहेर काढते. ''चांडाळणी, माझ्या पाठीत खंजीर खुपसताना शरम नाही वाटली तुला?''

''तुला श्रीधरची शिसारी... त्यानं दुसऱ्या बाईकडे जाऊ नये महणून... मी हे तुझ्यासाठीच केलं'' असं मारी स्पष्टीकरण देते तर ती तिला हाकलून देते... मुरूगसानच्या हातमागावर काम करण्यासाठी मुलाला मॅनेजरच्या हवाली करून ती पाच हजार रुपये घेते... मुरूगसानच्या मृत्यूनंतर पत्नी म्हणून जगण्याची, संसार करण्याची सगळीच संधी हुकली... म्हणून मारी हळहळत असते. उष्टा संसार, उष्टं आईपण... उष्टं प्रेम... आता पुरे! आता तरी स्वत:साठी जगायला हवं असं मारीला वाटत राहतं.

अखिला कन्याकुमारीला हॉटेलात दोन दिवस राहते... कुटुंबासाठी जगणे पुरे. बहिणीचं कर्तव्य केलं. आता मला माझ्यातली स्त्री सापडली आहे. मला तिच्यासाठी जगायचं आहे. तिथं एक पंचविशीचा तरुण तिच्याकडे आकृष्ट होतो... ती त्याला स्वत: हाक मारते. उंदीरमांजराच्या खेळात मांजराची भूमिका करायची संधी ती घेते. ''हळू. घाई करू नकोस. मी कुठे पळून नाही चालले... हीच खरी आयुष्याची आदिम ऊर्जा... अखिला म्हणजे शक्ती...

अखिला कन्याकुमारीला हॉटेलात दोन दिवस राहते... कुटुंबासाठी जगणे पुरे. बहिणीचं कर्तव्य केलं. आता मला माझ्यातली स्त्री सापडली आहे. मला तिच्यासाठी जगायचं आहे. तिथं एक पंचविशीचा तरुण तिच्याकडे आकृष्ट होतो...

तिचे दहा अवतार. काली (दुर्जनांचा नाश), तारा (विश्वजननी), सोसासी (तारुण्याचा बहर), भुवनेश्वरी (भौतिक सुखसमृद्धी), भैरवी (स्वत:च्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचं बळ असणारी), चिन्नामस्ता (भौतिक जगातल्या संपत्तीकडून विलयाकडे जाणारी), धुमथी (नखशिखान्त दुर्दैव), बागला (करकोच्याच्या तोंडाची... द्वेष-मत्सर-क्रोध यांनी बरबटलेली), मातंग (सर्वांवर वर्चस्व गाजवणारी) आणि कमला (कल्याणकारक, समर्पित, तारणहार) अखिलाला जाणवते की ही सगळी आपलीच रूपे— ओळखीची.

विनोद विचारतो, ''उद्या येऊ मी?'' ती नुसतं हसते. गरज... भागली की झालं.

गरज भागवण्यासाठी काहीही चालू शकतं.

आणि आपल्या आयुष्याची निसटलेली नस पुन्हा गवसल्यासारखे अखिलाला वाटते. तिला पूर्वाश्रमीच्या एका प्रियकराचे स्मरण होते. ट्रेनमध्ये भेटलेला. ''तू माझ्याकडे एक पुरुष म्हणून पाहा अखिला... मी तुझा धाकटा भाऊ नाही. मला तू आवडतेस... मी तुझ्या प्रेमात पडलोय...'' ती त्याला प्रियकर म्हणून जवळ करते. तो विशीतला तरुण. ती पस्तिशीतली... पण नंतर तिला वाटते... कशी दिसेल आपली जोडी? एक उमदा तरुण... एक वय उलटलेली, सुरकुतलेली, निबर, प्रौढ

बाई... लोकांच्या प्रतिक्रिया... नवरा समाधान देत नसेल म्हणून हा पोरगा पकडलेला दिसतोय... मजा मारण्यासाठी या बायका वाट्टेल ते करतात... आयुष्यभर अशाच बोचऱ्या शेऱ्यांना सामोरे जावे लागणार. चारचौघांत वावरताना अवघडलेपणा जाणवणार... तो हरी... त्याला ती त्यावेळी टाळून दूर सारते... पण आता या क्षणी तिला त्याची आठवण येते. तो आता स्वत:च्या संसारात सुखात असेल... पण तरीही त्याचा फोननंबर ती डायरीतून काढते. त्याला फोन लावते... आणि आश्चर्य– तो फोन हरीच घेतो... ती त्याचा आवाज ओळखते... ''मी अखिला...''

अनिता नायर यांची ही नायिका एका रात्रीच्या आगगाडीच्या प्रवासात पाच स्त्रियांच्या आणि आपल्या परिवाराच्या जीवनकहाण्यांना उजाळा देऊन, स्त्रीजीवनाच्या मर्यादा, आकांक्षा आणि शक्यता अजमावते. काहीही केले तरी काहीतरी द्यावे लागते, घ्यावे लागते; जमवावे लागते. काळ बदलतो... संदर्भ बदलतात... शरीर काही मागत असते. मन काही शोधत असते... जे मिळेल ते घ्यावे. जनांची पर्वा करू नये. आपले आयुष्य हे आपले आहे. ते इतरांसाठी उधळून देण्यात अर्थ नाही...

असा आत्मप्रतीतीचा, आत्मसार्थकतेचा संदेश घेऊन उर्वरित जीवनाला सामोरे जायला उत्सुकतेने सिद्ध झालेली अखिला... आजच्या स्त्रीला कदाचित् आपलीच प्रतिकृती वाटू शकेल... आत्मनिर्भर बनवू शकेल.

असा आत्मप्रतीतीचा, आत्मसार्थकतेचा संदेश घेऊन उर्वरित जीवनाला सामोरे जायला उत्सुकतेने सिद्ध झालेली अखिला... आजच्या स्त्रीला कदाचित् आपलीच प्रतिकृती वाटू शकेल... आत्मनिर्भर बनवू शकेल.

स्त्रीपुरुषाच्या सहजीवनाचे, शारीरिक मानसिक नात्यातील ताणतणावाचे वेगवेगळे नमुने पेश करून, वैवाहिक चौकटीचा भुसभुशीतपणा उघड करीत एकविसाव्या शतकातील आत्मनिर्भर भारतीय स्त्रीची आंतरिक खळबळ अखिलाच्या रूपाने मांडता मांडताच लेखिका अनिता नायर तिला सर्व बंधनांतून मुक्त होण्याचा मार्गही दाखवत आहेत.

पृष्ठे : ३४४ ● किंमत : २५०रु. ● सभासदांना : १८८रु. ● पोस्टेज : २०रु.

बिनधास्त जीवन जगलेल्या मुक्त स्त्रीयांची प्रभावी जीवनचरित्रे

टाईमपास
प्रोतिमा बेदी
अनु. सुप्रिया वकील
किंमत : १८०रु.

सिलेक्टिव्ह मेमरी
शोभा डे
अनु. अपर्णा वेलणकर
किंमत : ३३०रु.

समर्पिता

रामायणातील खलनायिका कैकेयी अशीही असू शकेल!

शरद दळवी

'' 'समर्पिता' ही शरद दळवी यांची कादंबरी एका वेगळ्या दृष्टिकोनातून रामायणकथा सांगते. 'समर्पिता ही स्त्री आणि स्त्रीत्वाची कहाणी संपूर्णत: रामायणावर आधारित आहे. त्या काळातील सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय बदलातील स्त्री हा एकच पैलू या कथेत घेतला आहे. रामायणकाळात समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन बदलू लागला होता. केकय, जनकपुरी आणि अयोध्या यात स्त्री वेगवेगळ्या अवस्थेत दिसते. वाल्मीकींनी त्याचे वर्णन सूचकतेने पण मोठे मनोज्ञ आणि यथातथ्य केले आहे... पण त्यांचा मूळ उद्देश तो नसल्याने ते काहीसे अस्पष्ट, धूसर बनले आहे. ते अधिक स्पष्ट करणे हा समर्पितेचा हेतू.'' असे प्रस्तावनेत शरद दळवी यांनी स्पष्ट केले आहे. ''रामायणातील घटना, पात्रांचे वागणे, वाल्मीकींचे सूचक व संकेतात्मक चित्रण यातील संगती शोधण्याचा, कार्यकारणभाव तपासण्याचा आणि त्यामागील विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न या कथेत केला आहे, तेवढे लेखकाचे स्वातंत्र्य आहे'' असेही त्यांनी आवर्जून सांगितले आहे.

रावणाचा पराभव करून राम अयोध्येला परतला; अयोध्येतील कोणा रजकाने सीतेच्या शीलाबद्दल शंका व्यक्त केल्याने गरोदर सीतेला राम वनवासात पाठवतो; त्यामुळे नाराज झालेल्या कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी या राजमाता अयोध्या सोडून दूर एकांतात वानप्रस्थाश्रम स्वीकारून राहण्याचे ठरवतात. उर्मिला वगैरेंच्या आग्रहामुळे त्या अयोध्येपासून दूर अंतरावर जाण्याऐवजी जवळच्याच अरण्यात राहण्याचे मान्य करतात. दासदासी मिळून चौदा जणी स्वहस्ते झोपड्या बांधून वानप्रस्थी जीवनशैलीचा अंगीकार करतात. येथून या कथेला आरंभ येतो. अधूनमधून पूर्वस्मृतींना उजाळा देऊन कैकेयीची आणि दशरथाची प्रथम भेट, विवाह, अयोध्येतील आगमनानंतर तिचे राजप्रसादात झालेले स्वागत, रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळी

तिने मागितलेले वर, रामाचा वनवास, सीतेचे रावणाकडून अपहरण, लंकेवर रामाची स्वारी व रामसीतेचे पुनरागमन वगैरे कथाभाग अधूनमधून सांगण्यात आला आहे. आणि पुढे सीतेचे वाल्मीकीच्या आश्रमातील वास्तव्य, लवकुशाचा जन्म, त्यांनी राजकथेचे केलेले गायन, सीतेचा पुनश्च स्वीकार करताना रामाने लादलेली कसोटी आणि सीतेने धरणीमातेच्या पोटात घेतलेला आश्रय हा सगळा कथाभाग सांगून तिच्या 'समर्पित' जीवनाची ही कहाणी सफल संपूर्ण केली आहे.

शरद दळवी यांची प्रतिभा दिसते ती त्यावेळचे वातावरण आणि व्यक्तिमत्त्वाचे आंतरिक ताणतणाव प्रकट करण्यात! कैकयीचे जीवनचरित्र सकारात्मक रंगवून, तिच्या वर्तनाला तर्कसंगत ठरवण्यासाठी वेगवेगळे युक्तिवाद पेश करण्यात...! आधुनिक स्त्रीवादाच्या, स्त्रीस्वातंत्र्याच्या संकल्पनांचे रामायणकालावर आरोपण करण्यात... कैकेयी (पृष्ठे १-५३, ९४-१३८, १८१-२२१, २४५-२८१, २९१-२९५) आणि सीता (५४-९३, १३९-१८०, २२२-२४४, २८२-२९०) या दोघींना समर्पिता म्हणून, त्यांच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या भूमिकेतून घटनांची मांडणी केली आहे.

''कैकेयी बाळे, देवाने आपल्याला दोन कान, दोन डोळे, दोन हात आणि दोन पाय दिलेत. एका नाकालाही दोन नाकपुड्या आहेत. पण तोंड? ते मात्र एकच आहे. आता तू सासरी राहणार. एक राणी म्हणून राहणार. तिथे आपले महत्त्व टिकवायचे तर आपला शब्द खाली पडू देऊ नकोस.

'समर्पिता'मधील कैकेयीची व्यक्तिरेखा ही वेगळी आहे, हे ठसवण्यासाठी दळवी 'केकय' प्रदेशातील स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने स्थान होते, आदर, सन्मान मिळत होता; दोन वा अधिक विवाह करण्याची उदाहरणे दुर्मिळ होती असे आधीच सांगून, दशरथाने आधी दोन बायका असताना तिसऱ्या लग्नाचा घाट घालणे हा प्रकार 'क्षणिक मोहासाठी स्त्रीचा हा असला अपमानास्पद... नव्हे घृणास्पद वापर... तिला असं अध:पतित करणं... तिच्या केकय मनाला कल्पनेतही असह्य वाटल्याचे नमूद केले आहे. (१७)

षोडशी कैकेयी या लग्नासाठी, आधीच्या दोन सवती असतानाही आणि दशरथाचे वय पन्नाशीच्या घरात असूनही तयार का झाली? असा प्रश्न पडेल. हा प्रश्न रास्तच आहे. ती तयार झाली खरी; मात्र तेव्हा तिला तिच्या आईने आणि वडिलांनी काय सल्ला दिला तेही जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

कैकेयीची माता तिची पाठवणी करताना म्हणाली होती, ''कैकेयी बाळे, देवाने आपल्याला दोन कान, दोन डोळे, दोन हात आणि दोन पाय दिलेत. एका

नाकालाही दोन नाकपुड्या आहेत. पण तोंड? ते मात्र एकच आहे. आता तू सासरी राहणार. एक राणी म्हणून राहणार. तिथे आपले महत्त्व टिकवायचे तर आपला शब्द खाली पडू देऊ नकोस. आणि तसं करायला हवं तर कमीत कमी बोल. स्वत:चा सन्मान आपणच टिकवायचा असतो बरं!'' (१३)

आणि तिच्या पित्याने– अश्वपतीने तिला काय सल्ला दिला होता? ''देव आणि दैव यांना भ्यावं दुर्बलांनी. पौरुष, पराक्रम आणि प्रयत्नांच्या साहाय्यानं त्यांच्यावर मात करण्यातच माणसाच्या जन्माची सार्थकता असते.'' (१९) मातापितांच्या या सल्ल्यानुसार कैकेयी अयोध्येत वावरली... ''आयुष्यभर मी कर्तृत्व आणि कर्तव्य... यांचीच पूजा केली. लोकनिंदेची वा स्वत:च्या आयुष्याची पर्वा केली नाही... त्यापायी सारे अपमान... सारी दु:खे... एकाकीपणे सोसली. कधीही तक्रार केली नाही. सारी दु:खं- सारी जननिंदा सोसली... अजूनही सोसेन.'' (१९)

कैकयीला पण त्याचवेळी स्वत:चेच मन खात असावे. ''कैकेयी, स्वत:चा संसार जपलास. सारे सुखोपभोग तू भोगलेस. नको नकोसे होईपर्यंत भोगलेस. पण इतरांचे काय? त्यांचे संसार मोडायला तू कारण नाहीस?... उर्मिलेला बारा वर्षे विधवेचं जिणं जगावं लागलं. तेही नवरा असून! सीतेला... टाकलेल्या पत्नीचं, परित्यक्तेचं आयुष्य काढावं लागलं.'' यासाठी ती दैवाचा आधार कसा घेऊ शकणार? हे तिचं तिलाच कळत नाही. आपली गाठ पाऱ्यासारख्या चंचल, लंपट आणि खोटारड्या पुरुषाशी पडली आहे...

आयुष्यभर मी कर्तृत्व आणि कर्तव्य... यांचीच पूजा केली. लोकनिंदेची वा स्वतःच्या आयुष्याची पर्वा केली नाही... त्यापायी सारे अपमान... सारी दुःखे... एकाकीपणे सोसली. कधीही तक्रार केली नाही. सारी दुःखं- सारी जननिंदा सोसली... अजूनही सोसेन.

त्यामुळे महाराजांना कधी सोडून जायचे नाही, त्यांना सतत आपल्या मुठीत ठेवायचं, महाराजांकडून कधीही, कोणत्याही बाबतीत स्वत:ची फसवणूक करून घ्यायची नाही. त्यासाठी डोळ्यांत तेल घालून दक्ष राहायचं... महाराजांना सतत नवनव्या शृंगारकलांमध्ये गुंतवून ठेवायचं... आक्रमक अधिकाराने वागायचे... असे हेच आपले धारेण राहिले होते हे तिला या वानप्रस्थाश्रमात स्वत:शीच कबूल करणे भाग पडले... माहेर दूर राहिले, अयोध्येत सारेच परके. लोक परके. रीतीरिवाज परके. भाषा परकी. सारे काही नवीन आणि कृत्रिम. मुक्त वातावरणात स्वच्छंदीपणे वाढलेल्या कैकेयीला अयोध्येच्या या सोन्याच्या पिंजऱ्यात गुदमरल्यासारखे वाटणे स्वाभाविकच होते– असेही ती स्वत:च्या समर्थनासाठी

घोकत राहते. म्हणून कैकेयी विजिगीषु, आत्मनिर्भर आणि साहसी राहिली... (२२-२३)

...असे कैकेयीचे अंतर्मुख होऊन आपल्या गतजीवनाचे अवलोकन चालू असते.

राजा दशरथाबद्दल कैकेयीच्या भावना काय होत्या?

विवाहानंतर अयोध्येकडे रथाने निघाल्यावर वाटते कैकेयीला फुलांचा मादक गंध जाणवला. त्याविषयी विचारणा करताच दशरथाने रथातून खाली उडी घेऊन झाडावेलींच्या गर्दीत वेगाने जाऊन ती फुले आणून एखाद्या दासाप्रमाणे कैकेयीपुढे धरली. सारथी सुमंत्र महाराजांचे नवथर प्रेमिकासारखे हे वागणे पाहूना हसू दाबू लागला. त्याच्या त्या हास्यात उपहासाचा भाव होता असे कैकेयीला जाणवले. त्या क्षणी सुमंत्राला तिने आपल्या शत्रूपक्षात ढकलले आणि महाराजांचा शब्द, वागणे व हेतू याविषयी तिच्या मनात संशयाची बीजे रुजली; आपल्याला आधीच दोन सवती आहेत, तेव्हा राजवाड्यातही रंगतदार हेव्यादाव्याचं राजकारण असणार अशी खूणगाठ ती मनाशी बांधते. (१५)

ही तुमची नवी शिकार तर...! ही तर आपल्या कन्येसारखी लहान दिसते... आपलं नसलं तरी या या मुलीचं हे लग्न प्रथमच होतंय... तुमची हौस संपली असेल म्हणा... पण या मुलीसाठी हे उपचार नवीनच आहेत... अशा शुभप्रसंगी कुणाचं मन दुखवणं योग्य नव्हे.

राजप्रासादात प्रवेशाच्या वेळी महादेवी कौसल्या कैकेयीला ओवाळताना पतीला म्हणते, ''ही तुमची नवी शिकार तर...! ही तर आपल्या कन्येसारखी लहान दिसते... आपलं नसलं तरी या या मुलीचं हे लग्न प्रथमच होतंय... तुमची हौस संपली असेल म्हणा... पण या मुलीसाठी हे उपचार नवीनच आहेत... अशा शुभप्रसंगी कुणाचं मन दुखवणं योग्य नव्हे.'' कैकेयीला या शब्दातला उपहासही धास्तावून टाकतो. तिचा आनंद कोळपून जातो... अडीचशे उपपत्नी दशरथाला असतात. हा सत्तेचा व सामर्थ्याचा दुरुपयोग वाटतो.

कैकेयीच्या विवाहाचे आणि अयोध्येतील आगमनानंतरचे हे सगळे चित्रण शरद दळवी यांच्या मनातील कैकेयीची व्यक्तिरेखा कशी वेगळी आहे याची चुणूक दाखवते. कैकेयीने दशरथाशी लग्न करण्याचा निर्णय स्वत:च्या मर्जीने घेतला. 'राजा म्हणून आपली बुद्धी एक निर्णय देते तर पित्याचे मन पूर्णपणे विरोध करते' असे कैकेयीला तिचा पिता सांगतो. अंतिम निर्णय कैकेयीनेच घ्यायचा आहे असेही तो स्पष्ट करतो. लग्नाच्या निर्णयाचा पश्चात्ताप कैकेयीला नववधू म्हणून आल्यावर प्रथमत: होतो. ओवाळणीसाठी आलेल्या अडीचशे

स्त्रियांचा आपल्या उपपत्नी असा उल्लेख दशरथाने केला तेव्हा... त्यावेळी कैकेयीला स्वत:चीही घृणा वाटते. हा पुरुष केवळ लंपट आणि चंचलच नाही तर खोटारडा आहे... तेव्हापासून मी फार स्वार्थी, अप्पलपोटी...' असे ती म्हणते तेव्हा कौसल्या तिला त्याबद्दल टोकण्याऐवजी म्हणते, ''नाही कैकेयी, उलट तू लवकर ओळखलंस. लगेच निर्णय घेतलेस. तू प्रशंसेला पात्र आहेस. तू पारा मुठीत पकडून दाखवलास... आम्हाला ते जमलं नाही, म्हणून मत्सर...''

त्यामुळे खूष होऊन कैकेयी म्हणते, ''त्यावेळी मी एक प्रतिज्ञा केली. यांच्याकडून पुन्हा फसवून घ्ययचं नाही... फसवणूक करण्याचा प्रयत्न केला तर सर्वस्व पणाला लावून प्रतिकार करायचा. स्त्री आणि तिचं महत्त्व समजायलाच हवं.''

हे ऐकल्यावर सुमित्रादेवी तिची क्षमा मागते. कशाबद्दल? तर रामाच्या वनवासाच्या वेळी संताप-दु:खाच्या भरात तिच्यावर सावत्रपणाचा आरोप केल्याबद्दल. वानप्रस्थात येण्यापर्यंतचा काळ तर क्षमायाचनेसाठी जावा लागला. ''प्रत्येक गोष्टीला योग्य वेळ यावी लागते.'' (४७) ''सक्तीच्या सहवासात सामान्य पशूत असते तेवढीच जवळीक आपल्यास होती... आता प्रथमच आपण एकमेकींना सापडलो... आत्मीय भावना जागी झाली... अकरा वर्षांनी दिलजमाई झाली.''

तुझ्या समदृष्टी पित्याने तुला राजकारणापासून युद्धकार्यापर्यंत सारे शिकवले... तुझ व्यक्तिमत्त्व चोहो अंगांनी फुलवले. हे मनोबल, हा विचारशक्ती, एवढं साहस तुझ्यात त्यांच्या संस्कारान आले... तू नशीबवान... आम्ही खोट्या मोठेपणाचे संस्कार घेऊन, माणूस म्हणून नव्हे तर स्त्री म्हणून वाढलो.

त्याच जोडीला शरद दळवी विरोधातून विकास या सृष्टीच्या नियमाचे स्मरण देतात. ''आपण तिघी राजघराण्यातल्या... आम्ही दोघी वेगळ्या, सामाजिक रीतीभातीच्या कृत्रिम वातावरणात वाढलो. तू मोकळ्या वातावरणात वाढलीस. तुझ्या थोर पित्याने तुला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून वाढवले, तुझे स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवले. तुझ्या समदृष्टी पित्याने तुला राजकारणापासून युद्धकार्यापर्यंत सारे शिकवले... तुझे व्यक्तिमत्त्व चोहो अंगांनी फुलवले. हे मनोबल, ही विचारशक्ती, एवढं साहस तुझ्यात त्यांच्या संस्काराने आले... तू नशीबवान... आम्ही खोट्या मोठेपणाचे संस्कार घेऊन, माणूस म्हणून नव्हे तर स्त्री म्हणून वाढलो. आम्हाला लहानमोठ्या प्रश्नांसाठी कुणावर तरी अवलंबून राहायचं, कुणाचा तरी आधार घ्यायचा एवढंच ठाऊक आहे... दुबळेपणही अगतिक अवस्थेत उपयोगी पडते... ढालीसारखे... या समाजाने अनेक यमनियमांनी,

बंधनांनी, आम्हाला खेळण्यासारखं घडवलं हे खरंय... मनाला नाही पटलं तरी बंड करण्याचं, विरोध करण्याचं सामर्थ्य नव्हतं बघ.'' असे सुमित्रा तिला सांगते. (४९-५२)

रामवनवास आणि भरताला राज्यपद असे वर मागण्याबाबत आपली परंपरा कैकेयीला दोषी ठरते. तिला कुमाता असे मानते. परंतु शरद दळवी या मताला ग्राह्य मानत नाहीत. त्यासाठी ते वेगवेगळे युक्तिवादही निरनिराळ्या पात्रांद्वारे पुढे करतात. स्वत: कैकेयी स्वत:ला अगदी प्रामाणिक व निष्कलंक मानते. ''ही कैकेयी कितीही वाईट असली तरी खोटेपणा तिनं कधीच केला नाही. खऱ्यासाठी साऱ्या जगाशी लढू शकेल.'' (१३६)

कैकेयी स्वत:ची कैफियत मांडते.

''मी त्यावेळच्या घटनांच्या मागचे सारे धागेदोरे, सारीच कारणे, नव्हे काहीच स्पष्ट करू शकत नाही... मीही एक बाहुलीच होते. ती कशी आणि कुणाच्या हाती हेही मी स्पष्ट नाही करू शकत... त्यावेळी काही गोष्टींचे निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य मला होतं. या चक्राला एकवार गती देणं एवढंच माझ्या हाती होतं... मी गती दिली. एकवार घटनाचक्र सुरू झालं. ते स्वत:च्याच इच्छेप्रमाणे आणि स्वत:च्याच वेगानं फिरू लागलं. ते थांबवणं किंवा त्याची दिशा बदलणं कुणाच्याही हाती उरलंच नाही. मग त्यात सीतेला किंवा कुणा निष्पापांना अकारण यातना सोसाव्या लागल्या... मी जाणून विचार करून शब्द दिला... मला एकटीलाच त्रास झाला तर तो सोसायची माझी तयारी... पण या साऱ्याला मीच जबाबदार होते का? का घडलं हे सारं? या प्रश्नाचं उत्तर कुणालाही देणं मला शक्य नव्हतं.'' (१३७)

त्यावेळी काही गोष्टींचे निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य मला होतं. या चक्राला एकवार गती देणं एवढंच माझ्या हाती होतं... मी गती दिली. एकवार घटनाचक्र सुरू झालं. ते स्वतःच्याच इच्छेप्रमाणे आणि स्वतःच्याच वेगानं फिरू लागलं. ते थांबवणं किंवा त्याची दिशा बदलणं कुणाच्याही हाती उरलंच नाही.

आणि यावर उर्मिलेचे निवेदन येते ते असे : ''माते, पुरे तो विषय. कुणी काही म्हटले तरी आम्हा साऱ्या बहिणींच्या मनात तुमच्याविषयी आदर व प्रेम आहे... राजघराण्यातील कृत्रिम आणि खोट्या मर्यादांच्या सोन्याच्या साखळ्यात देखील तुम्ही आपले वेगळेपण टिकवलेत. साऱ्या जगाला, खऱ्याखोट्या टीकेला आणि निंदेला ताठ मानेनं तोंड दिसतं... हे सारं किती कठीण आहे... आम्ही ओळखून आहोत.'' (१३७) उर्मिलेची ही प्रतिक्रिया काहीशी अनपेक्षित वाटली तर नवल नाही.

परंतु लेखकाला कैकयीच्या स्त्रीत्वाचीच कैफियत सादर करायची असल्याने अशा अनेक जागा या कादंबरीत आलेल्या आहेत.

रामवनवास आणि भरताला सिंहासन हे वर मागितल्यावर लक्ष्मण आणि सुमंत्र कैकेयीला धारेवर धरतात. त्यावेळीही कैकेयीच्या तोंडी अत्यंत रोखठोक वाक्ये टाकली आहेत.

कैकेयीच्या या कृत्याची खुद्द तिचा पुत्र भरत निर्भत्सना करतो. तेव्हा कैकेयीला त्याबद्दल अभिमानच वाटतो. भरतानं राज्य नाकारलं त्या क्षणी माझं मातृत्व धन्य झालं. माता कैकेयी स्वार्थी नाही, मत्सरी नाही, पक्षपाती नाही. मला वाईट म्हणणाऱ्या मूर्ख माणसांनी उठवलेल्या साऱ्या दूषणांचा आणि आरोपांना उत्तर परस्पर माझ्या मुलांनी दिलं होतं– असा आनंद कैकेयी व्यक्त करते. (१३६)

सीतेला वनविहारासाठी पाठवणाऱ्या रामालाही कैकेयी फैलावर घेते... ''रामा, तू स्वत:पुरता विचार केलास. रुढीपरंपरेने मिळालेल्या पण धर्मशास्त्रात नसलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केलास आणि सीतेला माणूस म्हणून जगण्याचा अधिकारसुद्धा नाकारलास... तुझ्या वागण्यानं त्या खोट्या आरोपाला बळकटी मिळाली. अरे, तुमचे आदर्श पुढे ठेवून कुठलीही अविचारी पुरुष आपलं क्रौर्य आणि अन्याय अधिकार स्त्रीवर गाजवेल. जिथं स्त्रीची, तिच्या निष्ठेची आणि मातृत्वाची घोर विटंबना होते, जिथे सत्य आणि न्यायाची थट्टा होते तिथं पाणी प्यायची माझी इच्छा नाही... माझी जगण्याची हौस पुरती फिटलीय.'' (२१३) असे सांगून कैकेयी वानप्रस्थाश्रमासाठी दूर जाण्याचा निर्धार प्रकट करते. तेव्हा सुमित्राही तिच्या या भूमिकेला पाठिंबा देते. ''आमच्या स्त्रीत्वाचा गौरव तू राखलास... आमचा अभिमान जागविलास. आम्ही तुझे ऋणी आहोत असे ती म्हणते. (२१४) ''कैकेयी, अंत:पुराची प्रमुख म्हणून निर्णयाचा अधिकार माझा आहे'' असे महादेवी कौसल्या सांगते, आणि कैकेयीला एकटीला सोडायच्या ऐवजी तिघी राजमातांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारायचा निर्णय जाहीर करते. 'या तेजस्विनी कैकेयीच्या तेजाचा प्रकाश मार्ग दाखवतो आहे...' (२१५) महादेवी कैकेयीला आणखी श्रेय देते. ''कैकेयी विलक्षण हुशार आहे... मनाचा तोल ती सहज सावरेल...''

अरे, तुमचे आदर्श पुढे ठेवून कुठलीही अविचारी पुरुष आपलं क्रौर्य आणि अन्याय अधिकार स्त्रीवर गाजवेल. जिथं स्त्रीची, तिच्या निष्ठेची आणि मातृत्वाची घोर विटंबना होते, जिथे सत्य आणि न्यायाची थट्टा होते तिथं पाणी प्यायची माझी इच्छा नाही... माझी जगण्याची हौस पुरती फिटलीय.

भारताने आपल्या दृष्टिकोनातून पाहणे ही आई म्हणून कैकेयीची अपेक्षा

''पण ती चूक होती... आपल्या विचारांची दिशाच चुकत होती... मुलाला संस्कार देऊन, प्रेम देऊन, त्यातून मोकळं झालं तरच स्त्रीला मोकळं आयुष्य जगता येईल.'' असा शहाणपणाचा पश्चात्तापदग्ध विचारही कैकेयी प्रकट करते. भरताबद्दल आता तिला राग नाही, तसं मोठं प्रेमही नाही. (२२०)

''कैकेयी, तुझी दिशा तूच शोधलीस. बऱ्यावाईटाचा आणि योग्यायोग्याचा विवेक केलास... आधी वाटलं, तू सवती मत्सर आणि राज्यलोभापायी अशी वागलीस... रामावरचं तुझं प्रेम खरं आणि मनापासून होतं याची खात्री पटली. तरीही तू त्याला वनात पाठवलंस... पत्नी, माता किंवा एक स्त्री म्हणून आमच्या साऱ्याच भूमिका फसव्या होत्या. आयुष्यच सारं व्यर्थ गेलं होतं. साधा माणूस म्हणून जगण्याचं धैर्य व कौशल्य आम्ही दाखवू शकलो.'' असा कबुलीजवाब महाराणी देते, कैकेयीने केले ते योग्य केले. स्त्रीची अवहेलना होऊ नये म्हणून तिने सतत जागरूकपणे प्रयत्न केले असेही ती मान्य करते. (२५२)

मी क्षत्रियाची कन्या. न्यायासाठी लढण्याची मूळ प्रवृत्ती माझ्यापाशी आहे. माझ्यावर राजा जनकाचे संस्कार आहेत. त्यामुळे खंबीर आणि विवेकी वृत्तीचा वारसा मी घेतला आहे. मी भ्याड नाही. कर्तव्याची मला जाण आहे.

सीताचीही स्वत:ची स्वतंत्र प्रतिमा आहे. तिला वनात सोडून देण्यासाठी आलेल्या लक्ष्मणाला सांगते, ''मी क्षत्रियाची कन्या. न्यायासाठी लढण्याची मूळ प्रवृत्ती माझ्यापाशी आहे. माझ्यावर राजा जनकाचे संस्कार आहेत. त्यामुळे खंबीर आणि विवेकी वृत्तीचा वारसा मी घेतला आहे. मी भ्याड नाही. कर्तव्याची मला जाण आहे. राम-राघव माझ्या जीवनाचे अधिष्ठान. त्यांच्यावर प्रेम करणारी पत्नी... सौमित्रा, राजाज्ञा म्हणून नव्हे तर प्रिय पतीची आज्ञा म्हणून मी तिचा नम्रपणे स्वीकार करते आहे... देवगंधर्व, यक्षकिन्नर, राक्षसवानरादि वीर आणि तुम्ही दोघे बंधू यांच्या समोर अग्निनारायणाच्या साक्षीने मी माझे निर्दोषत्व सिद्ध केले आहे. तुम्हीही ते एकवार पारखून मान्य केलेत आणि आता अचानकपणे लोकापवादाचे निमित्त करून माझा त्याग करता आहात... भाऊजी, वनवासात आणि लंकेच्या बंदिवासात देखील मी कष्ट सोसले. दु:खाला हसले. का? कारण राघवाच्या प्रेमाचं आणि विश्वासाचं बळ माझ्या मनाला होतं... एकमेकांचा प्रगाढ विश्वास आणि निस्सीम प्रेम मला राखणाऱ्या पाशवी शक्तीशी झुंजण्याचे बळ देत होते... पण आज... तो प्रेम-विश्वासाचा खजिना हिरावून घेऊन, मला हीनदीन करूना तुमच्या भावानं मला वाऱ्यावर सोडलंय... पतीनं

मला ओळखलं नाही, आणि त्यामुळं असं चोरट्यासारखं त्याला वागावं लागत आहे.. हे माझं खरं दु:ख आहे. त्या विचारांच्या वेदना मरणप्राय आहेत.'' (६२-६४)

वाल्मीकी ऋषी या परित्यक्तेला, आर्यावर्तातील सर्वश्रेष्ठ लोकनायकाच्या टाकलेल्या पत्नीला आधार देतात. पित्याची माया देतात. माहेरची सावली देतात.

रामलक्ष्मणांनी विश्वामित्राच्या यज्ञाचे रक्षण करून जनस्थानातील सर्व राक्षसांचा उच्छेद करून, सीता स्वयंवरासाठी मिथिलेत आगमन केले त्यावेळचे त्यांचे दर्शन सीतेला यावेळी आठवते... वनवासाला निघण्याच्या वेळचे निरोपाचे क्षण आठवतात... (६८-७७) रावणवधानंतरचे रामाचे तिच्या बाबतीतले वर्तन आणि, अग्निपरीक्षेतून तावून सुलाखून निघाल्याचे क्षण आठवतात. (७९-८४)

त्या अग्निपरीक्षेत उतरूनही सीतेला मात्र वाटते, ''मी कुठेतरी विजयी झाले होते... राघव विजयी होते. त्यांनी आर्यपताका समुद्रापार रोवली होती. दिगंत यशाचे आणि कीर्तीचे ते मानकरी होते. नवा आदर्श त्यांनी स्थापला होता... मी मात्र पूर्णत: पराभूत होते... माझं सर्वस्व... राघवाचा विश्वास आणि प्रेम मी गमावलं होतं... लौकिकदृष्ट्या मी विजयिनी होते.''

एकमेकांचा प्रगाढ विश्वास आणि निस्सीम प्रेम मला राखणाऱ्या पाशवी शक्तीशी झुंजण्याचे बळ देत होते... पण आज... तो प्रेम-विश्वासाचा खजिना हिरावून घेऊन, मला हीनदीन करूना तुमच्या भावानं मला वाऱ्यावर सोडलंय... पतीनं मला ओळखलं नाही, आणि त्यामुळं असं चोरट्यासारखं त्याला वागावं लागत आहे..

तरीही सीता मनोमन उद्विग्न, निराश असते.

मंदोदरीची सेविका त्रिजटा अनेकांच्या मृत्यूला कारण ठरलेल्या सीतेवर धावून जाते तेव्हा मंदोदरी तिला आणि सीतेला वेगळ्या प्रकारे समजावते.

''सीते, माझ्यासारखीच तूही एक बळी आहेस. तुझ्या डोळ्यात... दु:ख, लज्जा आणि स्वत:विषयीचा तिरस्कार जाणवतो आहे. सीते, राजकारणाच्या, संघर्षाच्या, संस्कृतीच्या आणि एका मोठ्या कटाच्या आपण दोघी बळी आहोत. (८७) ...मी तुझ्यात स्त्री आणि स्त्रीत्वाचे लोभस रूप पाहते... स्त्री हे लहानमोठ्या स्वार्थासाठी सोंगटीसारखा तुझा वापर केलाय... सीते, स्त्री हे लहानमोठ्या स्वार्थासाठी पणाला लावण्याचा खेळणं... एक वस्तू म्हणून वापरली जातेय... रक्ष संस्कृतीचे माहेरघर लंका आणि त्या लंकेला शक्तिहीन करून आर्यांवरील संभाव्य आक्रमणाला मुळातून नाश करण्याची कल्पना द्रष्टेपणाचीच होती.. पण त्याने सरळ युद्धाऐवजी स्त्रीचा सोंगटीसारखा वापर

केला हे अयोग्य... पतीच्या चांगल्यावाईटाचे परिणाम पत्नीलाही भोगावे लागतात... स्त्रीला दुहेरी भोग असतात... पतीच्या कर्माचे आणि स्वत:च्याही कर्माचे... तसे मी माझे भोगेन तक्रार न करता... तू इथे आलास हा तुझ्या मनाचा मोठेपणा!'' (९०-९१)

रामाला वनवासात पाठवणाऱ्या कैकेयीबाबत सीतेच्या भावना काय आहेत? कैकेयीच्या वागण्यात सावत्रपणा वा परकेपणा नव्हता. त्यामुळे हे सर्व रामायण कैकेयीने घडवले का असा प्रश्न पडतो. कौटुंबिक हेवादावा म्हणून हे सारे घडले का? तसेही तिला वाटत नाही. हा संस्कृतीचा संघर्ष? आर्य-आर्येतर यांच्यातील वर्चस्वाचे राजकारण? कैकेयीचाही त्यासाठी सोंगटी म्हणून वापर केला गेला का? असा विचार सीतेच्या मनात येतो. (९३)

कैकेयी शेवटी रामालाही बजावते. ''तू लोकपालक... लोकनायक होण्याची संधी सोडू नकोस. परंपरेपुढे मान तुकवू नकोस. सत्याचा पाठपुरावा कर. नवे निर्भय आदर्श लोकांपुढे ठेव. सीता सात्त्विक व सोशिक आहे. आपल्या निष्ठेचा, प्रेमाचा व गाढ विश्वासाचा असा बाजार मांडलेला ती किती काळ सहन करील?'' (२९३) ती सर्व ऋषिमुनींनाही संतप्त होऊन जाब विचारते, ''कसले द्रष्टे मुनी? एका स्त्रीची... तिच्या निष्ठेची, प्रेमाची, सत्याची आणि सत्त्वाची अशी ही घोर विटंबना...? तुमचे बकध्यान पुरे! डोळे उघडा आता...'' (२९४)

तू लोकपालक... लोकनायक होण्याची संधी सोडू नकोस. परंपरेपुढे मान तुकवू नकोस. सत्याचा पाठपुरावा कर. नवे निर्भय आदर्श लोकांपुढे ठेव. सीता सात्त्विक व सोशिक आहे. आपल्या निष्ठेचा, प्रेमाचा व गाढ विश्वासाचा असा बाजार मांडलेला ती किती काळ सहन करील?

''...मी एकनिष्ठ आणि सत्यव्रती असेन तर हे भूमाते, मला परत तुझ्या पोटात घे.'' असे सीता म्हणते आणि अघटित घडते... भूमी दुभंगते... सीता गर्तेत गडप होते.

तेव्हा कैकेयी टाहो फोडते... कोसळते...

कैकेयीच्या व्यक्तिरेखेची ही सकारात्मक पेशकश करताना शरद दळवी यांनी आपले लेखन कौशल्य आणि वकिली युक्तिवाद यांचा चाणाक्ष वापर केला आहे यात शंकाच नाही. म्हणूनच ही कादंबरी वाचायला हवी. दळवींच्या वकिली कौशल्याला दाद द्यायला हवी.

पृष्ठे : ३०४● किंमत : २२०रु. ● सभासदांना : १६५रु. ● पोस्टेज : २०रु.

दि मॅजिक ऑफ थिंकिंग बिग

उच्च ध्येय समोर ठेवा, तुम्हीही नक्की मोठे व्हाल

डेव्हिड श्वार्त्झ

अनु. प्रशांत तळणीकर



दि मॅजिक ऑफ थिंकिंग बिग- (भव्य विचार करण्याची जादू) हे डेव्हिड जोसेफ श्वार्त्झ यांचे बेस्टसेलर पुस्तक. त्याचा मराठी अनुवाद प्रशांत तळणीकर यांनी केला आहे.

पुस्तकाच्या शीर्षकातच आपले विचार, आपल्या कल्पना भव्य हव्या हे सूचित केले आहे. अशा विशाल, भव्य, व्यापक विचार-कल्पनांमुळे मोठी किमया घडून येते, त्यामध्ये अद्‌भुत, विलक्षण शक्ती किंवा जादू असते; त्यामुळे मोठे परिवर्तन घडून येऊ शकते याकडे हे शीर्षक लक्ष वेधते. हा भव्य विचार आपण प्रत्येक बाबतीत करू शकतो, करावा. आपली आत्मप्रतिमा आपण उन्नत स्तरावर न्यावी; आपले ध्येय व उद्दिष्ट भव्य असावे, आपला आत्मविश्वास वाढावा, आपली कार्यप्रवणता वाढावी, उत्तम कृती घडून यावी आणि इतरांपेक्षा अधिक काहीतरी आपण करून दाखवावे, यशस्वी व्हावे... याला प्रेरक ठरणारे एकूण वातावरण आपण निर्माण करावे हे या पुस्तकाद्वारे अधोरेखित केले जाते. नो फेल्युअर बट लो एम इज क्राइम– अपयश हा गुन्हा नव्हे, अल्प वा क्षुल्लक आकांक्षा हा गुन्हा आहे; ध्येय नेहमी उच्च आणि उदात्त हवे. 'जगात चांगलं किंवा वाईट असं काहीही नसतं. आपण ज्या प्रकारे विचार करतो, त्यावरून एखाद्या गोष्टीवर आपण चांगल्या-वाईटपणाचा शिक्का मारत असतो; असे शेक्सपिअर म्हणतो, तेव्हा आपणास आश्चर्य वाटते. आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या, यशस्वी ठरलेल्या व्यक्तींच्या आयुष्यावर दृष्टिक्षेप टाकला, त्या यशाला पायाभूत ठरलेल्या गोष्टींचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला तर काय लक्षात येते? डेव्हिड श्वार्त्झ यांनी या प्रश्नाचे उत्तर देताना **'भव्य विचार करण्याची क्षमता', 'मोठं यश मिळवण्याची जिद्द'** ते भव्य उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य त्या साधनांचा किंवा मार्गाचा अवलंब करण्याची क्षमता याकडे अंगुलीनिर्देश केला

आहे. हे संपूर्ण पुस्तक या सूत्रांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक ती सामग्री पुरवते, त्यासाठी सोप्या पद्धती सुचवते. ह्या सोप्या पद्धती जगात कुठेही आणि केव्हाही काम करतात; जादूसारखा चमत्कार करून दाखवतात असा लेखकाचा आत्मविश्वास आहे. ''भव्य विचार कराल तर भव्य जीवन जगाल. अधिक आनंद मिळवाल. पैसा, मित्र, मानसन्मान, यश या दृष्टीनं समृद्ध जीवन जगाल.'' अशी धारणा लेखक व्यक्त करतो.

या पुस्तकातील प्रकरणांच्या मांडणीतून ह्या सर्व सोप्या पद्धती स्पष्ट होत जातात. एकापुढे एक तर्कसंगत असा युक्तिवाद त्यातून समोर येतो.

१. आपण यशस्वी होणार असा आत्मविश्वास बाळगा.

२. कारणेरिया (अपयशाबद्दल इतरांना दोष देत बसणे, कारणे सांगत बसणे) या रोगापासून सोडवणूक करून घ्या.

३. आत्मविश्वास वाढवा. भयाला हद्दपार करा.

४. भव्य विचार करा. तो करण्यासाठी पाळावयाची पथ्ये कोणती?

५. सृजनात्मक विचार करा; सर्जनशील स्वप्ने बघा.

६. तुमची आत्मप्रतिमा जी असेल, ती प्रत्येक बाबतीत निर्णायक ठरते. तुम्ही स्वत:ला जे समजता, तेच तुम्ही असता; तेच तुम्ही बनता.

७. तुमच्या भोवतालच्या वातावरणाचं योग्य व्यवस्थापन करा. ते करताना उच्च दर्जाची कास धरा.

८. तुमच्या मनोभूमिकेचा विधायक उपयोग करून घ्या.

९. इतर लोकांबद्दल विचार करताना तो सकारात्मक राहील अशी काळजी घ्या.

१०. कृतिशील रहा.

११. पराजयाचे रूपांतर विजयात करणे शक्य असते. ते कसे होऊ शकते?

१२. स्वत:ची प्रगती साधण्यासाठी ध्येयांचा उपयोग करा.

१३. नेत्यासारखा विचार करा. नेतृत्वगुणांचा वापर करा.

भव्य विचार, भव्य उद्दिष्ट, भव्य प्रयत्न आणि भव्य यश यांचा ध्यास घेतला तर त्यात तुम्ही सफल होऊ शकता.

यश म्हणजे सुंदर, चांगल्या गोष्टी.

यश म्हणजे व्यक्तिगत भरभराट.

ह्या सोप्या पद्धती जगात कुठेही आणि केव्हाही काम करतात; जादूसारखा चमत्कार करून दाखवतात असा लेखकाचा आत्मविश्वास आहे. ''भव्य विचार कराल तर भव्य जीवन जगाल. अधिक आनंद मिळवाल. पैसा, मित्र, मानसन्मान, यश या दृष्टीनं समृद्ध जीवन जगाल.''

यश म्हणजे सुंदर घर, भरपूर सुखसोयी, भरपूर प्रवाह, नवनव्या वस्तू

यश म्हणजे आर्थिक सुरक्षितताा.

यश म्हणजे मुलाबाळांना विकासासाठी उत्तम वातावरण.

यश म्हणजे नेतृत्व. व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात मानसन्मान.

यश म्हणजे स्वातंत्र्य. आत्मसन्मान. आनंद. समाधान.

यश म्हणजे सिद्धी. विजय. पराक्रम.

तुमचं मन म्हणजे विचारांचा कारखाना.

दिवसाकाठी अगणित विचार निर्माण करणारा एक अखंड धडधडता कारखाना.

तुमच्या या विचारांच्या कारखान्यातले उत्पादन श्री. यश आणि श्री. अपयश या दोन फोरमनांच्या नियंत्रणाखाली होती असते.

श्री. यश हे सकारात्मक, विधायक विचार निर्माण करणाऱ्या विभागाचे प्रमुख.

श्री. अपयश हे नकारात्मक; अवमूल्यनात्मक विचार निर्माण करणाऱ्या विभागाचे प्रमुख.

हे दोघे फोरमन तुमच्यासाठी काम करतात; पण ते तुमच्याकडून मिळणाऱ्या संदेशानुसार काम करतात.

तुम्ही म्हणा, आजचा दिवस छान आहे. खूप काम करायचे. तर श्री. यश लगेच त्यादृष्टीने कामाला लागतात.

तुम्ही म्हणा, ''ही गोष्ट ग्राहकाला विकता येणार नाही.'' तर श्री. अपयश तुम्हाला त्या गोष्टीतल्या उणिवांची भलीमोठी यादी देण्यास पुढे सरसावतील. नकारात्मक भूमिका मांडत राहण्यात श्री. अपयश यांचा हातखंडा असतो.

म्हणून तुम्ही श्री. अपयश यांना चक्क डच्चू द्या. कामावरून काढून टाका.

श्री. यश यांना पूर्णवेळ काम द्या. तुमच्या मतातही सकारात्मक विचार आणा. यशाची खात्री बाळगून कामाला लागा.

स्वत:वर विश्वास ठेवा. आपण यशस्वी होणार अशी श्रद्धा बाळगा.

स्वत:वर विश्वास ठेवून भव्य विचार करण्याची सवय मनाला लागावी म्हणून स्वत:ला तयार करण्यासाठी एका प्रक्रियेतून जाणे गरजेचे असते. ती प्रक्रिया, ते प्रशिक्षण या पुस्तकाद्वारे होऊ शकते. हे प्रशिक्षण आपण स्वत:च स्वत:च्या विवेकबुद्धीला स्मरून प्रामाणिकपणे पूर्ण करायला हवे. ते तसे केले तर त्याचा इष्ट तो परिणाम जाणवू शकेल. प्रतिष्ठा, पैसा, उच्च राहणीमान, कौटुंबिक आदर, या

स्वतःवर विश्वास ठेवून भव्य विचार करण्याची सवय मनाला लागावी म्हणून स्वतःला तयार करण्यासाठी एका प्रक्रियेतून जाणे गरजेचे असते. ती प्रक्रिया, ते प्रशिक्षण या पुस्तकाद्वारे होऊ शकते. हे प्रशिक्षण आपण स्वतःच स्वतःच्या विवेकबुद्धीला स्मरून प्रामाणिकपणे पूर्ण करायला हवे.

सर्वांचा लाभ होऊ शकेल.

हे प्रशिक्षण स्वयंशासित आहे. स्वत:च स्वत:च्या प्रगतीचे मूल्यमापन करायचे आहे. त्यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा तुमच्याजवळ आहे. तुमच्या अवतीभवती असणारी माणसं– त्यांचे निरीक्षण करा, मानवी व्यवहाराचं सखोल ज्ञान मिळवा... तुम्ही वैज्ञानिक आहात असं समजून निरीक्षण करा. सर्वात यशस्वी आणि सर्वात अपेशी अशा दोन-दोन व्यक्ती निवडा. त्यांच्या वागण्याबोलण्याचं या पुस्तकात दिलेल्या सूत्रांनुसार निरीक्षण करा. त्यावरून या पुस्तकात दिलेल्या सूत्रांची उपयुक्तता तुमच्या लक्षात येऊ शकेल. जेव्हा जेव्हा आपण दुसऱ्या व्यक्तीशी संपर्क साधतो, तेव्हा यशसाधनेच्या दृष्टीने आवश्यक ती सूत्रे वापरात आणण्याची संधी आपल्याला मिळत असते हे विसरू नका, असे हे पुस्तक सांगते.

आपण सबबी सांगण्यात पटाईत असतो. कुठलीही गोष्ट टाळायची असली की आपण सबबी पुढे करतो. यालाच या पुस्तकात **एक्स्कुझिटिस** असे नाव दिले आहे. मराठीत त्याचे 'कारणेरिया' असे नामकरण केले आहे.

कुठलेही भय घालवण्यासाठी काय करावे? प्रथम त्या भयाचे नेमके स्वरूप जाणून घ्या; आणि ते घालवण्यासाठी प्रत्यक्ष कृती करा. तुमच्या स्मरणपेढीत फक्त सकारात्मक विचारच जमा करा, त्यांचाच वापर करा;

ही कारणे चार प्रकारची असतात. आरोग्य, बुद्धी, वय आणि नशीब यांच्याशी संबंधित वर्गात ती मोडतात.

१. माझी तब्येत बरी नव्हती,

२. आपण काही एवढे हुशार नाही बुवा.

३. त्याचा काही उपयोग नाही. माझं वय निघून गेलंय. (मी अजून कुठं मोठा झालोय?)

४. माझं नशीबच फुटकं... त्याला कोण काय करणार?

आता या प्रत्येक 'कारणेरिया'वर उपाय आहे– आणि त्यासाठी हे पुस्तक वाचायला हवे.

आपल्यात आत्मविश्वासाचा अभाव असतो. त्याचबरोबर निरनिराळ्या प्रकारची भीती आपल्या मनात असते. त्यामुळे आपण कृती करायला घाबरतो.

या भयाचे काही प्रकार या पुस्तकात दिले आहेत.

१. स्वत:च्या रंगरूपाबद्दल लाज वाटणे.

२. एखादे महत्त्वाचे गिऱ्हाईक निघून जाईल अशी धास्ती वाटणे.

३. परीक्षेत नापास होऊ अशी भीती वाटणे.

४. आपल्या हाती नसलेल्या गोष्टींचे भय वाटणे.

५. वादळ किंवा अपघात, शारीरिक इजा पोहोचविणाऱ्या गोष्टींचे भय.

६. लोक काय म्हणतील याचे भय, दडपण.

७. एखादी गुंतवणूक करताना, नवे घर घेताना वाटणारे भय.

८. काही विशिष्ट व्यक्तींबद्दल वाटणारे भय.

वरील कुठलेही भय घालवण्यासाठी काय करावे? प्रथम त्या भयाचे नेमके स्वरूप जाणून घ्या; आणि ते घालवण्यासाठी प्रत्यक्ष कृती करा. तुमच्या स्मरणपेढीत फक्त सकारात्मक विचारच जमा करा, त्यांचाच वापर करा; नकारात्मक विचार भूत होऊन तुमच्या मानगुटीवर बसण्याआधीच त्यांचा नायनाट करा. आपले मन म्हणजे मानसिक भुतावळींचा भूतबंगला असतो. त्यामुळे गंभीर मानसिक समस्या उद्‌भवतात. नकारात्मक गोष्टी मनातून काढून टाका.

आत्मविश्वास वाढवण्यासाठी काय करावे?

१. नेहमी पुढच्या रांगेतच बसा.

२. दृष्टीला दृष्टी भिडवण्याचा सराव करा.

३. तुमच्या चालण्याची गती किमान २५ टक्के वाढवा.

४. संभाषणात भाग घेण्याचा सराव करा.

५. मोठ्ठं स्मित करायला शिका.

स्वतःचीच अशी चाचपणी करण्याचा एक मार्ग म्हणजे आपल्यातील पाच मुख्य चांगल्या गोष्टी शोधून काढा. चांगल्या गोष्टी म्हणजे शैक्षणिक पात्रता, कार्यानुभव, तांत्रिक कौशल्य, व्यक्तिमत्त्व, सुखी कौटुंबिक जीवन, नेतृत्वगुण, विधायक मानसिकता, मित्रमंडळी, आत्मविश्वास इ.

भव्य विचार करा, संकुचित विचार टाका असे लेखक सुचवतो, तेव्हा आपण त्यादृष्टीने आरंभ कसा करावा असा प्रश्न पडला तर तो स्वाभाविकच होय. त्यासाठी काही सोपे मार्ग चोखाळता येतात. आपण विचार करताना सकारात्मक असतो की नकारात्मक हे प्रथम जाणून घ्या. म्हणजेच स्वत:ला जाणून घ्या. स्वत:चीच अशी चाचपणी करण्याचा एक मार्ग म्हणजे आपल्यातील पाच मुख्य चांगल्या गोष्टी शोधून काढा. चांगल्या गोष्टी म्हणजे शैक्षणिक पात्रता, कार्यानुभव, तांत्रिक कौशल्य, व्यक्तिमत्त्व, सुखी कौटुंबिक जीवन, नेतृत्वगुण, विधायक मानसिकता, मित्रमंडळी, आत्मविश्वास इ. आणि त्या प्रत्येक चांगल्या गोष्टी खाली ज्याच्या अंगी तुमच्याएवढ्या प्रमाणात त्या नाहीत पण तरीही ज्यांनी यश मिळवलेलं आहे अशा तुमच्या माहितीतल्या किमान तीन-तीन अत्यंत यशस्वी म्हणता येईल अशा व्यक्तींची नावे लिहा.

या प्रक्रियेतून तुमच्या लक्षात एक गोष्ट नक्की येईल; अनेक यशस्वी लोकांपेक्षा तुम्ही किमान एखाद्या बाबतीत तरी वरचढ आहात. तुम्हाला वाटते त्यापेक्षा तुम्ही कितीतरी मोठे आहात. तेव्हा तुमचे विचार तुमच्या मोठेपणाशी जुळवून घ्या. तुम्ही

जितके मोठे आहात, तेवढा भव्य विचार करा.

विचार हा शब्दांद्वारे प्रकट होतो. तेव्हा आपला मोठेपणा प्रकट करणारे शब्दही आपल्याजवळ हवेत. परंतु केवळ मोठे शब्द वापरणे हे मोठेपणाचे गमक नव्हे. आपण मूलत: शब्दांद्वारे किंवा वाक्याद्वारे विचार करीत नाही. चित्र-प्रतिमांद्वारे विचार करतो. शब्द हा विचारांसाठीचा कच्चा माल असतो. शब्द ऐकला किंवा वाचला की आपले मन त्या शब्दाचे व वाक्याचे रूपांतर मानसिक प्रतिमेत करते. भव्य विचार करण्यासाठी भव्य आणि सकारात्मक मानसचित्रे निर्माण करणाऱ्या शब्दांचा आणि वाक्याचा उपयोग करणे आपल्याला जमायला हवे.

भव्य विचार करणाऱ्या माणसाप्रमाणे आपला शब्दसंग्रह विकसित कसा करावा? यासाठीही डेव्हिड श्वार्ट्झने चार मार्ग सुचविले आहेत.

१. आपले विचार-भाषा व्यक्त करण्यासाठी मोठ्या, सकारात्मक, आनंददर्शक शब्द-वाक्प्रयोगांचा वापर करा. 'मला थकल्यासारखं, मरगळल्यासारखं वाटतंय' ऐवजी 'मला झकास वाटतंय... तुम्हाला कसं वाटतंय?' असं म्हणत राहा. तुम्हाला छान वाटू लागेल. तुम्हाला नेहमी मजेत असणारा माणूस म्हणून लोक ओळखू लागतील. तुम्हाला खूप मित्रमैत्रिणी मिळतील.

आपले विचार-भाषा व्यक्त करण्यासाठी मोठ्या, सकारात्मक, आनंददर्शक शब्द-वाक्प्रयोगांचा वापर करा. 'मला थकल्यासारखं, मरगळल्यासारखं वाटतंय' ऐवजी 'मला झकास वाटतंय... तुम्हाला कसं वाटतंय?' असं म्हणत राहा. तुम्हाला छान वाटू लागेल.

२. इतर लोकांबद्दल बोलताना चांगल्या, अनुकूल, उदार शब्द-वाक्प्रचारांचा वापर करा. मित्र-सहकाऱ्यांबद्दल सकारात्मक व मोठे शब्दच वापरण्याचा सराव करा. कोणाबद्दलही नकारात्मक, कमीपणाचं, दोषदिग्दर्शक बोलण्याचे टाळा.

३. इतरांना प्रोत्साहन देण्यासाठी सकारात्मक भाषेचा प्रयोग करा. संधी मिळताच लोकांचं व्यक्तिगतरीत्या कौतुक करा. प्रशंसा लोकांना आवडते. योग्य शब्दांत केलेलं कौतुक म्हणजे यशाचं एक साधन आहे. त्याचा वापर करा. लोकांची वेषभूषा, काम, सिद्धी, कुटुंब यांची प्रशंसा करा.

४. आपली योजना सहकाऱ्यांना समजावून सांगताना सकारात्मक शब्द वापरा. 'ही एक छान संधी आहे', 'एक चांगली बातमी आहे' असे म्हटल्यावर लोकांचे डोळे चमकतात. यशाची आशा निर्माण करा.

वस्तूचं, माणसाचं, स्वत:चं मूल्य वाढवण्याचा सराव करा.

संकुचित विचारांपासून स्वत:ला दूर ठेवा. दृष्टी उच्च ध्येयावर ठेवा. एवढा त्रास घेण्याएवढी ही गोष्ट महत्त्वाची आहे का? असा प्रश्न स्वत:ला विचारा. नव्वद टक्के

भांडणे आणि वाद सुरू होण्याआधीच संपतील. क्षुल्लक गोष्टींच्या जाळ्यात सापडू नका.

भव्य विचार करणाऱ्याने काही पथ्येही पाळायला हवीत.

१. स्वत:चं अवमूल्यन करणाऱ्या वाईट सवयींवर मात करा. स्वत:बद्दल हीनगंड बाळगू नका.

२. भव्य विचार करणाऱ्या लोकांची सकारात्मक भाषा बोला. विजय, आशा, आनंद, समाधान व्यक्त होईल असे शब्द उपयोगात आणा.

३. आपल्या दृष्टीचा पल्ला वाढवावा. भविष्यात काय होऊ शकेल याकडे दृष्टी ठेवा.

४. तुमच्या कामाबद्दल सर्वसमावेशक दृष्टी मिळवा. आताचं काम महत्त्वाचं आहे अशी श्रद्धा बाळगून काम करा. त्यामुळे ते काम चांगलं होईल. त्यातून तुमच्या बढतीचा, प्रगतीचा मार्ग प्रशस्त होईल.

५. क्षुल्लक गोष्टींचा विचार सोडून द्या.

सर्जनशील, विधायक विचार करताना अपयशजनक, निरुत्साही, नकारात्मक विचारांना दूर ठेवा; एखादी गोष्ट करताना ती अशक्य आहे असे मानून टाळण्याऐवजी ती कशी शक्य होऊ शकेल यासाठी काय आहे, काय मिळवावे लागेल याची यादी करा. त्यामुळे ती गोष्ट करण्यासाठी बऱ्याच अनुकूल वस्तू जवळ आहेत हे तुमच्या लक्षात येईल. तुमचा उत्साह वाढेल. नव्या कल्पनांचं स्वागत करा. प्रयोगशील बना. प्रगतीची कास धरा.

सर्जनशील, विधायक विचार करताना अपयशजनक, निरुत्साही, नकारात्मक विचारांना दूर ठेवा; एखादी गोष्ट करताना ती अशक्य आहे असे मानून टाळण्याऐवजी ती कशी शक्य होऊ शकेल यासाठी काय आहे, काय मिळवावे लागेल याची यादी करा.

वैचारिक प्रेरणा मिळण्यासाठी तुमच्या व्यवसायाशी संबंधित एखाद्या व्यावसायिक संस्थेचे सभासद होऊन त्या संस्थेच्या कामकाजात नियमितपणे भाग घ्या. आपल्या व्यवसायाबाहेरच्या क्षेत्रातील एखाद्या व्यावसायिक संस्थेशीही संबंध ठेवा. काही नव्या गोष्टी तुम्हाला कळतील. तुमच्या व्यवसायालाही त्याचा फायदा होईल. नवनवीन कल्पना तुम्हाला सुचतील.

कल्पना म्हणजे तुमच्या विचारांचं फलित.

कल्पनांना मूल्य प्राप्त होण्यासाठी त्यांना सूत्ररूप देऊन कामाला लावण्याची गरज असते. त्या कल्पनांना मूर्त स्वरूप द्यावे लागते. कल्पना या तशा नाशवंत असतात. नकारात्मक विचार करणाऱ्यांच्या हातून त्यांचा विध्वंस होऊ शकतो.

प्रत्यक्षात फार थोड्या कल्पनांना मूर्तरूप लाभते.

कल्पनांची नोंद ठेवा. त्यांना हातून निसटून देऊ नका.

कल्पनांचा फेरआढावा घ्या. कल्पनांचे गोदाम वरचेवर तपासत राहा.

कल्पनांना खतपाणी घाला. वाढवा. विकसित करा.

भव्य विचार हे तुमच्या यशाचा पाया घालतात; तुमच्या आत्मप्रतिमेला ही भव्यता देतात. या आत्मप्रतिमेबाबतही काही मार्गदर्शक सूत्रे या पुस्तकात देण्यात आली आहेत. 'तुम्ही स्वत:ला समजता तेच तुम्ही असता.' तुम्ही, तुमचे रूप, तुमचे कपडे, तुमचे दिसणे, तुमचे बोलणे-चालणे– हे सर्व तुमच्याबद्दलची विशिष्ट प्रतिमा पाहणाऱ्याच्या मनावर ठसवत असते. तुम्ही स्वत: कसे वागता यावर इतर लोकांनी तुमच्याशी कसं वागावं हे ठरत असते. तुमचं व्यक्तिमत्त्व बोलकं असतं. ते तुमच्याबद्दल चांगलं, सकारात्मक बोलेल अशी काळजी घ्या. तुम्हाला ज्या प्रकारची व्यक्ती व्हावंसं वाटत असेल, तसेच तुम्ही दिसत आहात याची खात्री करून घ्या आणि मगच घराबाहेर पडा. तुमचा जोश, तुमचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी कपड्यांचा साधन म्हणून उपयोग करा. उत्तम कपडे घाला, कपड्यांना इस्त्री करा. बुटांनी पॉलिश करा. ऐटदार दिसा. त्यामुळे तुमच्या विचारांतही चमकदारपणा येईल. तुमचं रूप हे तुमच्याशी सुसंवादी हवं तसंच इतरांशीही संवाद साधणारं हवं. तुमच्या दिसण्यावरून लोक तुमचं मूल्यमापन करीत असतात. तुमच्या मूल्यमापनाचा पहिला मापदंड म्हणजे तुमचं बाह्यरूप. तुमच्याकडे बघून एखाद्याचे पहिले मत जे बनते ते दीर्घकाळ टिकणारे असते.

तुमचा जोश, तुमचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी कपड्यांचा साधन म्हणून उपयोग करा. उत्तम कपडे घाला, कपड्यांना इस्त्री करा. बुटांनी पॉलिश करा. ऐटदार दिसा. त्यामुळे तुमच्या विचारांतही चमकदारपणा येईल. तुमचं रूप हे तुमच्याशी सुसंवादी हवं तसंच इतरांशीही संवाद साधणारं हवं.

तुम्ही स्वत:ला कसे सादर करता, या गोष्टीला फार महत्त्व असते.

तुम्ही स्वत:ला चांगल्या प्रकारे लोकांसमोर ठेवले तर लोक तुम्हाला अधिक सहजतेने स्वीकारतील.

तुमच्या विचारांची पातळी वाढवा; त्यामुळे तुमच्या आचाराचीही पातळी वाढेल.

आपल्या विचारांची पातळी वाढवण्यासाठी काय करायला हवे?

आपली चिंता, आपली कल्पना, आपले बाह्यरूप, आपली भाषा, आपले वाचन, संभाषण, काम, आपला राग, आपला विनोद याबद्दल स्वत:लाच प्रश्न विचारून चाचपणी करा.

१. माझी चिंता- या गोष्टीबद्दल एखादा यशस्वी माणूस चिंता करील का? विचलित होईल का?

२. माझी कल्पना- एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला ही कल्पना सुचली असती तर

तो काय करील?

३. माझी भाषा- यशस्वी माणसे अशीच भाषा वापरतात का?

४. माझे बाह्यरूप- स्वत:बद्दल आतमसन्मान असलेल्या व्यक्तीसारखा मी दिसतो का?

५. माझे संभाषण- यशस्वी लोकांना माझ्या बोलण्यात तथ्य दिसत असेल का?

६. माझे वाचन- महत्त्वाचा माणूस हे वाचत असेल का?

७. माझा राग- मला ज्या गोष्टीचा राग येतो, त्या गोष्टीचा राग मोठ्या माणसालाही येत असेल का?

८. माझे विनोद- असे विनोद महत्त्वाचा माणूस सांगत राहील का?

९. माझे काम- यशस्वी माणूस आपल्या कामाचे वर्णन इतरांकडे याच रीतीने करीत असेल का?

या प्रश्नांद्वारे आपल्या वागण्याबोलण्यात इष्ट तो बदल घडवून आणणे सोपे जाईल.

आपल्या विचारांचा आपल्यावर परिणाम होतो तसाच आपल्या मित्रांच्या सहवासाचाही! योग्य विचार करणाऱ्या मित्रांच्याच सहवासात तुम्ही राहा. प्रगतीशील, सकारात्मक दृष्टी असणाऱ्या, कार्यक्षम व हुशार लोकांबरोबर तुम्ही संपर्क ठेवा. त्यांची संगत धरा. योग्य माणसाचाच सल्ला घ्या. अपयशी माणसाचा सल्ला घेणे म्हणजे कर्करोगावर वैदूला पाचारण करणे होय.

आपल्या विचारांचा आपल्यावर परिणाम होतो तसाच आपल्या मित्रांच्या सहवासाचाही! योग्य विचार करणाऱ्या मित्रांच्याच सहवासात तुम्ही राहा. प्रगतीशील, सकारात्मक दृष्टी असणाऱ्या, कार्यक्षम व हुशार लोकांबरोबर तुम्ही संपर्क ठेवा.

आपले सामाजिक वातावरण हेही बहुविध हवे. मित्रमैत्रिणी निरनिराळ्या क्षेत्रातील असू द्या. छोट्याच गटात राहिल्यास तोचतोपणा येतो. वैचारिकदृष्ट्याही भिन्न भिन्न मनाचे मित्र निवडा. विविध व्यवसाय, विविध धर्मपंथ– यातील लोकांच्या संपर्कामुळे तुमची दृष्टी एकांगी राहत नाही. सकारात्मक व्यक्ती, उपक्रमशील व्यक्ती, तुमच्या प्रगतीला प्रेरक ठरणाऱ्या व्यक्ती निवडा.

यशस्वी वातावरणात राहा. त्या वातावरणाला तुमच्या बाजूनं कामाला लावा. खुज्या विचाराच्या लोकांना तुमचे पाय ओढू देऊ नका. तुमच्या पडण्याने मत्सरी लोकांना आनंद मिळत असतो. त्यांना तसा आनंद मिळवू देऊ नका. फक्त यशस्वी लोकांनाच सल्ला विचारा. नवनव्या गटात सामील व्हा. नकारात्मक विचारांना थारा देऊ नका. कोणाबद्दलही तुच्छतेने, अवहेलनेने बोलू नका. उच्च दर्जाची कास धरा.

आपण लोकांना आवडायला हवे; आपल्याला लोक आवडायला हवेत. या

दृष्टीने यशस्वी व्यक्ती एका निश्चित योजनेनुसार काम करीत असतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांनी अध्यक्षपदी निवड होण्याआधीपासून आपला आर्जवी स्वभाव विकसित करण्यासाठी एक दहा कलमी सूत्रे स्वत:च निश्चित करून अमलात आणली होती. ती सूत्रेही या पुस्तकात देण्यात आली आहेत.

१. लोकांची नावे लक्षात ठेवण्यास शिका.

२. तुमच्या सहवासात कुणावरही ताण येणार नाही अशी सुखद व्यक्ती बना.

३. काहीही झालं तरी विचलित व्हायचे नाही, गडबडून जायचे नाही अशी सवय स्वत:ला लावा.

४. अहंभाव सोडून द्या. सगळं काही मला एकट्यालाच कळतं अशी तुमची प्रतिमा होऊ देऊ नका.

५. तुमच्या सहवासात इतरांना काहीतरी चांगलं मिळेल अशी गुणसंपन्न व्यक्ती बना.

मित्र मिळवताना आणखी एका गोष्टीचे भान हवे. कुठलीही व्यक्ती परिपूर्ण नसते. प्रत्येक व्यक्ती ही स्वतःच्या विशिष्ट सवयी, मते जपत असते. तिला तुमच्यापेक्षा वेगळे असण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागण्याची पूर्ण मुभा आहे.

६. आपल्या व्यक्तिमत्त्वातील ज्ञात-अज्ञात पैलूंचा शोध घेत राहा.

७. आपले पूर्वग्रह जाणून घेत राहा. ते दूर करा. ज्या गोष्टी आपल्याला खटकतात त्यांचं निराकरण करा.

८. आपल्याला लोक आवडायला हवेत, लोकांच्या समस्या जाणून घ्यायला हव्यात असे मनाला पटवत राहा. त्यासाठीही सराव करावा लागतो.

९. कोणीही छोटेमोठे यश संपादन केले तर त्याचे अभिनंदन करा. दु:ख-शोकप्रसंगी सांत्वन करायला, सहानुभूती दाखवायला विसरू नका.

१०. लोकांचे आत्मबळ वाढवा. तरच त्यांचे खरे प्रेम तुम्हाला मिळेल.

लोकांची आवड निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक सराव केल्याने लिंडन जॉन्सन यांना राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकणे आणि पुढे पार्लमेंट-सिनेटचे सहकार्य मिळवणे अवघड गेले नाही. या दहा नियमांत कुठेही सूडभावना, दुराग्रह, यांना थारा नाही. मीच शहाणा असा दर्प नाही. उलट लोकांच्या सुखदु:खाशी समरस होऊन मैत्र वाढवण्याचा प्रयत्न आहे. मैत्री करण्यात पुढाकार घेण्याची भावना आहे.

मित्र जोडण्यातही थोडाफार पुढाकार आपणच घ्यायचा असतो.

१. संधी मिळताच स्वत:चा इतरांना परिचय करून द्या.

२. समोरच्या व्यक्तीला तुमचे नाव नीट ऐकू जाईल अशी काळजी घ्या.

३. समोरची व्यक्ती स्वत:चे नाव ज्याप्रकारे उच्चारते, त्याप्रकारे ते उच्चारण्याचा सराव करा.

४. नाव नीट लिहून घ्या. स्पेलिंग अचूक जाणून घ्या.

५. नव्यानं मैत्री झालेल्या व्यक्तीशी अधूनमधून पत्राद्वारे, फोनद्वारे संपर्क ठेवा.

६. अपरिचिताशी काहीतरी छान बोला. त्यामुळे आपल्याला छान वाटते. त्याच्याही लक्षात आपण राहतो.

मित्र मिळवताना आणखी एका गोष्टीचे भान हवे. कुठलीही व्यक्ती परिपूर्ण नसते. प्रत्येक व्यक्ती ही स्वत:च्या विशिष्ट सवयी, मते जपत असते. तिला तुमच्यापेक्षा वेगळे असण्याचा पूर्ण अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागण्याची पूर्ण मुभा आहे. तुम्हाला आवडावे असेच तिचे वागणे असावे ही अपेक्षा गैर आहे. तिला सुधारण्याची भूमिका सोडून द्या. तुझं चूक असं ऐकायला बहुतांश लोकांना आवडत नाही. लोकांचा आहे तसा स्वीकार करण्याची सवय झाली तर तुमच्या वर्तुळात अनेक लोक येत राहतील. नाहीतर तुम्हाला मित्र मिळणेच दुरापास्त ठरेल.

संभाषणातल्या औदार्यामुळे अधिक मित्र जोडले जातात आणि तुम्हाला लोकांबद्दल अधिक काही जाणून घेण्याची संधी मिळते.

तुम्ही इतर लोकांना आवडण्याजोगे बना. लोकांना ज्या प्रकारच्या व्यक्ती आवडतात तसं बनण्याचा प्रयत्न करा. तसे करण्याने तुम्हाला त्यांचा पाठिंबा मिळेल. 'तुम्हाला वर उचलून घेणं सोपं जाईल, असे हलके व्हा.' नेहमी सौजन्यानंच वागा.

तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर कृतिशील व्हा. परिस्थिती प्रतिकूल आहे, ती अनुकूल होईपर्यंत थांबू असे म्हणून आजचे काम उद्यावर ढकलू नका. अडथळे गृहीत धरा; कामाला लागा. फक्त कल्पना सुचली म्हणजे यश मिळाले असे नाही. त्या कल्पनेला मोल प्राप्त होण्यासाठी कृती करा. कृतीनेच कल्पनेला मोल येते.

तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर कृतिशील व्हा. परिस्थिती प्रतिकूल आहे, ती अनुकूल होईपर्यंत थांबू असे म्हणून आजचे काम उद्यावर ढकलू नका. अडथळे गृहीत धरा; कामाला लागा. फक्त कल्पना सुचली म्हणजे यश मिळाले असे नाही. त्या कल्पनेला मोल प्राप्त होण्यासाठी कृती करा. कृतीनेच कल्पनेला मोल येते. कृती करायला लागला तर कामाची भीती दूर होईल. कृतीमुळे प्रेरणा मिळेल. कृती करण्यासाठी मुहूर्त बघत बसू नका. आत्ताच्या भाषेत विचार करा. कामाला लगेच आरंभ करा. पूर्वतयारीच्या नावावर वेळ घालवू नका. कृतीबाबत पुढाकार घ्या. आपण होऊन पुढे व्हा. महत्त्वाकांक्षेला कृतीची जोड द्या.

त्यासाठी प्रगतिशील दृष्टिकोन बाळगा. करत असलेल्या गोष्टीत सुधारणा कशा

करता येतील याचा विचार करा. त्या गोष्टीचा दर्जा वाढवण्यासाठी काय करावे याचा विचार करा. प्रगतीवर श्रद्धा ठेवा.

नेतृत्वाचे काही नियम या पुस्तकात दिले आहेत.

१. तुम्हाला ज्या लोकांवर आपला प्रभाव पाडायचा आहे, त्यांच्याबरोबर विचारांची देवघेव करा.

२. एखादी परिस्थिती हाताळण्याचा मानवतावादी मार्ग कोणता आहे याचा शोध घ्या.

३. प्रगतीचा विचार करा, प्रगतीवर श्रद्धा ठेवा. प्रगतीचा आग्रह धरा.

४. स्वत:च स्वत:शी विचारविनिमय करण्यासाठी वेळ काढा. तुमच्यातल्या सर्वंकष सर्वोत्तम विचारशक्तीचा वापर करा. सुनियोजित एकांताचा फायदा सृजनशक्तीच्या विकासासाठी होतो. कसोटीच्या क्षणी भव्य विचार करण्याने फायदा होतो. भव्य विचारात एक जादू असते.

हे पुस्तक तुमच्या आयुष्याला एक वेगळे वळण देऊ शकेल. आसपासच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ ठरण्यासाठी तुम्ही फार प्रतिभावंत, बुद्धिमान आणि उपजत हुशारच असायला हवे असे नाही. यश मिळवून देणाऱ्या भव्य विचारांना कृतीची जोड देऊन, मित्र-सहकाऱ्यांना आपलेसे करून तुम्ही अमाप यश गाठीला बांधू शकता.

आपली स्वत:ची आत्मप्रतिमा विशाल, सकारात्मक करणे; समोर उच्च, भव्य ध्येय ठेवणे, आपली प्रतिमा लोकांना आवडेल अशा प्रकारे तयार करणे, मित्र व सहकारी यांच्याकडे सकारात्मक दृष्टीने बघणे आणि आपल्या भव्य विचारांना कृतीत आणण्यासाठी आता या क्षणापासून आरंभ करणे– असा हा मार्ग या पुस्तकाद्वारे आपल्यासाठी खुला होत आहे. लेखकाने विवेचन करताना अनेक उदाहरणे दिली आहेत; त्यातून मानवी स्वभावाचे, वृत्तीचे वेगवेगळे नमुने पेश केले आहेत. निरनिराळ्या संस्थांच्या अडचणींचे व त्यातून त्यांनी काढलेल्या उत्तराचे विश्लेषण केले आहे.

...त्यामुळे हे पुस्तक तुमच्या आयुष्याला एक वेगळे वळण देऊ शकेल. आसपासच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ ठरण्यासाठी तुम्ही फार प्रतिभावंत, बुद्धिमान आणि उपजत हुशारच असायला हवे असे नाही. यश मिळवून देणाऱ्या भव्य विचारांना कृतीची जोड देऊन, मित्र-सहकाऱ्यांना आपलेसे करून तुम्ही अमाप यश गाठीला बांधू शकता; त्याचा एक सुनियोजित कार्यक्रमच या पुस्तकाद्वारे तुम्हाला आत्मसात करता येईल... त्यायोगे आपल्या भावी आयुष्याला एक यशस्वी, सकारात्मक, सुंदर आकृतिबंध देता येईल.

पृष्ठे : २८०● किंमत : २००रु. ● सभासदांना : १५०रु. ● पोस्टेज : २५रु.

साधंसुधं...

कच्चं कोवळं

प्रमोदिनी वडके-कवळे

रविवारची प्रसन्न संध्याकाळ! दिवाळी झाल्यानंतरचा रविवार असल्यामुळे आमच्याकडे 'बिलेटेड' भाऊबीज साजरी होत होती. भाचेपुतण्यांनी घर गजबजलं होतं. नव्या पिढीतली सगळी भावंडं बऱ्याच दिवसांनी एकत्र जमली होती. त्यामुळे चवदार फराळाच्या जोडीने थट्टामस्करी, एकमेकांची फिरकी घेणं, लहानपणीच्या आठवणी काढून चिडवणं असा मस्त मूड घरभर पसरून राहिला होता. माझ्या हातच्या पदार्थांची स्तुती चालल्यामुळे मीही खुषीत होते. मी, नणंद, जाऊबाई– आमची हॉल ते स्वयंपाकघर अशी लगबग चालली होती.

तेवढ्यात भारतीचा– माझ्या मैत्रिणीचा– फोन आला. ''अग एक वाईट बातमी आहे. रंजना दामले गेली आज सकाळी.''

''अं?'' मी क्षणभर सुन्नच.

भानावर आले तेव्हा हळूहळू माझ्या डोळ्यासमोर रंजना दामले उभी राहिली. सावळी, तडफदार स्वभावाची, काहीशा तिखट जिभेची आणि मुख्य म्हणजे माझ्याच वयाची. काही वर्षांपूर्वी माझी बदली ठाण्याला झाली होती. मी रोज सकाळी सिंहगड एक्सप्रेसने ऑफिसला जायची. त्यावेळी गाडीत तिची ओळख झाली होती. पाचसहा जणींचा चांगला ग्रुप जमला होता. रोज मस्त गप्पा व्हायच्या. माझी परत पुण्याला बदली झाल्यावर त्या थांबल्याच. कधीतरी रस्त्यात कुणाची भेट व्हायची तेवढीच! रंजनाला ब्रेस्ट कॅन्सर झाल्याचं माझ्या कानावर आलं होतं. त्यानंतर तिचं ऑपरेशन झाल्याचं आणि तिची तब्येत सुधारत असल्याचंही कळलं होतं. त्यावेळच्या एकदोघींबरोबर तिच्याबद्दलचं बोलणंही झालं होतं. ''जाऊन येऊ यात ग एक दिवस तिच्याकडे.'' या वाक्यावर त्या संवादाचा समारोप झाला होता. पण काही ना काही कारणाने तिला भेटायला जाणं लांबलं होतं. तरी आम्ही जाणार होतो हे निश्चित. पण आज एकाएकी ही बातमी यावी? इतकं पटकन सगळं संपू शकतं? माझ्या बरोबरीची– काही काळापुरती माझ्या सुखदु:खाशी जोडली गेलेली ती हसरी रंजना देहामनासकट संपूनच गेली एकदम?

''काकू, दोन प्लेट कचोरी आणि साथमें दही... जल्दीऽऽ'' पुतण्या अगदी कानाशी येऊन ओरडला तेव्हा कुठे मी भानावर आले. चेहऱ्यावर तुकडाभर हसू चिकटवून त्या उत्साहरंगात शिरले... पण मनावरचे कृष्णमेघ तसेच होते.

''कुणाचा फोन होता? काही गंभीर आहे का?'' नणंदेने विचारलं तेव्हा

मला राहवलंच नाही. मी सांगून टाकलं.

''ब्रेस्ट कॅन्सरचा पेशंट जातोच पटकन. फार मनाला लावून घेऊ नको. तुझी फार जवळची मैत्रीण नव्हती ना?'' तिचा पुढचा तद्दन व्यवहारी उद्‌गार.

मला चटकन उत्तर देता येईना. रंजनाची आणि माझी गेल्या कित्येक वर्षांत गाठभेट नव्हती. आमच्या कुटुंबियांचे एकमेकांशी संबंध नव्हते. ओळखी नव्हत्या. आमच्या आवडीनिवडी जुळताहेत की नाही ते आम्हाला ठाऊक नव्हतं. एकमेकींवाचून कोठे काही अडावं असं काहीही आमच्या नात्यात नव्हतं. तरीही तिच्या जाण्याने मी घरातलं उत्साही वातावरण विसरून एवढं उदास का व्हावं हे आजूबाजूच्या लोकांना उमगत नव्हतं. दूरच्या ओळखीतली रंजना! तिच्या मृत्यूने मी का उदास झालेय हे मला माझ्या जवळच्या माणसांना समजावता येत नव्हतं.

कारण काही नाती असतातच अशी. शब्दातून सांगता न येणारी!

आपलं सामान्य लोकांचं आयुष्य टपाल वाहून नेणाऱ्या पॅसेंजर गाडीसारखं असतं. प्रत्येक स्टेशनवर रेंगाळात तिथल्या टपालाचं ओझं पुढच्या प्रवासात वागवत ते संथ गतीने पुढे सरकत असतं. ही गाडी जिथे पुन्हा पुन्हा जाते, बराच वेळ थांबते अशा मुख्य स्टेशनांना आपण लगबगीने नात्यांची लेबलं चिकटवून टाकतोच. काही नाती रक्ताची तर काही मैत्रीची. मात्र ही लेबलंही आपण किती कंजूषपणे वापरतो... जसा काही त्यांचा मोजकाच साठा आहे आपल्याकडे. मैत्री हे लेबल असंच. पटकन कुणाला मित्र किंवा मैत्रीण म्हणायला मात्र आपली जीभ किती कचरते?

आपल्या लेखी मैत्रीसाठी ठराविक कालखंड तरी एकत्र काढायला हवा. मग तो शाळाकॉलेजमधला असो नाहीतर नोकरीतला. 'समानशीलेषु व्यसनेषु सख्यम्' असं तर विद्वानांनी म्हणूनच ठेवलंय. त्याला अपील नाहीच. शिवाय मित्रमैत्रीण शक्यातो समवयस्क असावी हेही एक ठाम गृहीत. दहापंधरा वर्षं मागेपुढे चालतं, पण ऐंशीच्या आजींनी गंभीर चेहऱ्याने आठ वर्षांच्या चिमुरडीला 'माझी मैत्रीण' म्हटलं की आपल्याला तो विनोदच वाटतो. कारण नातेसंबंधाचे हे असे अलिखित कायदे आपण पिढ्यानपिढ्या जपत आलोय. मैत्रीच्या बाबतीत तर ते अगदी काटेकोरपणे पाळले जातात. स्त्रीपुरुषांची मैत्री हा तर 'ओवळ्यातलाच' विषय. तथाकथित सभ्यतेची सोवळी वस्त्रं अंगावर चढवूनच त्याबद्दल बोलायचं आणि नंतरही पापक्षालनासाठी ''ते दोघं कितीही म्हणाले तरी त्यांची नक्की मैत्रीच असेल ना?'' अशा रास्त शंकेचं गोमूत्र शिंपडून मन 'शुद्ध' करायचं. आजकाल नव्या पिढीने समजूतदारपणे हे सोवळे

नियम झुगारून दिले आहेत आणि त्यांचं ओवळं वागणं आपणही जमेल तेवढं पचनी पाडून घेतलं आहे. ''माझ्या मुलाला मैत्रिणी आहेत असं नव्या पिढीतली आई बिनदिक्कतपणे शेजारणीला सांगते. पण त्याच वेळी मोटारसायकलवर मुलाच्या मागे बसलेली त्याची मैत्रीण कितपत जवळीकीने बसलीय हेही टिपतेच एका डोळ्याने. तात्पर्य काय मैत्रीचं नातं सांगताना आपल्या मनात जवळची, दूरची, बालपणीची, कॉलनीतली अशा कितीतरी विशेषणांच्या भिंती उभ्या असतात आणि त्या तोडायचा आपण प्रयत्नही करत नाही.

रंजना कोण होती माझी? मैत्रीच्या तथाकथित व्याख्येनुसार आम्ही मैत्रिणी नसलो तरी माझ्या व्यक्तिमत्त्वात तिचं योगदान होतं. तिने मला कितीतरी गोष्टी शिकवल्या होत्या. आयुष्याची रांगोळी रेखीव होण्यासाठी लागणारे कितीतरी ठिपके माझ्यासाठी रंजनाने मांडले होते...

तिच्याबद्दल विचार करायला लागले तेव्हा जाणवलं, मैत्रीचा आणखी एक प्रकार असतो. जो आपण मैत्रीच्या नेहमीच्या वर्गवारीत कधीच गृहीत धरत नाही. कच्ची मैत्री! कोवळा स्नेह!!

मैत्रीचं नातं जुळतानाचे सुरुवातीचे दिवस म्हणजे हा कोवळा स्नेह. कधीकधी पुढे ही मैत्री चांगली घट्ट जमते किंवा क्षीण होत होत उगीचच तुटूनही जाते. पण तरीही कोवळ्या नात्याचे ते अलवार दिवस आयुष्याला वेगळ्या अनुभवाचं देणं देऊन पुढे जातात.

या मैत्रीला नेहमीच्या दोस्तीतले नियम लागू पडत नाहीत. कोवळ्या मैत्रीला नियमच नसतात. तिची प्रकृती वेगळीच आणि म्हणून त्यातली देणीघेणीही वेगळी. पुढे ती मैत्री जून परिपक्व झाली की त्यावेळी रुसवेफुगवे, मानपमान, बुद्धिसंपत्तीची तुलना असे षड्‌रिपूतल्या यादीबाहेरचे सगळे शत्रू मनात वस्तीला आलेले असतात. पण कोवळ्या मैत्रीत मात्र असते एक अनिश्चितता आणि त्यामुळेच येणारी अनिवार ओढ.

रंजनाची आणि माझी मैत्री अशी कोवळीच होती. ती फारशी पुढे गेली नाही पण तरीही लग्नानंतर नव्या घरात जुळवून घेण्याच्या अवघड कालखंडात तिने मला बोट धरून चालवलं. तिने आणि त्या ग्रुपमधल्या सगळ्याचजणींनी.

रंजनाला संसाराची जबरदस्त हौस. पण प्रेमविवाहामुळे सासरमाहेर तुटलेलं. घरात अगदी चमच्यापासून सगळंच नव्याने उभं करावं लागणार होतं. पगाराची ओढाताण आणि हप्त्याचं आश्वासन यातून रंजनाने आपलं स्वत:चं पूर्ण विश्व उभं केलं. घरात कशाची कमतरता ठेवली नाही. संसाराचा मोह कितपत धरावा, हप्त्याने वस्तू घ्याव्यात की नाही हे वादाचे आणि परिसंवादाचे विषय आहेत. पण त्यासाठीची रंजनाची

जिद्द मात्र मलाही खूप काही शिकवून गेली. कदाचित आज माझ्य स्वयंपाकघरातल्या सजावटीला कुठेतरी रंजनाच्या सहवासाचा स्पर्श असेलही. त्याच ग्रुपमधल्या शोभाने आम्हाला स्वयंपाकाची चव वाढवणाऱ्या सोप्यासोप्या युक्त्या सांगितल्या. वसुधाला आमच्यासारखा सासुरवासाचा अनुभव नव्हता, पण कसलाही ताण आला की गाण्याने तो सहज कमी करता येतो हे तिनेच आम्हाला शिकवलं. शीतलचा व्यवस्थितपणा तर कुणीही शिकून घ्यावा असा. उज्ज्वलाचं न मावळणारं हसू आपल्याही चेहऱ्यावर यावं असं तर प्रत्येकीलाच वाटून जायचं. ज्योतीची देवावरची श्रद्धा इतकी दाट की आपोआप आमच्याही मनात भक्तिभाव जागा व्हायचा. हात जोडले जायचे. सोशिकपणा म्हणजे काय ते नीलाकडूनच शिकावं. रोहिणी छोट्या छोट्या गोष्टीही खूप मन लावून करायची. त्यामुळे तिच्या हातच्या कोणत्याही पदार्थाला त्या मन:पूर्वकतेचीच सुरेख चव यायची. रेखाचा खरेपणाचा सडेतोड आग्रह. तिच्यासमोर खोटं बोलायची लाजच वाटायची. माणिकमध्ये आयुष्य जसं समोर येईल तसं निभावून नेण्याचं कौशल्य होतं. माणसं कशीही वागली तरी त्यांना घट्टपणे जोडून ठेवणं तिला सहज जमायचं.

या सगळ्यांच्या स्वभावातलं कणकण उचलून मी माझं आयुष्य घडवलं. संसारात जमवून घेतलं. आईनं जमवून घ्यायला शिकवलं होतं, पण तिच्या काळातल्या समस्या आणि समजुती वेगळ्या. त्यामुळे तिनो दिलेलं सगळंच ज्ञान वेळेवर वापरता यायचं नाही. मग संसारातल्या समस्येला उत्तर शोधताना एखाद्या रेडी रेफरन्ससारख्या या सगळ्या मैत्रिणी समोर असायच्या. ऑफिसमधल्या कँटीनच्या जेवणाने त्रास होतो म्हणून मी घरून डबा घेऊन जायची. घरून डबा आणणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आमच्या कँटीनमध्ये वेगळे बाक ठेवलेले असतात. त्यावर आणखी एकजण येऊन बसायची. जवळजवळ माझ्या मुलीच्या वयाची! आमचं वय, खातं, हुद्दा, शिक्षण, आवडीनिवडी सगळ्यांत भिन्नता. पण दोघीही बडबड्या असल्याने आमही जेवताना खूप गप्पा मारायचो. एरवी एका कंपनीत असूनही तिचा-माझा कुठेच काही संबंध नव्हता. दिवसभरातला तेवढा अर्धा तास फक्त आमचा असायचा. पण पुढेपुढे तो इतका अपरिहार्य झाला की दोघींपैकी एकजण नसली तर दुसरीला जेवण जायचं नाही. बरं त्या अर्ध्या तासात होणाऱ्या गप्पा अगदी वरवरच्या किंवा टाईमपास स्वरूपाच्या नसायच्या. जीवनविषयक तत्त्वज्ञानापासून काल रात्री पाहिलेल्या टीव्ही सीरियलपर्यंत सगळे विषय आम्ही उलथेपालथे करून टाकायचो. माझ्या नोकरीची बरीच वर्षं झाल्याने कामातला तोचतोचपणा मला कंटाळवाणा वाटायचा, तर कॉलेजमधून

थेट आठ तास बांधून घालणाऱ्या या नोकरीत शिरल्यामुळे तिलाही 'बोअर' व्हायचं. पण मधला हा अर्धातास आम्हाला दोघींनाही टवटवीतपणा देऊन जायचा. आमच्या एकमेकीत बुडून जाऊन चाललेल्या गप्पांची आजूबाजूचे सगळे चेष्टा करायचे. पण त्या अर्ध्या तासात उरलेल्या जगापासून आम्ही जशा काही तुटलेल्याच असायचो. लंच अवर संपल्यावर एकतिसाव्य मिनिटाला आमची फारकत व्हायची तेव्हा मनात विरहाची रुखरुख वगैरे काही नसायची, तर पोटभर बडबडीची तृप्तीच असायची... असं विलक्षण नातं होतं आमच्यात.

मोजून अर्ध्या तासाचा आनंद देणाऱ्या या नात्याला कोणतं नाव द्यायचं?

मात्र नाव दिलेलं नसूनही आमचं नातं अव्याहतपणे पुढे वाहतं आहे.

कोवळेपणाचा मऊ निरागस स्पर्श अवघं जगणंच बदलून टाकणारा. विशिष्ट जातीतल्या गवताच्या पात्यांना विलक्षण धार असते, पण त्याची कोवळी पाती म्हणे नेहमीच्या गवतासारखीच मऊ, लुसलुशीत असतात. कोवळ्या स्नेहाचीही तीच अवस्था! जवळीकीच्या नात्यात हमखास येणारी मानापमानाच्या जाणीवेची धार त्यात नसते. उलट त्याला अर्धकच्चेपणाचा खास आंबटओला स्वाद असतो. अर्धवट वाळलेल्या कुरड्यांना असतो ना अगदी तसाच!

कोवळ्या मैत्रीतल्या ज्ञानाच्या देवाणघेवाणीत ज्ञानीपणाचा आव आणलेला नसतो. उलट संध्याकाळच्या वेळी घरी आलेल्या सवाष्णीला कुंकू लावावं तशी सहजता असते त्यात. ''अगं, पुरण पातळ झालं तर त्यात पटकन जरासे पोहे भिजवून टाकायचे. लग्गेच मिळून येतं.'' अशा मोलाच्या शहापणपणाची चिमूट हातावर ठेवताना देणारी गुरुदक्षिणा मागत नाही की घेणारीही अनुभवाचं सर्टिफिकेट दाखवण्याचा आग्रह करत नाही. अशा कोवळ्या मैत्रीतूनच पुढे कधीतरी मैत्रीचं नातं जुळून जातं. पण तशा जुळलेल्या नात्याची आणखी एक गंमत म्हणजे त्यानंतर मैत्रिणीचा सल्ला तितकासा सहजपणे स्वीकारला जात नाही. उलट तो शहाणपणा किंवा आगाऊपणा या लेबलखाली ढकलला जातो. आनंदाच्या क्षणांची साखर हातावर ठेवणाऱ्या यातल्या कितीतरी जणींशी पुढे माझं मैत्रं जुळलं पण ते कोवळेपणाचे दिवस मात्र पुन्हा आले नाहीत. ते नुसते आठवले तरी अजूनही मनाला भूल पडते.

आजूबाजूला जमलेल्या नातेवाईकांचं भान विसरून मी माझ्याच विचारात बुडून गेले होते. रंजनाच्या आठवणींचे दोन अश्रू माझ्याही

नकळत गालावर ओघळले होते.

वाटलं, पुन्हा कुठे भेटतील मैत्रीचे ते हवेहवेसे पहाटरंग? आपल्याला फसवून आयुष्यातली कितीतरी वर्षं भराभर पुढे सरकली. समोर आलेलं नवं माणूस धूर्तपणे जोखण्याची सवयच लागून गेली. अनुभवाच्या गोंडस नावाखाली संवेदना निबर होऊन गेल्या. नात्यातलं असं कोवळेपण केवळ आठवणी बनूनच राहणार का आता?

रियाला- माझ्या नातीला माझी मन:स्थिती कशी जाणवली कोण जाणे! आपला मखमली तळवा माझ्या गालावर टेकवत तिने विचारलं, ''काय झालं आज्जू?''

तिच्या प्रश्नाने मला जास्तच भरून आलं. तिच्याकडे बघताना काल नर्सरीतून आल्यावर तिचं तिच्या फ्रेंडबद्दलचं उत्साहाने बोलणं आठवलं. वाटलं, नाही! सगळं संपलेलं नाही!! रोजच्या सूर्योदयासारखीच कोवळ्या मैत्रीची ही मखमाली पाती कुठे ना कुठे नक्की उगवत राहतील. तिच्या तळव्याचा तो मृदूकोमल स्पर्श गालावर घट्ट दाबून धरत मी तिच्याच भाषेत तिला सांगितलं, ''काही नाही ग! मला जरा माझ्या फ्रेंडची आठवण आली.''

— — — — — — — — — — — **प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

या सुखांनो

सर्वांगांनी जीवनाचे मर्म
शोधून सुखाचा मार्ग
दाखवणारे सुंदर
ललितलेखन.

किंमत : १७०रु.

दीपयोजना २००५

कमीत कमी १००० रु.ची आमच्या प्रकाशनाची कोणतीही पुस्तके घ्या व त्यावर ३५० रु.ची पुस्तके मोफत मिळवा. आमच्या सभासदांसाठी □१००० रु.च्या पुस्तकांवर ५००रु.ची पुस्तके मोफत!

मुदत १ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी २००६ पर्यंत!

दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

पुस्तकाचे नाव	लेखक	किंमत
समिधा	रणजित देसाई	१००
बारी	रणजित देसाई	१२०
प्रतिक्षा	रणजित देसाई	८०
आलेख	रणजित देसाई	१२०
मेघ	रणजित देसाई	१००
आषाढ	रणजित देसाई	८०
वैशाख	रणजित देसाई	९०
पंख जाहले वैरी	रणजित देसाई	५०
पांगुळगाडा	रणजित देसाई	६०
तुझी वाट वेगळी	रणजित देसाई	६०
स्नेहधारा	रणजित देसाई	९०
संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे)	रणजित देसाई	६०
नवी स्त्री	वि. स. खांडेकर	१००
अबोली	वि. स. खांडेकर	५०
दवबिंदू	वि. स. खांडेकर	६०
ढगाआडचे चांदणे	वि. स. खांडेकर	६०
समाधीवरली फुले	वि. स. खांडेकर	६०
अश्रु आणि हास्य	वि. स. खांडेकर	९०
प्रसाद	वि. स. खांडेकर	१५०
क्षितिजस्पर्श	वि. स. खांडेकर	८०
सांजसावल्या	वि. स. खांडेकर	८०

वन्हि तो चेतवावा!	वि. स. खांडेकर	७०
सहा भाषणे	वि. स. खांडेकर	७०
तारका	वि. स. खांडेकर	४०
नटरंग	आनंद यादव	१४०
माळावरची मैना	आनंद यादव	११०
भूमिकन्या	आनंद यादव	९०
झाडवाटा	आनंद यादव	९०
स्पर्शकमळे	आनंद यादव	१००
का रे भुललासी	व. पु. काळे	१२०
तू भ्रमत आहासी वाया	व. पु. काळे	७०
दुनिया तुला विसरेल	व. पु. काळे	५०
प्रेममयी	व. पु. काळे	१००
रंगपंचमी	व. पु. काळे	२००
सांगे वडिलांची किर्ती	व. पु. काळे	७०
माणसं	व. पु. काळे	१७०
एक एक पाऊल : ओशो	अनु. भारती पांडे	८०
मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही : ओशो	अनु. मृणालिनी गडकरी	९०
साक्षात्काराची देणगी : ओशो	अनु. प्रज्ञा ओक	१५०
वुइ दि नेशन (नानी पालखीवाला)	वि. स. वाळिंबे	२००
वॉर्सा ते हिरोशिमा	वि. स. वाळिंबे	३००
लज्जा (कादंबरी)	अनु. लीना सोहोनी	१२५
निर्बाचित कबिता (कविता)	अनु. मृणालिनी गडकरी	७०
आंधळी : कॅथरीन पियर्स	शान्ता शेळके	१००
गोंदण	शान्ता शेळके	५०
सांगावेसे वाटले म्हणून...	शान्ता शेळके	९०
सुवर्णमुद्रा	शान्ता शेळके	८०
मजल दरमजल	अनु. भारती पांडे	८०
व्हॉट वेंट रॉंग?	अनु. लीना सोहोनी	२००

रंग सुखाचे	डॉ. रमा मराठे	८०
निसर्गपुत्र (अनुवादित)	निरंजन घाटे	८०
पर्यावरण प्रदूषण	निरंजन घाटे	१३०
वसुंधरा	निरंजन घाटे	२५०
विज्ञानाचे शतक	निरंजन घाटे	२००
युगंधर (विज्ञान)	निरंजन घाटे	१००
नवे शतक	निरंजन घाटे	१५०
पोलिसकथा	व. कृ. जोशी	१५०
भीषण हत्याकांड	व. कृ. जोशी	९०
खेकडा	रत्नाकर मतकरी	८०
तनमन	रत्नाकर मतकरी	४०
मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग	अनु. आशा परुळेकर	६०
मायक्रोवेव्ह ओव्हन	राजश्री नवरे	७०
अंतराळ : शांतिनाथ देसाई	उमा कुलकर्णी	१००
अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती	उमा कुलकर्णी	११०
सीमारेषा	माधवी देसाई	२००
हरवलेल्या वाटा	माधवी देसाई	८०
धुमारे	माधवी देसाई	७०
सागर	माधवी देसाई	६०
वडवाई	अंजनी नरवणे	२००
तत्वमसि	अंजनी नरवणे	१४०
टेक् २५ : भावना सोमय्या	अंजनी नरवणे	४००
गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस	अंजनी नरवणे	१२०
कॉंगो : मायकेल क्रायटन	अनु. अरुण मांडे	१६०
ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	२५०
द लास्ट डॉन : मारिओ पुझो	अनु. अनिल काळे	३५०
क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक	अनु. वैशाली जोशी	३५०
दि फिस्ट ऑफ गॉड : फ्रेडरिक फोरसिथ	अनु. अनिल काळे	३००
डॉ. झिवागो : बोरिस पास्तरनाक	अनु. आशा कर्दळे	२५०
३००१ द फायनल ओडिसी : आर्थर सी. क्लार्क	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	१६०
काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस	अनु. सरिता पदकी	१५०
देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय (बंगाली)	अनु. मृणालिनी गडकरी	९०
संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती	अनु. लोकापूर/कानिटकर	८०
द्वंद्व : विजयदान देथा (राजस्थानी कथा)	अनु. वनिता सावंत	१५०
रावीपार : गुलजार	अनु. पाडळकर/वेल्हाळ	१५०
फुलांचे बोल : आन्ना साक्से (रशियन कथा)	अनु. सुनीती देशपांडे	१००

द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा)	अनु. मीना वैशंपायन	१३०
रेशीमगाठी	कांचन घाणेकर	१००
भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया :नवाझ मोदी	अनु. वासंती फडके	३००
योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम	माधव मोर्डेकर	४०
सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप : खुशवंतसिंग	अनु. अनिल किणीकर	१२५
मोरावळा	शिवाजी सावंत	६०
मदर टेरेसा : ॲन सेबा	अनु. अनंत बेदरकर	२५०
टाईमपास : प्रोतिमा बेदी	अनु. सुप्रिया वकील	१८०
देव जो भूवरी चालिला : साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी	अनु. लीना सोहोनी	१२०
द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार	अनु. माधुरी शानभाग	१५०
मनावर विजय : एकनाथ ईश्वरन्	अनु. वैशाली जोशी	१२५
मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार)	शं. व्यं. काश्यपे	९०
प्रियाराधन आणि विवाह : डॉ. विजय नागस्वामी	अनु. भारती पांडे	१५०
सुखद मातृत्व	डॉ. रत्नावली दातार	७०
डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी	डॉ. विकास/विनीता गोगटे	२५०
हसता हसता आरोग्य	अनु. दिगंबर गाडगीळ	९०
एकच पेला शिवाम्बूचा	डॉ. शशि पाटील	९०
आपले सौंदर्य आणि त्याची निगा	अनु. मीना टाकळकर	१००
प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू	यशोधरा भोसले	१५०
शिवणकला एक छंद : सलवार कमिज, स्कर्ट ब्लाऊज, इव्हिनिंग गाऊन्स, मिडी	हेमा कळके	८०
विज्ञान गमती	डॉ. अरुण मांडे	५०
विज्ञान जमती	डॉ. अरुण मांडे	६०
विश्वातील सजीवसृष्टी	अनु. डॉ. बाळ फोंडके	६०
शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : कुलकर्णी/भागवत/गंभीर	अनु. मीना किणीकर	७०

ज्युरॅसिक पार्क

१०४ / डिसेंबर २००५ : मेहता मराठी ग्रंथजगत

हिरवे जनुक : शाकुंतला भट्टाचार्य	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	६०
संभव असंभव	अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर	८०
बिजलीदेवीची कहाणी	गोविंद लक्ष्मण परांजपे	८०
नामशेष झालेले प्राणी	डॉ. किशोर पवार	५०
शरीरातील विविध संस्था - फुफ्फुसे, हृदय, मेंदू	वैशाली जोशी	२५
अंतःस्त्राव, गर्भाशय, जठर	वैशाली जोशी	२५
स्नायू, अस्थि	वैशाली जोशी	२५
व्हर्च्युअल रिॲलिटी (कथा)	डॉ. बाळ फोंडके	१५०
पृथ्वीवर माणूस उपराच! (संशोधन)	सुरेशचंद्र नाडकर्णी	७०
अज्ञाताचे विज्ञान (संशोधन)	सुरेशचंद्र नाडकर्णी	१३०
सुंदर आपली फुलबाग	आ. बा. पाटील	१००
सुंदर आपला रोपमळा	आ. बा. पाटील	१२०
एकवचनी	संजय राऊत	३५०
ख्यातनाम इतिहासकार : अरुण शौरी	अनु. सुधा नरवणे	१५०
बिग इगोज, स्मॉल मेन : राम जेठमलानी	अनु. माधव मोर्डेकर	८०
द अदर साईड ऑफ सायलेन्स : उर्वशी बुटालिया	अनु. नारायण आवटी	२५०
महात्मा (जोतीराव फुले)	डॉ. रवींद्र ठाकूर	३००
फॅक्टरी गेट	रंगा मराठे	१५०
तीन दगडाची चूल	विमल मोरे	१५०
मृद्गंध	इंदिरा संत	१६०
आठवणींचा मोहर	राजाभाऊ गवांदे	१६०
बंजाऱ्याचे घर	यशोधरा भोसले	१५०
धागे : गुलजार	संपादन : अनंत दीक्षित	६०
ओसरलेले वादळ	कुमार केतकर	१२०
गज़ल	प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी	१८०
रिवणावायली मुंगी	राजन गवस	१३०
कावळे आणि माणसं	उत्तम कांबळे	१००
उत्तरार्ध	विजया राजाध्यक्ष	१३०
खसखशीचा मळा	द. ता. भोसले	७५
गुंता सोडविताना	अनुराधा गुरव	११०
पाणी कुठंवर आलं गं बाई...	दया पवार	२५
नको स्वातंत्र्य स्त्रीला	दिलीप परदेशी	५०
मराठी कादंबरीचा इतिहास	चंद्रकांत बांदिवडेकर	१७०
मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा	रमेश तेंडुलकर	१३०

मेहता मराठी ग्रंथजगत : डिसेंबर २००५ / १०५

अनुक्रमणिका

दयाळू राजपुत्र १०७

बालनगरी

अलकानगरीच्या सुदर्शन राजाला तीन मुलगे होते. त्यांचे नाव विजयकुमार, वैभवकुमार आणि अमितकुमार.

सर्वात धाकटा असलेला अमितकुमार हा अत्यंत हुशार व पराक्रमी होता. मात्र विजयकुमार व वैभवकुमार त्यापेक्षा मोठे असूनही अतिशय आळशी व मूर्ख होते. राजपुत्रच असल्याने ते सतत पैशाची उधळपट्टी करत.

राजा सुदर्शनने आपल्या या मोठ्या दोन मुलांना शहाणपण यावे यासाठी खूप प्रयत्न केले. मात्र विजयकुमार व वैभवकुमार यांच्या स्वभावात काहीही फरक पडला नाही.

शेवटी राजाने ठरवले की विजयकुमार आणि वैभवकुमार यांना जगाच्या सफरीवर पाठवावे. त्यामुळे ते शहाणपणा शिकतील. राजा त्या दोघांना भरपूर पैसे देऊन जग पाहून येण्यास सांगितले.

वैभवकुमार व विजयकुमार काही देशांत फिरतात. पैसेही भरपूर खर्च केले. त्यामुळे घरी परत येण्यासाठी सुद्धा त्यांच्याकडे पैसे उरले नाहीत.

इकडे राजा सुदर्शन व सर्वात लहान राजपुत्र अमितकुमार काळजीत पडला. बरेच दिवस झाले तरी विजयकुमार व वैभवकुमार या दोघांचाही

पत्ता नसल्याने राजपुत्र अमितकुमारने राजा सुदर्शनला म्हटले, ''बाबा, बरेच दिवस होऊनही दोन्ही दादांचा काहीच पत्ता नाही. मला त्यांची काळजी वाटते. मी त्यांना शोधून आणू का?''

अमितकुमारच्या हट्टापुढे राजाचे काही चालले नाही. त्याने अमितकुमारला परवानगी दिली आणि भरपूर पैसे व इतर आवश्यक गोष्टी देऊन रवाना केले.

अमितकुमार लहान असला तरी अतिशय बुद्धिमान राजपुत्र होता. पैसे कोठे आणि किती खर्च करावेत याचे पुरेपूर भान त्याला होते. शेवटी त्याला त्याचे भाऊ सापडले. तो आपल्या भावांना म्हणाला, ''दादा, तुम्ही दोघेही किती दिवसांनी भेटलात? चला, आपल्या घरी चला,'' असे म्हणून त्या दोघांना मिठी मारतो. त्या तिघांनाही परस्परांना भेटल्यावर खूप आनंद होतो. मात्र अमितकुमारला त्याचे भाऊ म्हणाले, ''अमित, तू आम्हाला शोधून काढलेस. पण आम्ही आता परत आपल्या घरी जाणार नाही, काहीतरी करून दाखवल्याशिवाय आपल्या बाबांना तोंड दाखवणार नाही.''

त्यांनी असे म्हटल्यावर अमितकुमारनेदेखील घरी न परतता त्यांच्यासोबत राहण्याचे ठरवले. नंतर ते तिघेही मजल दरमजल करत एका घनदाट जंगलात शिरले.

त्या जंगलात शिरल्यानंतर त्यांना एक मुंग्यांचे मोठे वारुळ दिसले. ते दिसल्यावर विजयकुमार व वैभवकुमार यांनी आपल्या स्वभावानुसार पुढे जाऊन त्या वारुळाला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात

अमितकुमारने म्हटलेले, ''नका, त्या मुंग्यांना मारू नका. मुंग्या अतिशय कष्टाळू असतात. आपण त्यांच्यापासून कष्ट करायला शिकले पाहिजे.'' हे ऐकताच ते दोघे शांत बसले आणि पुढे चालू लागले.थोड्यावेळाने त्यांना एक तलाव दिसला. त्यात सुंदर बदके पोहत होती. वैभवकुमार म्हणाला, '' अहाहा! किती सुंदर बदके! पकड त्याला. आपण ते मस्त भाजून झकास जेवण बनवू.''

''नको, नको. त्या सुंदर बदकांना मारू नका!'' अमितकुमार म्हणाला.

''ठिक आहे. आता तू म्हणतोच आहेस तर...''

आणखी पुढे गेल्यावर त्यांना मधाचा गोड वास येऊ लागला. एका झाडाला त्यांना मधानं भरलेलं पोळं दिसलं. विजयकुमार म्हणाला, 'चला लवकर! आपण ते मधाचं पोळं पाडू या. आणि मध खाऊ या'' छे छे! तसं अजिबात करू नका.मधमाशांनी तो कष्टानं जमा केलेला असतो. शिवाय मधमाशा चिडल्या तर आपल्याला चावून चावून हैराण करतील!'' '' जशी तुझी मर्जी! ''

थोड्यावेळाने त्यांना एक राजमहाल लागला. ते तिघेही चकित झाले. त्यांना वाटले की या घनदाट जंगलात राजवाडा कसा?

ते राजवाड्यात शिरले. एका सेवकाने त्यांचे स्वागत केले आणि त्यांना काहीही न बोलता राजमहालात नेले. त्या महालात एका मोठ्या टेबलावर भरपूर फळे व इतर खाद्यपदार्थ ठेवलेले होते.

इतर काही न बोलता ते तिघे राजपुत्र त्या फळांवर व खाद्यपदार्थांवर

तुटून पडले. त्यांना सडकून भूक लागलेली होती. भरपेट जेवण झाल्यावर त्यांना त्या सेवकाने एका मोठ्या विश्रामगृहात नेले. ते तिघेही गाढ झोपी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर तो सेवक सर्वांना पुन्हा एका मोठ्या खोलीत घेऊन गेला. तेथे अनेक मेणाचे पुतळे होते. राजपुत्रांनी त्या सेवकाला या मेणाच्या पुतळयाबाबत विचारले तेव्हा सेवक म्हणाला, ''हे राजकुमारांनो, इथे जो कोणी येतो त्याला एक अट पूर्ण करावी लागते आणि जर त्याने ती पूर्ण केली नाही तर त्याचा मेणाचा पुतळा बनतो.'' हे ऐकल्यावर अमितकुमार म्हणाला, ''कोणती अट?'' तेव्हा तो सेवक म्हणाला की, ''या राजमहालाबाहेर एक मोठी बाग आहे. त्या बागेत अनेक शंख, शिंपले पडलेले आहेत. त्यापैकी काही शंखशिंपल्यात मोती आहेत, असे एक हजार मोती सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत शोधून काढणे आवश्यक आहे. जो कोणी त्यात यशस्वी होईल त्याला आमची खरी राजकुमारी गायत्री वरमाला घालील.''

प्रथम थोरला विजयकुमार गेला. मात्र सूर्यास्तापर्यंत त्याला शंभरच मोती मिळाले. त्यामुळे तो लगेच मेणाचा पुतळा बनला. वैभवकुमारही अशाच प्रकारे अपयशी झाला. त्याचाही मेणाचा पुतळा बनला. आता पाळी अमितकुमारची होती. त्याने मोती शोधण्यास सुरुवात केली तेव्हा अनेक मुंग्या त्याच्या मदतीला आल्या. तो आश्चर्यचकित झाला आणि त्याच्या लक्षात येते की याच मुंग्यांचे आपण प्राण वाचवले होते. त्या हजारो मुंग्यांनी अमितकुमारला मोती शोधण्यास मदत केली आणि सहजपणे एक हजार मोती असलेले शंखशिंपले बाजूला काढले.

हे पाहून सेवक आश्चर्यचकित झाला. ही बातमी त्याच्या राजा व राणीला त्याने दिली. राजा व राणी त्या बागेत आले आणि आश्चर्यचकित झाले. '' हे राजपुत्रा, तू भाग्यवान आहेस. आणि बुद्धिमानसुद्धा! पण तरीही तुला अजून दोन परिक्षा द्याव्या लागतील. तरच तुझी सुखरूप सुटका होईल. आणि राजकन्येशी विवाह सुद्धा होईल.''

''कोणत्या परिक्षा?''

'' राजकन्येच्या महालाची किल्ली राजवाड्यातल्या मोठ्या तलावात हरवली आहे. ती तू शोधून काढली पाहिजेस!''

अमितकुमार निराश झाला. कारण त्याला माहित होते की तलाव खूप खोल आहे. त्यातून बारीकशी किल्ली शोधून काढणे महाकठीण आहे! तो खिन्न मनाने तलावापाशी बसला असताना तलावातले एक सुंदर बदक तेथे आले आणि त्याला म्हणाले, " हे राजपुत्रा, तू का दुःखी झाला आहेस? "

मला एवढ्या मोठ्या तलावातून एक बारीकशी किल्ली शोधायची आहे. मी कशी शोधणार ती ? आणि मी ती शोधली नाही तर माझाही मेणाचा पुतळा होणार! म्हणून मी दुःखी आहे."

"हात्तेच्या! एवढंच ना ! मी देतो तुला किल्ली शोधून!"

बदकाने पाचच मिनिटात किल्ली चोचीत धरून आणली. अमितकुमारला खूप आनंद झाला. त्याने बदकाचे आभार मानले.

अमितकुमारने ती किल्ली राजाला नेऊन दिली. राजाला खूप आश्चर्य वाटले. तो म्हणाला, " तू खूप अवघड अशा परिक्षा पास झाला आहेस. आता शेवटची परिक्षा म्हणजे माझ्या तीन राजकन्या तुझ्यापुढे उभ्या राहतील.एकीनी साखर खाल्लेली असेल. एकीनी चॉकलेट खाल्लेले असेल आणि एकीनी मध खाल्लेला असेल. तू कोणत्या राजकन्येनं मध खाल्ला आहे हे ओळखायचे आहेस!"

अमितकुमार गोंधळून गेला. मध खाल्लेली राजकन्या ओळखणे म्हणजे एक दिव्यच होते. संध्याकाळपासून तो चिंताक्रांत बसलेला असताना एक मधमाशी त्याच्यापाशी घोंगावत आली. आणि म्हणाला, "हे राजपुत्रा, तू असा चिंताग्रस्त का बसला आहेस? मी तुला काही मदत करू का?"

"आता काय सांगू तुला? तीन राजकन्यांमधून मला मध खाल्लेली राजकन्या ओळखायची आहे. ती मी कशी ओळखणार?"

"एवढंच ना ! मी तुला मदत करीन. ज्या राजकन्येनं मध खाल्ला असेल तीच्या भोवती मी आणि माझ्या काही मैत्रिणी घोंगावत राहू. त्यावरून तू राजकन्येला अचूक ओळखू शकशील."

"अरे वा! फारच छान! मी तुझे उपकार कसे मानू? "

"अरे, तू नाही का आमचे प्राण वाचवलेस?"

दुसऱ्या दिवशी अमितकुमारने मध खाल्लेली राजकन्या अचूक ओळखली.

राजाला खूप आनंद झाला. आपल्या मुलीला योग्य वर मिळाल्याचे पाहताच ते अमितकुमारला म्हणाले, "हे राजपुत्रा, तू आमच्या मुलीचा पती होण्यास लायक आहेस, बोल तुला काय हवे?"

अमितकुमार म्हणाला, "महाराज, मला आणखी काही नको फक्त माझ्या दोन्ही भावांसह पुतळे बनलेल्या सर्वांना पुन्हा जिवंत करावे.आणि माझ्या दोन्ही भावांचे तुमच्या इतर दोन्ही राजकन्यांशी विवाह करावेत."

ते ऐकताच दैवी शक्ती असलेल्या राजाने विजयकुमार व वैभवकुमारसह सर्वांना पुन्हा मूळ स्वरूपात आणले. राजा सुदर्शनला निरोप धाडून बोलावले.

राजा सुदर्शनचे आगमन झाले. तिन्ही राजपुत्र त्याला सामोरे गेले. राजपुत्रांना पाहताच राजा सुदर्शनाला आनंद झाला आणि त्याला झालेला सर्व प्रकार कळला. राजपुत्र अमितकुमार व राजकुमारी गायत्री याचा विवाह थाटामाटात पार पडला.विजयकुमार आणि वैभवकुमारचेही विवाह पार पडले. नवीन वधुवरांसह सर्वजण अवंतीनगरीला परत आले.

'लोकसखा ज्ञानेश्वर' चा तीर्थनगरी आळंदीत लोकार्पण सोहळा

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी सोहळ्याचे निमित्त साधून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव लिखित 'लोकसखा ज्ञानेश्वर' हा ग्रंथ आज तीर्थनगरी आळंदीत लोकार्पण करण्यात आला. सदर ग्रंथाचे प्रकाशन 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे करण्यात आले आहे.

मंगळवार दि. २९नोव्हेंबर रोजी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीनगरीत भाविकांची प्रचंड गर्दी होती. या सोहळ्याचे निमित्त साधून डॉ. आनंद यादव यांच्या 'लोकसखा ज्ञानेश्वर' या ग्रंथाचाही लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी स्वत: डॉ. आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता, एम्. आय. टी. चे डॉ. वि. दा. कराड, किर्तनकार शेलारमामा, विलास कालेलकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील या वास्तववादी चरित्रात्मक कादंबरीचे दीर्घकाळ लेखन चालू होते आज ज्ञानेश्वरांच्या माझ्यावरील कृपेमुळे हे कार्य तडीस गेले अशी भावना डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केली.